

निंबरगी
संप्रदायाच्या
इतिहासातील

सोनेरी पाने

सौ. पद्मा कुलकर्णी

8

निंबरगी संप्रदायाच्या इतिहासातील

सोनेरी पाने

Academy of Comparative Philosophy & Religion
BELGAUM
I. No. 308
D. ....
—Hindwadi—

907350

सौ. पद्मा कुलकर्णी

इ. स. २०००

पहिली आवृत्ती २०००

© प्रकाशिका

मूल्य ६० रुपये

प्रकाशिका
सौ. अश्विनी जोग व सौ. अंजली कन्नूर
टी.एफ. १, मंदार अपार्टमेंटस्,
१०१ रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१
दूरभाष (०२१७) ७२ ८२ ४४

अक्षरजुळणी
सौ. उषा पसारकर
केतकी फोटो टाईप सेटर्स
१२६ ब, मार्कंडेय नगर, सोलापूर ४१३ ००३
दूरभाष (०२१७) ६०२ ३०१

मुद्रणस्थळ
महाराष्ट्र मुद्रणालय
२२६ साखर पेठ, सोलापूर ४१३ ००५

ना आदिगुरु शंकरा-। लागोनि शिष्यपरंपरा।
बोधाचा हा संसारा। जाला जो आमुतें।।

तो हा तूं घेऊनि आघवा। कळीं गिळितयां जीवां।
सर्व प्रकारीं धांवा। करीं पां वेगीं।।

अनुक्रमणिका

खारीची सेवा	५
प्रकरण पहिले : **श्री निंबरगी महाराज**	१२-४०
१. निंबरगी महाराजांच्या समाधीचे मंदिर	१५
२. बिळेन सिद्ध	२४
३. 'महाराजरवर वचन' याचे एक वैशिष्ट्यपूर्ण हस्तलिखित	३१
४. काही घटना	३७
अ) सप्ताहाचा खर्च	
आ) निंबरगी महाराजांचे डोळे लाल	
इ) 'जो देखे सो कहे नही'	
ई) 'कलादगीला जन्म घ्यावा लागेल'	
५. निंबरगी महाराजांच्या वस्तू	३८
प्रकरण दुसरे : **श्री भाऊसाहेब महाराज**	४२-५९
१. इंचगेरी मठस्थापना	४२
२. साजरे होणारे सप्ताह	४९
अ) चैत्र सप्ताह	
आ) मार्गशीर्ष सप्ताह	
इ) श्रावण सप्ताह	
ई) रघुनाथप्रिय महाराजांची पुण्यतिथी	
३. महाराजांच्या डायऱ्या	५३
४. 'येकांतीं जाऊन विवरी। नाना ग्रंथ'।।	५६
५. 'होगूदु, शिखर आगेद'	५७
अ) परमार्थात वारसाहक्क नाही	
आ) निर्याणाचा कृतनिश्चय	
प्रकरण तिसरे : **श्री अंबुराव महाराज**	६१-६७
१. महाराजांचे निर्याण	६१
२. गुरुबंधूची ताटातूट	६२
३. शिवभावाने पत्रभेट	६३
४. नित्यनेमावलीची चौथी आवृत्ती	६४
५. औषधयोजना	६५
६. चोखामेळा	६६

प्रकरण चौथे : **श्रीमती शिवलिंगव्वक्का** ६९-७६
१. काही पत्रे ६९
अ) लोकांस आत्मज्ञानाचा विसर
आ) सांत्वनवर पत्र
इ) 'जो भाव ठेवतो तो भाग्यवंत'
२. ग्रंथार्पण ७३
३. सूचक दृष्टान्त ७४
४. 'सावधान सावधान' ७४
प्रकरण पाचवे : **श्री गुरुदेव रानडे** ७८-१००
१. निंबाळसंबंधी दृष्टान्त ७८
२. 'नी मुंद होगु, ना हिंद बरतीनि' ७९
३. महाराजांचे चिताभस्म ७९
४. नित्यनेमावली ८०
अ) प्रास्ताविक
आ) पहिली आवृत्ती, १९११
इ) दुसरी आवृत्ती, १९१६
ई) पाचवी आवृत्ती, १९४५
उ) आठवी आवृत्ती, १९६०
ऊ) अकरावी आवृत्ती, १९८८
५. निंबरगी संप्रदायाचा चित्रमय इतिहास ८५
६. 'खनाळामध्यें जाऊन राहे। तेथें कोणीच न पाहे'।। ८५
७. जाता जाता ९०
अ) देवाची कृपा
आ) फक्त शंभर वर्षे
इ) भक्त तितुका मेळवावा
ई) वेदान्तावरील ग्रंथ
उ) 'सहज बोलणे'
८. गुरुस्थानांचे अखेरचे दर्शन ९६
९. न झालेले बोलणे ९७
१०. स्वानंदज्ञानमंदिर ९८
प्रकरण सहावे : **'इये मार्गीचिये कापडी'** १०१-१३६
अ) महाराजांचे शिष्य (छायाचित्रे उपलब्ध) १०५
आ) महाराजांचे शिष्य (छायाचित्रे अनुपलब्ध) १२३
संदर्भग्रंथ १३७

खारीची सेवा

श्री गुरुदेव रा. द. रानडे नेहमी सांगत असत की निंबरगी महाराज, भाऊसाहेब महाराज, अंबुराव महाराज, शिवलिंगव्वक्का किंवा संप्रदायातले जुने साधक, यांच्याबद्दल जी काही माहिती मिळेल तिचे संकलन करून टिपणे तयार करा. गुरुदेवांची स्वतःची इतिहासदृष्टी विलक्षण तल्लख होती. निंबरगी संप्रदायाचा एक अधिकृत व समग्र इतिहास लिहिला जावा अशी त्यांची मनीषा होती. तसे पाहिले तर जीवनाच्या सगळ्या क्षेत्रांत इतिहासाचे ज्ञान आवश्यक असते. एखाद्या घटनेचा बारीकसारीक तपशिलासह पूर्वेतिहास समजला की त्या घटनेचा अर्थ लावता येतो. रोगाचे निदान करताना डॉक्टरांना रोग्याचा इतिहास हवा असतो. संस्थेचा इतिहास ज्ञात असला की मागे कुणी चांगले काम केले असेल त्याचा कित्ता गिरवता येतो. तसेच एखाद्याच्या हातून काही चुका झाल्या असल्या तर त्या टाळता येतात. इतिहासाच्या पार्श्वभूमीवर प्रथमदर्शी विसंगत वाटणाऱ्या घडामोडींची संगती लावता येते. एकूणच आसमंतात चालू असलेल्या गोष्टींकडे पाहण्याची एक दृष्टी तयार होते. साधुसंतांच्या चरित्रांतून कितीतरी धडे शिकता येतात. शौर्यावीर्याच्या कथा स्फूर्तिदायक ठरतात. परंपरा ही फार महत्त्वाची असते. तिचे माणसाला पाठबळ असते. आधार असतो. जिथे परंपरा नाही तिथे उथळपणा ठेवलेलाच आहे. सांस्कृतिक इतिहास ही एक सामाजिक व आध्यात्मिक संपत्ती आहे. मात्र तिची कोरडी जाण उपयोगाची नाही. संस्कृतीच्या आदेशानुरूप आपली वागणूक राहिली पाहिजे. प्राचीन संस्कृतीचा वृथाभिमान जसा घातक आहे, तसा तिचा विसरही अक्षम्य आहे. म्हणूनच व्यक्ती असो, संप्रदाय असो, संस्था असो किंवा देश असो, त्याचा सप्रमाण इतिहास ताजा ठेवणे अगत्याचे आहे. अर्थातच या कामासाठी जे जे पुरावे मिळतील त्यांची जपणूक करणे प्रत्येकाचे कर्तव्य ठरते.

इतिहास लिहायला एक वेगळाच पिंड लागतो. आपल्या देशातल्या लोकांचा पिंड तसा दिसत नाही. याबद्दल विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी मोठे आश्चर्य प्रकट केले आहे. प्राचीन काळी कित्येक विद्यांमध्ये भारतीय लोक अग्रेसर होते. पण ग्रीक व रोमन लोकांत दिसते ती इतिहास लिहिण्याची विद्या मात्र भारतीयांनी आत्मसात केली नाही हे नवलच आहे, असे ते नमूद करतात. ब्रिटिश लोकांना स्वतःच्या तत्त्वज्ञानाचा

किंवा मानसशास्त्राचा इतिहास लिहिता आला नाही. तो लिहिला जर्मन लोकांनी! ब्रिटिशांनी भारतातील राजकीय घटनांचा इतिहास लिहिला खरा, पण तो पुरापुरा पूर्वग्रहदूषित दृष्टीने डागाळलेला होता. म्हणून तर आता खरा इतिहास लिहिण्याची वेळ आली आहे. एकूणच इतिहासकाराची भूमिका सोपी नाही. संदर्भाची जाण नसेल तर सगळेच चित्र उलटेसुलटे होऊन जाते. 'इतिहासाकरिता समबुद्धी बाळगावी, कोणतेही अंतिम विधान भरभक्कम पुरावा मिळाल्याशिवाय करू नये व तसा पुरावा असल्याशिवाय पूर्वी झालेल्या विधानांचे खंडनही करू नये' अशी गुरुदेवांनी मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिणाऱ्या एका साधकाला सूचना दिली होती.

हे झाले इतिहास लिहिण्याच्या क्षमतेचे. क्षमता असली तरी पहिले पाऊल टाकताना पुढे उभी ठाकणारी समस्या म्हणजे उपलब्ध असलेली माहिती. एक वेळ जेवायचे असले तरी सामुग्री पाहिजे असे समर्थ म्हणतात. इतिहास लिहिण्याच्या कारखान्याला तर नाना तऱ्हेचा कच्चा माल लागतो. मुख्य म्हणजे लिखित मजकूर. साधुसंतांनी किंवा विद्वान अभ्यासूंनी लिहून ठेवलेले किंवा त्यांच्या तोंडून आल्यावर एखाद्या सच्चिदानंद बाबाने लिहून ठेवलेले वाङ्मय, चरित्रे, पत्रे, हस्तलिखिते, छापलेले लेख, घटनांचे त्या त्या वेळचे अहवाल किंवा टिपणे, हे सर्व हवे असते. तत्कालीन सामाजिक किंवा धार्मिक परिस्थितीचे चित्र उभे करणारे साहित्य पार्श्वभूमी म्हणून उपयोगी पडते. स्थलपुराणे किंवा स्थानमाहात्म्ये हे काम करतात. या पोथ्यांतून ऐतिहासिक काळातील व्यक्तींचे जीवनपट उकलून दाखवले जातात, गुरुशिष्यपरंपरा किंवा वंशावळी मिळतात. तत्कालीन आचारधर्म किंवा व्रतवैकल्ये यांचे संदर्भ स्पष्ट होतात. घटनांचे काल ठरवण्यास हे एक बऱ्यापैकी साधन आहे. प्रसंगांचे, समारंभांचे किंवा व्यक्तींचे फोटो व नकाशे सत्यदर्शी असतात.

मूळ साहित्याच्या केलेल्या नकला हे दुय्यम दर्जाचे साहित्य. यातले तथ्य पारखून घ्यावे लागते. नक्कल करणारी व्यक्ती पूर्वग्रह न बाळगता व अचूकतेवर दृष्टी ठेवून काम करणारी असेल तर अशा लिखाणाला मूल्य असते. आख्यायिका व आठवणींवरून सांगितलेल्या कथा निर्णायक विधाने करायला मदत करतीलच असे नाही. स्मृतीला कसा व कुठे तडा जाईल हे सांगता येत नाही. आपल्या परंपरेत स्मृतीला बेताचेच प्रामाण्य दिलेले आहे. पुन्हा एकदा आठवणी सांगणारा माणूस कोण हा प्रश्न येतो. तो 'आप्त' पाहिजे. तर्कसंग्रह, परिच्छेद ५९, इथे 'आप्तस्तु यथार्थवक्ता' अशी व्याख्या दिली आहे. जर सांगणारा जसेच्या तसे पुढे ठेवत असेल तर तो आप्त. त्याची हकीकत

विश्वसनीय असते. जर तो आपल्या आवडी-निवडीप्रमाणे काही तपशील गाळणारा, काही पदरचे घालणारा, तिखटमीठ लावून, रंगवून प्रसंगांचे वर्णन करणारा असला तर त्याच्या आठवणी करमणुकीला ठीक, इतिहासाला नाही.

मिळालेल्या भांडाराला कुठून तरी दुजोरा मिळावा लागतो. तोंडी सांगितलेल्या गोष्टींना छापील आधार मिळणे उत्तम, पण दुर्दैवाने छापील आधारही कधीमधी दगा देतात. माहिती कोणत्या का स्रोतातून येईना, ती स्थिर प्रयत्नाने अभ्यासून स्वीकारावी लागते. घटनांचे अहवाल एकमेकांशी ताडून पहाणे अगत्याचे असते. कर्णोपकर्णी आलेल्या कथांवर विश्वास ठेवायचा नाही असा दंडक राखावा लागतो. विविध ठिकाणांहून मिळालेल्या हकीकतींत एकवाक्यता होणे आवश्यक आहे हे सूत्र लक्षात ठेवावे लागते. या गोष्टी दमाने आणि चिकाटीने घ्याव्या लागतात. इतके करूनही एखाद-दुसरी चूक चोरपावलांनी आत शिरतेच!

निंबरगी येथे पूर्वी रामभट जोशी नावाचे विद्वान गृहस्थ रहात होते. त्यांच्याकडे तिथले स्थलपुराण होते. त्या घराण्यातले आता कुणीच तिथे नसल्याने ते मिळणे दुरापास्त झाले आहे. उमदी हे पुरातन काळी एक महनीय शैक्षणिक केंद्र होते. तिथे संस्कृत विद्यापीठ होते. प्राचीन संस्कृतीचे बेवारशी अवशेष आजही गावात इतस्ततः पडलेले दिसतात. गत ऐश्वर्याच्या या छिन्नभिन्न खुणा पाहून मन विषण्ण होते. सदाशिव धोंडो गोखले यांनी उमदी-माहात्म्य नावाची छोटी पुस्तिका काढली आहे. पण तिथे भाऊसाहेब महाराज व त्यांचे शिष्य यांची तुटपुंजी माहिती आहे.

निंबरगी संप्रदायातल्या बऱ्याच ज्येष्ठ साधकांनी जुन्या कागदपत्रांच्या नकला करून घेतल्या होत्या व जपून ठेवल्या होत्या. काहींनी त्यावर आधारित टिपणे केली होती. या प्रकारची पुष्कळ सामुग्री मिळाली. मग गावोगावी जाऊन पुस्तके, जुनी कागदपत्रे, फोटो, जमा केले. सरकारी कचेऱ्यांत जाऊन तिथल्या दप्तरांची छाननी केली. जुन्या लोकांकडून गतकालातल्या आठवणी ऐकल्या. निंबाळ, अलाहाबाद किंवा सांगली इथे झालेल्या सिटिंग्जची त्याच वेळेला साधकांनी केलेली टिपणे उपलब्ध झाली. गुरुदेव पुष्कळदा अथणीहून कृ. दा. ऊर्फ बाबासाहेब संगोराम यांना बोलावून जुन्या हकीकती सांगून टिपणे करायला सांगत. संप्रदायातले साहित्य गोळा करण्याच्या कामी बाबासाहेब गुरुदेवांचा उजवा हात होते. वेळ, कष्ट, पैसा कशाकडेही न पाहता भक्तीने ते काम करीत. त्यांच्या हयातीत संप्रदायाचा इतिहास लिहिला गेला नाही. पण त्यांची कागदपत्रे त्यांचे चिरंजीव श्री. सुरेंद्रराव संगोराम यांनी आनंदाने दिली. त्यांचे

अगणित उपकार आहेत. निंबरगी महाराजांच्या वंशजांकडून पुस्तके, कागदपत्रे, आमंत्रणपत्रिका, संप्रदायाच्या दृष्टीने महत्त्वाच्या घटनांचे छापील अहवाल, व्यक्तींचे व वास्तूंचे फोटो असे विविध साहित्य पदरात पडले. वास्तूंच्या फोटोमागे फोटो कुठला आहे हे बाबासाहेबांनी लिहून ठेवले आहे. निंबरगी महाराजांचे नातू नागप्पा यांना विचारून ही माहिती लिहिली गेली आहे. त्यामुळे फोटोतील जागा ओळखणे सुलभ झाले. मात्र फोटो फार जुने व अस्पष्ट होते. पण आधुनिक विज्ञानाची किमया खरोखर धन्य आहे. जादूमंतर, छूमंतर केल्याप्रमाणे जुन्या फोटोंच्या जागी आता ओळखता येण्याजोगे फोटो तयार झाले आहेत. श्री. गुरुसिद्दप्पा नीलवाणी, श्री. गुरुलिंगप्पा मंगळवेढे, श्री. काडसिद्दप्पा नीलवाणी व श्री. मल्लिकार्जुन नीलवाणी यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करायला शब्द नाहीत. श्री. गो. जांभळीकर हे महाराजांचे शिष्य. त्यांचे सर्व दप्तर बुधगाव येथे रहाणारे त्यांचे मानसपुत्र श्री. बी.आर. शेंडगे यांच्याकडे होते. श्रीमती शिवलिंगव्वक्कांच्या संबंधीची टिपणेही त्यांच्याकडे होती. ती सर्वच त्यांनी खुषीने हातात दिली. त्यांचे ऋण मान्य करणेच फक्त शक्य आहे. शिवलिंगव्वक्कांच्या हस्ताक्षरातील एक महत्त्वाचा कागद व १९११ सालचे इंचगेरी मठाचे रूप दाखवणारा नकाशा त्यांच्याच संग्रही होता. त्यांचा इथे समावेश केला आहे. भाऊसाहेब महाराजांच्या शिष्यांचे मिळाले ते फोटो, जन्म-मृत्यूच्या तारखा व नाम घेतल्याच्या तारखा जशा मिळाल्या तशा घातल्या आहेत. महाराजांच्या एक शिष्या अन्नपूर्णाबाई करंदीकर या परवापरवापर्यंत हयात होत्या. २८-४-२००० रोजी त्यांचा मृत्यू झाला.

शक्यतो पूर्वी प्रसिद्ध झालेल्या माहितीची पुनरावृत्ती टाळली आहे. पण तारखेवार नवीन पुरावा उपलब्ध झाल्यामुळे जुन्या हकीकतीत कधीकधी बदल करणे भाग पडले. आता हाती आलेल्या नोंदींच्या आधाराने पूर्वी प्रसिद्ध झालेल्या काही तारखांत व स्थलनिर्देशांत बदल केले. इथे तथ्यदर्शक कसोट्या वापरण्याची दक्षता घेतली. असे बदल झाल्यावर पुनरुक्तीचा दोष पत्करून काही प्रसंगांचा पुन्हा उल्लेख करणे क्रमप्राप्त झाले. काही असले तरी आता केलेली विधाने त्रिकालाबाधित सत्ये असल्याचा दावा नाही. तो संशोधन-प्रक्रियेला बाधक ठरतो. इतिहास लिहिण्याचे काम कधीच संपत नसते. इतिहाससंशोधक पृथ्वीवरचाच काय पण जमिनीखालचा पुरावा शोधत असतो. नवीन आधार मिळाले की कधी पूर्वीच्या सिद्धान्तांना पुष्टी मिळते तर.कधी ते सपशेल खोडावे लागतात. प्रामाणिक संशोधक आपण स्वत: एकेकाळी मांडलेले मुद्दे बिनदिक्कत सोडून देतो. नवीन शोधांचा मानसन्मान करतो आणि तरीही आपली

विधाने अंतिम आहेत असा आग्रह धरत नाही.

घटनांचा कालनिर्णय करताना काही अडचणी आल्या. इसवी सन, शके, फसली अशी वेगवेगळी कालमापने टिपणांतून आढळली. या सगळ्या कालगणनांच्या पद्धतींचे नवे वर्ष निरनिराळ्या दिवशी सुरू होते. त्यामुळे खूपदा त्यांत मेळ बसत नाही. इतर नोंदींच्या अनुषंगाने काल ठरवण्याचा प्रयत्न केला आहे. तिथींची निश्चिती करताना एक वेगळीच अडचण आली. आपल्या पंचांगाप्रमाणे केव्हा केव्हा तिथीचा लोप असतो. उलट एकाच दिवशी सूर्योदयानंतर काही घटकांनी आधीची तिथी संपून दुसरी सुरू होते. जी तिथी सूर्योदयाला, तीच सूर्यास्ताला असेल असे नाही. म्हणून एखाद्या प्रसंगाची नोंद चतुर्दशी किंवा पौर्णिमा अशा दोन्ही तऱ्हांनी होऊ शकते.

जुन्या पत्रांची भाषा क्वचित प्रसंगी उमजत नाही. कन्नड मातृभाषा असणाऱ्या लेखकाने मराठीतून लिहिले असले तर मजकूर लक्षात येणे अवघड होते. अशा वेळेला थोडा शाब्दिक बदल करावा लागला. पण तो कमीतकमी केला आहे.

हा निंबरगी संप्रदायाचा इत्थंभूत इतिहास नाही. मिळालेले भांडवल अधिकृत असले तरी फार तुटपुंजे होते. 'बाबांनी मला ही गोष्ट सांगितली आहे ती तशीच्या तशी टिपून ठेवा' अशा गुरुदेवांच्या आज्ञेवरून केली गेलेली टिपणे अस्सल असली, तरी अपुरी होती. टिपणे, पत्रे, डायऱ्या, फोटो वगैरे इतिहासाला आवश्यक असणारी नानाविध सामुग्री मिळाली, पण ती मूठभरच होती. वंशावळ एखाद्याचीच होती. कधी कुणाच्या जन्माची तारीख मिळे, कधी मृत्यूची आणि कधी फक्त नाम घेतल्याची. एखाद्या शिष्याचा फोटो मिळे पण माहिती अशी काहीच नसे. जुन्या व्यक्तींची नावे माहीत असली तरी गुरुपरंपरा अज्ञात असे. कोणी एक साधक निंबरगी महाराजांचा शिष्य की महाराजांचा असा संभ्रम पडे. पत्रे अथपासून इतीपर्यंत नव्हतीच. केव्हा मायना तर कधी तारीख, आणखी कधी सही बेपत्ता असे. पत्रांची नक्कल करणाऱ्याने स्वतःला महत्त्वाचा वाटणारा मजकूर उतरवून घेऊन बाकी गोष्टींना फाटा दिलेला असे. काही संतांबद्दल जास्त आणि काहींबद्दल थोडी माहिती उपलब्ध झाली. म्हणून या सत्पुरुषांचे लौकिक जीवन, आयुष्यातील महत्त्वाच्या घटना, पत्रव्यवहार, पारमार्थिक चरित्र, शिष्यसंप्रदाय असा बांधेसूद वृत्तांत लिहिता आला नाही. संप्रदायाचा उगम व विकास असे रेखीव नाव याला देता येत नाही. प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानाचा इतिहास असाच लिहिला गेला. तत्त्वचिंतकांची सुटी वाक्ये व काही वेळा नुसते शब्द ज्ञात होते. ह्यांना Fragments (तुकडे) असेच म्हणत. तरीही हे जमवून ग्रीक विचारवंतांच्या सिद्धांतांचा

स्थूल आराखडा तयार केला गेला. इथे तेच झाले आहे. रंग, आकार, पोत, नक्षी, कशाकशात साम्य नसलेल्या चिंध्यांची वाकळ शिवणे जसे कठीण तसाच निंबरगी संप्रदायाचा इतिहास लिहिणे मुष्कील. टाके घालणेच अवघड तर वाकळीला सुबक रूप कुठून येणार? अशा परिस्थितीत या पुस्तिकेचे धाडस करण्याचा एकमेव उद्देश म्हणजे, आहे तो वारसा जतन करणे. कालविध्वस्त पुस्तकांना व पोथ्यांना हात लावायचा अवकाश, त्या पानांचे तुकडे पडत. कागद जीर्ण होऊन भोके पडलेली असत. अर्धामुर्धा भाग नष्ट झालेला असे. पण आहे ते तरी जाऊ देऊ नये अशी तळमळ आहे. कागदावरची अक्षरे मोठ्या कष्टाने का होईना अजून वाचता येतात. उद्या तेही अशक्य होईल म्हणून जे हाती आले ते शब्दबद्ध करावे म्हणून हा मांड मांडला. कळत नकळत इतिहासाची साधने दृष्टीआड होतात. जुन्या घरांच्या रचना बदलतात. जुन्या वस्तूंच्या जागी नव्या चिजा येतात. हे घडताना ओळखीच्या खुणा पुसून जातात. मिळाली ती स्मृतिचिन्हे जपण्याचा हा प्रयत्न आहे.

जुन्या प्रमाणभूत टिपणांवरून जुळवलेला संप्रदायाचा बराचसा इतिहास 'चिंतनिका' या पुस्तकात आला आहे म्हणून त्याची इथे पुनरावृत्ती केली नाही. मात्र त्या पुस्तकाचा संदर्भ वेळोवेळी दिला आहे. प्रस्तुत पुस्तकाबरोबर 'चिंतनिका' वाचल्यास पुष्कळ गोष्टींचा उलगडा होईल. असो.

अशा सगळ्याच कामांत सुहृदांचा फार मोठा वाटा असतो. इथे तर त्यांची संख्या इतकी आहे की व्यक्तिशः उल्लेख केवळ अशक्य आहे. गुरुबंधू व गुरुभगिनी यांचे औपचारिक आभार मानून त्यांच्या सेवेला उणेपणा तरी का आणावा?

एखाद्या पुस्तकाची बांधणी सुटून पाने विस्कळित व्हावीत, वाऱ्याने ती इतस्ततः उडावीत, काही नष्टही व्हावीत, अशा वेळेला उरलेल्या पानांना पूर्ण पुस्तकाचा दर्जा येत नाही. निंबरगी संप्रदायाचा इतिहास मुळातच अलिखित आहे. सुटी पानेच आहेत. घडलेल्या इतिहासाला साक्षीदार असणारी मंडळी काळाच्या पडद्याआड गेली आहेत. पुरावा दशदिशांत विखुरलेला आहे. जी हिरे-माणके वाट्याला आली, ती आहेत निंबरगी संप्रदायाच्या इतिहासातली सोनेरी पाने!

सोलापूर
गुरुदेव रानडे पुण्यतिथी,
११ जून २०००

सौ. पद्मा कुलकर्णी



श्री गुरुलिंगजंगम महाराज यांची समाधी

प्रकरण पहिले

श्री निंबरगी महाराज

श्री गुरुलिंगजंगम महाराजांचे पूर्ण नाव नागप्पा भीमण्णा नीलवाणी. यांचा जन्म सोलापूर येथे शके १७१२, इ. स. १७८९ मध्ये झाला. त्यांचे वास्तव्य निंबरगी या गावी होते. त्यांना निंबरगी महाराज असेही म्हणतात. हे निंबरगी संप्रदायाचे मूळपुरुष. आपल्या दीर्घ आयुष्यात त्यांनी परमार्थाचा झेंडा रोवला. सदाचार व आत्मध्यान यांवर त्यांचा भर होता. इ. स. १८८५ मध्ये निंबरगी येथे त्यांचे निर्याण झाले. यांची चरित्रे प्रसिद्ध झाली आहेत.

निंबरगी महाराजांकडून रघुनाथप्रिय महाराजांनी अनुग्रह घेतला होता. ते मूळ आंध्र प्रदेशातील होते असे म्हणतात. त्यांची थोडी माहिती 'नित्यनेमावली'तील 'पंचसमासी'मध्ये पहिल्या समासात २८ ते ३५ या ओव्यांत आहे. 'बोधसुधे'च्या प्रस्तावनेतही त्यांचे अल्पचरित्र आहे. त्यांचे निर्याण चिम्मड येथे चैत्र शु. ३, शके १८०१, इ. स. १८७९ रोजी झाले. त्यांची समाधी चिम्मड येथे आहे.

निंबरगी संप्रदायाच्या पुढे दोन शाखा झाल्या. एक चिम्मडची शाखा. श्री रामभाऊ महाराज यरगट्टीकर हे निंबरगी महाराजांचे एक प्रमुख शिष्य होते. त्यांचा जन्म ज्येष्ठ शु. १०, शके १७५५, इ. स. १८३३ रोजी यरगट्टी येथे झाला. त्यांना चिम्मड महाराज या नावाने ओळखतात. त्यांचे निर्याण मार्गशीर्ष शु. ११, शके १८१४, इ. स. १८९१ला चिम्मड येथे झाले. त्यांची समाधी चिम्मड येथे आहे. चिम्मड शाखेने पुष्कळ भक्तिप्रसार केला आहे.

निंबरगी संप्रदायाची दुसरी शाखा म्हणजे इंचगेरी शाखा. याच शाखेबद्दल पुढील पानांत आपल्याला बोलावयाचे आहे.



श्री रघुनाथप्रिय महाराजांच्या पादुका



श्री रामभाऊ महाराज यरगट्टीकर यांच्या पादुका

१. निंबरगी महाराजांच्या समाधीचे मंदिर

श्री क्षेत्र निंबरगी म्हणजे कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यात वसलेले एक छोटेसे खेडे. याला देवर निंबरगी असे म्हणतात. गावाशेजारून एक नितळ पाण्याचा ओढा वाहतो. ओढ्याच्या काठावरील दाट पर्णराजीत पाखरांचा किलबिलाट चालतो. ओढ्याला पश्चिमेच्या बाजूला भक्कम घाट असून तीरावरचे भव्य पुरातन भीमरायाचे मंदिर एकदम डोळ्यांत भरते. भीमराय किंवा बलभीम हे इथले ग्रामदैवत. देवळाचे महाद्वार पूर्वेकडे उघडते. ते फार प्रेक्षणीय आहे. एखादी बैलगाडी सहज जाईल इतक्या रुंदीचा देवळाभोवती तट आहे. त्याच्या खाली ऐसपैस ओवऱ्या काढलेल्या आहेत. मंदिराच्या दक्षिणेकडील दारावर टुमदार नगारखाना आहे. देवासमोरील काळ्याशार दगडाची दीपमाळ आणि गाभाऱ्यावरचे नक्षीदार शिखर ही मंदिराची शोभा वाढवतात. एकूण या वास्तूची रचना अशी आहे की आवार विस्तीर्ण असूनसुद्धा ओवऱ्या, तट, मुख्य देऊळ हे सर्वच आटोपशीर असून दृष्टीच्या एका टप्प्यात येतात. प्रमाणबद्धता व साधेपणा हे या मंदिराचे विशेष सांगता येतील. बाहेरच्या बाजूला जुने ऐतिहासिक अवशेष आहेत. रोज संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळेला आवाराच्या एका कोपऱ्यात बसून सनईवाला मंजुळ सूर आळवतो. संधिकाल आधीच ध्यानानुकूल असतो. त्या वेळेला तिथल्या एखाद्या दगडावर बसावे आणि संगीताच्या पार्श्वभूमीवर नामावर मन केंद्रित करून क्षणभर का होईना ईश्वराचे सान्निध्य प्रत्यक्ष अनुभवावे.

लोकांच्या पायरवापासून दूर असलेल्या या गावात निंबरगी महाराजांचे उभे आयुष्य गेले. या श्रेष्ठ साक्षात्कारी सत्पुरुषाच्या जीवनातील अनेक घटना भीमरायाच्या देवळाशी निगडित आहेत. निंबरगी महाराज व भीमरायाचे देऊळ यांतील नाते अतूट आहे. 'बिळेन सिद्धांची ओवरी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ओवरीत ते दासबोधावर निरूपण करत. आज ओढ्याच्या अलीकडील काठावर म्हणजे गावाच्या बाजूला त्यांची समाधी दिसते. त्यांचा शिष्यपरिवार लहान होता पण त्यांत काहीजण उच्च पारमार्थिक पदवीला पोचलेले होते. व्यंकटेश खंडेराव देशपांडे किंवा भाऊसाहेब महाराज उमदीकर हे निंबरगी महाराजांच्या प्रमुख शिष्यांपैकी एक होते. संप्रदायाचे ते एक आधारस्तंभ होते. ते उमदी येथे राहत व प्रत्येक शनिवारी गुरुदर्शनासाठी निंबरगीला येत. बलभीमाच्या मंदिरात महाद्वाराच्या दक्षिण अंगाला असलेल्या पश्चिमाभिमुख ओवरीत ते उतरत असत. संप्रदायात यांचा उल्लेख 'महाराज' असा केला जातो. महाराजांचे एक निष्ठावंत शिष्य श्री अंबुराव किंवा 'बाबा' यांच्या पारमार्थिक जीवनाची सुरुवात निंबरगी गावातच झाली. बलभीमाच्या देवळाच्या बाहेरील कट्ट्यावर



भीमरायाच्या देवळातील महाराज उतरत ती ओवरी

त्यांना नाम मिळाले. महाराजांचे विशेष प्रसिद्धीला आलेले आणखी एक शिष्य म्हणजे प्रा. रा. द. रानडे. संप्रदायात हे 'गुरुदेव' म्हणून ओळखले जातात. निंबरगी महाराजांच्या ठिकाणी त्यांचा विशेष भक्तिभाव होता. अत्यंत उत्साहाने ते निंबरगीस जात. आपल्या परमगुरूंची समाधी म्हणजे गुरुदेवांना एक मोठेच आकर्षण होते.

निंबरगी महाराजांच्या देहान्तापासून ते त्यांच्या समाधीवर लिंगस्थापना होईपर्यंतची माहिती गुरुदेवांनी गोळा केली होती. त्यासाठी महाराजांच्या डायऱ्या व इतर कागदपत्रांचा उपयोग केला होता. काही मंडळी त्यांना या संबंधीची जुनी हस्तलिखिते आणून देत. कित्येकदा हे कागद म्हणजे नुसते चिठोरे असत. या सर्व साहित्यावरून समाधीचा व मंदिराचा संगतवार इतिहास लिहिण्याचा त्यांचा मानस होता. जादा माहिती मिळवण्यासाठी किंवा मिळालेली माहिती पडताळून पाहण्यासाठी संप्रदायातील ज्येष्ठ व्यक्तींबरोबर ते विचारविनिमय करीत. अशा व्यक्तींत नागप्पा नीलवाणी (निंबरगी महाराजांचे नातू) असत. निंबरगी येथील समाधीचा समग्र इतिहास लिहिता यावा अशी गुरुदेवांची अखेरपर्यंत खटपट चालू होती.

निंबरगी महाराजांची समाधी व देऊळ यांच्या बांधकामाबद्दल पहिल्यापासून कित्येक मंडळींना कळकळ होती. कोल्हापूर येथील प्रा. आर. एन. आपटे व डॉ. कृष्णाबाई

केळवकर, डेप्युटी कलेक्टर कृष्णाजी बळवंत मोघे, गोविंद दामोदर दीक्षित, नर्मदाबाई मुजुमदार, सांगलीच्या सौ. कृष्णक्का आपटे, वासुदेवराव दामले, आर. एस. वाजपेयी, डी. बी. ऊर्फ बाळासाहेब देशपांडे, बाबासाहेब संगोराम, श्री. ना. ऊर्फ साधुमामा देशपांडे, एस. एम. वाली वगैरेंचा वानगीदाखल उल्लेख करता येईल. निंबरगी महाराजांच्या सध्या असलेल्या समाधीची जागा सौ. कृष्णक्का आपटे यांच्या मालकीची होती. २४-११-१९२५ ला गुरुदेवांनी वासुदेवराव दामले यांना लिहिलेल्या पत्रात सौ. कृष्णक्का आपटे यांच्याकडून समाधीच्या जागेबद्दल अनुमतिदर्शक पत्र मिळाल्याचे कळवले होते. तसेच आर. एन. आपटे यांना गुरुदेवांनी विचारले होते की सौ. कृष्णक्का निंबरगीला येऊन गेल्या का? निंबरगीच्या चावडी रजिस्टरमध्ये नावात बदल झाला का? कृष्णाबाईंची जागा निंबरगी महाराजांच्या वंशजांच्या नावावर करण्या-संबंधी ही विचारणा असावी.

प्रो. आर. एन. आपटे यांनी ५-१२-१९२१ रोजी गुरुदेवांना पत्र लिहून निंबरगी महाराजांच्या गुरुसंप्रदायाबद्दल खालील गोष्टी कळवल्याः-

'हल्लीचे स्वामी हे काडसिद्धांपासून २६वे मठाधिकारी आहेत. त्यांचे गुरू म्हणजे विरूपाक्ष, विरूपाक्षांचे गुरू मुप्पिन स्वामी. ते जवळजवळ ५० वर्षे मठाधिकारी राहिले. ते एक थोर पुरुष होते. सिद्धगिरीस त्यांनीच प्रथम वास्तव्य केले. त्यापूर्वीचे स्वामी शिरसंगीस राहत व वर्षातून एकदा सिद्धगिरीस येत.

'निंबरगी महाराजांना १८१४ साली मुप्पिन मुनींकडून अनुग्रह मिळाला. मुप्पिनमुनी सिद्धगिरीस रहाण्यास आले व त्यांनी काडप्पा मठ सुरू केला. काडसिद्ध संप्रदायाचे संस्थापक काडसिद्धेश्वर यांचे देऊळ मुप्पिन मुनींनी बांधले.'

वरील हकीकतीवरून असे दिसते की २४व्या स्वामींकडून निंबरगी महाराजांना नाम मिळाले. परंतु १८१४च्या सुमारास २२वे किंवा २३वे स्वामी गादीवर असावेत असे 'काडसिद्धेश्वर-वचन' (संपादक, चंद्रशेखर शास्त्री, प्रकाशक, श्री जगद्गुरु मूरु साविरमठ ग्रंथमाला, हुबळी) या पुस्तकावरून वाटते. गोरव्वन कोळ्ळ, तालुका परसगड येथील मुप्पिन काडसिद्धस्वामी हे संप्रदायातील २२वे मठाधिकारी असून, रायर हुब्बळ्ळीचे काडसिद्धदेवरु हे २३वे मठाधिकारी होते. म्हणून असाही संभव आहे की या दोघांपैकी कुणाकडून तरी निंबरगी महाराजांना अनुग्रह मिळाला असावा.

निंबरगी महाराजांचा निर्याणकाल चैत्र शुद्ध १२/१३, शके १८०७, दि. २७/२८ मार्च १८८५, फसली १२९४, शुक्रवार/शनिवार. निर्याण मध्यरात्री झाल्यामुळे प्रत्येक

वेळी दोन दिवसांचा उल्लेख आहे. त्यांचा प्राणप्रयाणोत्सव पाहण्यास त्यांचे शिष्य भाऊसाहेब उमदीकर तिथे हजर होते. निंबरगी महाराजांच्या शरीरातून लखलखीत ज्योत निघून नारायणात मिळून गेलेली त्यांनी पाहिली.

निंबरगी महाराजांच्या निर्याणानंतर गावाच्या बाजूने वाहणाऱ्या ओढ्याच्या पश्चिम काठावर त्यांची समाधी बांधली गेली. ती जागा गावातल्या गुरवाची होती. गावचा पाटील मलकप्पा हा निंबरगी महाराजांचा भक्त होता. साहजिकच त्याच्या अखत्यारीत समाधीच्या जागी या महापुरुषाच्या पुण्यतिथीचा उत्सव मोठ्या थाटाने होत असे. हाच चैत्रसप्ताह. जवळजवळ १९०० सालापर्यंत हे सुरळीत चालले होते. पण गुण्यागोविंदाने चाललेल्या गोष्टींत विघ्न आणल्याशिवाय कालपुरुषाला चैन पडत नाही. समाधीच्या जागेबद्दलच्या व उत्सवाबद्दलच्या कुरबुरी गावात धुमसत होत्या. निंबरगीच्या नीलगंगव्वा पाटलिणीला निंबरगी महाराजांबद्दल आदर असा मुळीच नव्हता. उत्सवाबद्दल तिची तक्रार असे. लोकांनी देवासाठी आणलेल्या नारळ, कापूर वगैरे वस्तू निंबरगी महाराजांच्या समाधीकडे येऊ लागल्या. भीमरायाच्या देवळाकडील लोकांचा ओढा कमी होतो आहे की काय असे तिला वाटू लागले. गुरवांच्या उत्पन्नावर याचा परिणाम दिसू लागला. तेव्हा तिने निंबरगी महाराजांचा मुलगा भीमण्णा याला जरब देण्यास सुरुवात केली. मलकप्पाच्या मृत्यूनंतर पाटलिणीला जोर चढला. गावातल्या चारचौघांशी मसलत करून तिने उत्सवास हरकत घ्यायला सुरुवात केली. आता यातून काहीतरी मार्ग काढणे भागच होते. १९०० साली ५०' × ८०' अशी जागा समाधीकरिता घेतली होती व त्याबाबत भीमण्णा व नर्मदाबाई मुजुमदार यांच्यात एक करार झाला होता. (नंतरच्या काळात जत संस्थानात एक मुजुमदार म्हणून कारभारी होते. त्यांचा व गुरुदेवांचा पत्रव्यवहार झाला होता. हे मुजुमदार नर्मदाबाईंचे वंशज होते किंवा काय नक्की कळले नाही). तसेच निंबरगी महाराजांचे नातू सुब्बराय यांनी डेप्युटी कलेक्टर कृष्णाजी बल्लाळ भिडे यांच्याकडे देण्याचा तडजोडीचा मसुदा २०-४-१९०१ रोजी तयार केला असून आपल्या स्वतःच्या जागेत निंबरगी महाराजांच्या अस्थी आणून त्यांवर समाधी बांधण्याची परवानगी मागितली होती. पुण्यतिथीच्या उत्सवास हरकत येण्याचे प्रकरण मिटावे असा त्यांचा उद्देश होता. पण प्रकरण मिटले तर नाहीच, उलट जास्त चिघळत गेले. पर्यायी समाधी कुठे करावी याच्या विचारासाठी अधिकारी मंडळी निंबरगीला येऊजाऊ लागली. ही मंडळी बूट घालून भीमरायाच्या देवळात इकडे तिकडे हिंडली. त्यामुळे गुरवांचे मन खट्टू झाले. त्याचा फायदा घेऊन गुरवांना चिथवण्यात आले. प्रकरण विकोपाला गेले

निंबरगी महाराजांची पहिली समाधी गुरवांनी माघ शु. १४, शके १८२२, शनिवार ता. २ फेब्रुवारी १९०१ रोजी दगड वगैरे काढून बुजवली. पहिल्या वर्षी दगड काढून झाले. दुसऱ्या वर्षी जागेवर चक्क नांगर फिरवला गेला. समाधीच्या जागेची अशी अवस्था झाल्यामुळे त्या वर्षीचा चैत्रसप्ताह तिथे न होता गावात साजरा झाला. भाऊसाहेब महाराज ह्या सप्ताहास गेले होते. १९०२ सालीही हा सप्ताह गावातच झाला. हा पुण्यतिथीचा सप्ताह चैत्र शु. १३स एक दिवस होत असे. १९०३ ते १९१० या काळात निंबरगीत होणाऱ्या चैत्रसप्ताहाची कुठल्याच दप्तरी नोंद नाही. जाता जाता आणखी एका गोष्टीचा उल्लेख करता येईल. निंबरगी महाराजांनी देह ठेवल्यावर निंबरगी येथे मार्गशीर्षसप्ताहही सात दिवस (मार्गशीष शु. ९ ते पौर्णिमा) साजरा होत होता. १९०० सालानंतरची याही सप्ताहाची माहिती मिळत नाही.

निंबरगी महाराजांची समाधी बुजवल्याबद्दल कायदेशीर काम पुढे नरसप्पांनी चालविले. ते पुढे भाऊसाहेब महाराजांनी "मध्यस्थीनेच" मिटविले. उपलब्ध झालेल्या टिपणात "मध्यस्थीनेच" हा शब्द दुहेरी अवतरणचिन्हात घातला आहे. ते का, हे मात्र कळत नाही. तसेच महाराजांनी मध्यस्थी केली म्हणजे नक्की काय केले याचा काहीच उलगडा होत नाही. कायदेशीर काम पुढे चालवणारे नरसप्पा कोण याबद्दलही खात्रीलायक पुरावा नाही. नरसप्पा म्हटले की नरसप्पा शापेटी आपोआप डोळ्यांसमोर येतात. परंतु संप्रदायात आणखी एक नरसप्पा आहेत. विजापूरला नरसप्पा सुतार हे नामधारक होते. समाधीबद्दलचा कायदेशीर इलाज ह्यांनी केला असावा. नरसप्पा शापेटी कोर्टकचेरी करण्याइतके सधन नव्हते.

समाधीची जागा, जागेची मालकी किंवा पुण्यतिथीचा उत्सव याबद्दलचा १९०३ नंतरचा काहीच दस्तऐवज मिळत नाही. १९१० साली एक नवीन घटना घडली. मूळ समाधीच्या ओढ्याच्या पलीकडच्या जागेतून निंबरगी महाराजांच्या अस्थी अलीकडच्या बाजूला आणल्या गेल्या. यामध्ये डेप्युटी कलेक्टर कृष्णाजी बळवंत मोघे यांनी पुढाकार घेतला असे वाटते. या घटनेचा दिवस म्हणजे दि. १/२ जानेवारी १९१०, मार्गशीर्ष वद्य ६/७, शके १८३१, शनिवार/रविवार. निंबरगी महाराजांचा नातू सुब्बराय याच्या हातून अस्थी काढल्या. त्यावेळेस आपटे फौजदार, रावबहादूर कृष्णाजी बळवंत मोघे, नागप्पा नीलवाणी हे हजर होते. अस्थी मध्यरात्री काढल्या व त्या ओढ्याच्या अलीकडील म्हणजे पूर्वेच्या काठावर आणल्या. त्या एका तांब्याच्या डब्यात घालून सध्याच्या समाधीच्या जागेत ठेवल्या. लागलीच त्याच्यावर कट्टा बांधला. इतके होईपर्यंत सूर्य क्षितिजावर अर्धा आला होता, असे नागप्पांच्या पत्रात आहे. हे पत्र

३-१-१९१० रोजी नागप्पांनी नंदेप्पा न्यामगौडा, जमखंडी, यांना लिहिले आहे.



१९१० सालचा समाधिकट्टा

यानंतरचा १५-१६ वर्षांचा वृत्तांत पुन्हा अज्ञात आहे. १९२६च्या सुमारास समाधीवर देऊळ बांधण्याच्या कल्पनेला मूर्त स्वरूप आले. गणेश चतुर्थी, शके १८४८, शनिवार, दि. ११-९-१९२६ रोजी, १९१० साली बांधलेला कट्टा वाढवून हल्लीचे देऊळ बांधण्यास सुरुवात झाली. ता. ६-९-१९२६ रोजी वासुदेवराव दामले यांना लिहिलेल्या पत्रात गुरुदेवांनी विचारले होते की बाळासाहेब देशपांडे यांनी समाधीसाठी सेल्लिकेरी दगड विजापूरला पाठविला आहे का? दुसऱ्या एका पत्रान्वये असे कळते की सेल्लिकेरी दगड आला होता. सेल्लिकेरी हे गाव कलादगीजवळ (जि. बागलकोट) असून तिथले दगड प्रसिद्ध आहेत. निंबरगी महाराजांच्या समाधीवर पादुकांऐवजी लिंग बसविण्याचा विचार सुरू झाला. सेल्लिकेरीहून आणलेल्या दगडातून लिंग होईल का, असेही वासुदेवराव दामले यांना निंबाळहून ४-८-१९२६ रोजी लिहिलेल्या पत्राने गुरुदेवांनी विचारले आहे. या कामासाठी नागप्पा वरचेवर निंबाळला येत. लिंग विजापूरला घडवावे की निंबरगीतच ते काम करावे वगैरे प्रश्नांबद्दल दोघात विचारविनिमय चाले. नागप्पांना बांधकामासाठी जसे लागतील तसे पैसे निंबरगी फंडातून द्यावे असे वासुदेवराव दामल्यांना २०-१-१९२७ व १२-६-१९२७ अशा तारखांच्या पत्रांन्वये

गुरुदेवांनी कळवले आहे. त्यावेळी निंबरगी येथील बांधकामासाठी वेगळा फंड ठेवला असून विजापूरला सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेत त्याच्यासाठी स्वतंत्र खाते उघडले होते. डॉ. कृष्णाबाई केळवकर व प्रो. आर. एन. आपटे यांच्याकडून प्रत्येकी २०० रुपये आले होते व त्यांत आणखी एक रुपया घालून ४०१ रुपयांचा चेक गुरुदेवांनी २७-८-१९२६ रोजी दामल्यांना पाठवला होता. दामले विजापूरला होते व बँकेचा व्यवहार पहात असत. समाधीच्या कामाला जोर लावण्याची विनंती पत्रात आहेच. पुढे वृंदावनाचे दगड व लिंग तयार झाल्याचे ऐकून गुरुदेवांनी ५-२-१९२८ला आपला आनंद व्यक्त करणारे पत्र दामले यांना अलाहाबादहून लिहिले.

निंबरगी महाराजांच्या समाधीवर लिंगस्थापना २७-४-१९२९ रोजी झाली. निंबरगी महाराजांच्या पुण्यतिथीचा सप्ताह चैत्र शु. १३ ते चैत्र वद्य ४, शके १८५१ असा झाला (२०-४-१९२९ ते २७-४-१९२९). लिंगस्थापनेच्या समारंभाचे निमंत्रण कृष्णाजी बळवंत मोघे यांना गेले होते. त्याला उत्तर म्हणून नागप्पा नीलवाणी यांना ते लिहितात, 'श्रींची स्थापना व सप्ताहसमारंभ येत्या चैत्र कृ. ४ रोजी निश्चित असून त्याबद्दलचे आज्ञापत्र पोचले'. प्रकृति-अस्वास्थ्यामुळे ते समारंभास जाऊ शकत नसल्याचे पुढे त्यांनी लिहिले आहे. या पत्रातच रावसाहेब आपटे व सौ. अक्कासाहेब (कृष्णक्का) आपटेही क़ाही अडचणीमुळे येऊ शकत नाहीत असे लिहिले आहे. निंबरगी महाराजांच्या समाधीची जागा सौ. कृष्णक्का आपटे यांची असल्याने त्यांनाही आमंत्रण असावे. निंबरगी येथे पत्र्याचा सभामंटप १९२९ साली झाला. पुढील कट्ट्यावर १९३६मध्ये तीन सुंदर कमानी बांधल्या गेल्या. या सुमारास कमानी असलेल्या कट्ट्याच्या खाली एक गुहा किंवा तळघर बांधण्याचा बेत झाला होता. ती जागा मोकळी ठेवली होती. सध्या मंदिरात जिथे घंटा टांगली आहे तिच्या खाली तळघराचे तोंड ठेवले होते. खाली उतरायला पायऱ्या केल्या होत्या. नंतर आतून पाणी यायला लागल्यामुळे तळघर करण्याची कल्पना रहित करावी लागली. साधुमामा देशपांडे निंबरगीला राहून बांधकामा-वर देखरेख करत होते. १९४२ नंतर निंबरगी हेच त्यांचे कार्यक्षेत्र झाले होते. अलाहाबादहून प्रल्हाद कुलकर्णी यांच्या हस्ते लिहिलेले गुरुदेवांचे १०-९-१९४४चे पत्र साधुमामांना गेले. त्यात असे लिहिले आहे की तळघराचा बेत रद्द झाला ते ठीकच झाले. त्याऐवजी सभामंटपाच्या पत्र्यांना लागून बाहेरच्या बाजूला ८-९ फूट उंचीची भिंत बांधावी. तसेच पुढे दरवाजा लावून देऊळ व सभामंटप बंदिस्त करावा. तळघर बांधायचे नाही असे ठरल्यावर त्याच्यासाठी आणलेल्या तुळया कट्ट्यावर छत करण्याच्या कामी उपयोगात आणल्या. या पत्रात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. बाबासाहेब

संगोराम व भगवानसिंग मेस्त्री हे निंबरगीस आल्यावेळी समोरील कमानीचा एक दगड बसवून मुहूर्त केला, याचा आनंद गुरुदेवांनी व्यक्त केला आहे. ही कमान दरवाजाची असावी. असो. पुढे १९४६ साली देवळासमोर प्रशस्त सभामंटप झाला.

या सुमारास दर पौर्णिमेला मंडळी निंबरगीला जाऊन एक दिवस सप्ताह करीत असे दिसते. तसे गुरुदेवांच्या एक-दोन पत्रांत आहे. चैत्रातील सप्ताहही थाटाने होत असावा. कारण १३-४-१९४४च्या एक पत्रात ह्या उत्सवाला शोभा आली होती ही फार आनंदाची गोष्ट आहे, असेही गुरुदेवांनी नमूद केले आहे. निंबरगी हे मूळस्थान असल्याने तिथे उत्सव व्हावे असे गुरुदेवांना नेहमी वाटत असे. निंबरगी महाराजांचे देऊळ हा गुरुदेवांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. त्यांचे लक्ष सतत तिकडे असे. देवळाचे महत्त्व कसे वाढेल ही गोष्ट नेहमी त्यांच्या मनात घोळत असे. वासुदेवराव दामले, बाळासाहेब देशपांडे, वाजपेयी मामलेदार, गोपाळराव गजेंद्रगडकर अशा मंडळींना लिहिलेल्या पत्रांवरून निंबरगीचे वैभव वाढवण्याकडे गुरुदेवांची कशी दृष्टी लागली होती हे कळते. ११ मार्च १९४३ला विजापूरचे डेप्युटी कलेक्टर रावबहादूर पी. बी. हर्ती यांना गुरुदेवांनी अलाहाबादहून पत्र लिहून निंबरगीच्या देवळाच्या बांधकामाची माहिती कळवली आहे. या कामासाठी बाबासाहेब संगोराम तुम्हाला विजापूरला येऊन भेटतील असे त्यांना कळवले आहे. तसेच २२-१-१९५० रोजी इंडीचे मामलेदार रावसाहेब एच. एस. होसमनी यांनाही गुरुदेवांनी पत्र लिहिले आहे. आदल्या वर्षी पाऊस फार पडल्याने देवळाच्या बाहेरच्या भिंती अर्ध्यामुर्ध्या वाहून गेल्या होत्या. पुराने ज्यांचे नुकसान झाले होते त्यांना सरकारकडून पत्रे दिले जाणार होते. देवळाचे नुकसान झालेच होते. म्हणून पत्रे मिळाले तर तोंडाशी आलेल्या निंबरगी महाराजांच्या सप्ताहास येणाऱ्या साधकांची रहाण्याची थोडीफार सोय होणार होती. होसमनी या बाबतीत काही करू शकतील अशी गुरुदेवांची अटकळ होती. देवळावर शिखर व्हावे अशी गुरुदेवांची मनापासून इच्छा होती. प्रा. कृष्णराव गजेंद्रगडकर यांनी शिखरासाठी सामानही आणले होते. दुर्दैवाने १९४९ सालच्या मुसळधार पावसाने ओढा दुथडी भरून वाहू लागला व सर्व सामान पाण्याबरोबर वाहून गेले. गुरुदेवांना याचे फार वाईट वाटले.

कित्येक दिवस निंबरगी महाराजांच्या पहिल्या समाधीची जागा शोधण्याकडे गुरुदेवांचे ध्यान लागले होते. त्या दिशेने त्यांची काही ना काही हालचाल चालू होती. ओढ्याच्या पश्चिमेकडची जागा त्यांनी खरेदी केली होती. गुरुदेवांच्या छत्राखाली निंबाळला रहात असलेले भाऊ निंबरगी यांनी या विषयासंबंधी बी. आर. कुलकर्णी यांना ९-३-१९५६

रोजी लिहिलेले पत्र बोलके आहे. जीवनाच्या अखेरपर्यंत गुरुदेवांचे लक्ष निंबरगीकडे होते हे स्पष्ट दाखवणारे हे पत्र आहे. पत्रात खालील मजकूर आहे:-

'... निंबरगी महाराजांच्या पहिल्या समाधीची जागा आमच्या ताब्यात आली आहे. तर श्री निंबरगी महाराजांच्या समाधीची जागा खणून त्यावेळचे काही सापडते का हे पहावयाचे महत्त्वाचे काम सध्या चालू होणार आहे. त्यासाठी पूर्वीची समाधी पाहिलेले असे श्री. लक्ष्मण भटजी निंबरगी व पूर्वीची समाधी बांधलेला इसम रामचंद्रप्पा होन्नकळसे, विजापूर येथे येऊन, इंडीस जाऊन, श्री प्रांतसाहेब वालीसाहेब यांचे बरोबर दोन दिवसांत निंबरगीस जातील व ती जागा पाहून कोनाडा व इतर गोष्टी शोधून पहाण्याचे काम चालू होईल, व त्या जागी पुढे काय करावे या महत्त्वाच्या विषयाचा विचार चालला आहे...'

याप्रमाणे काम होऊन वरील मंडळींनी एक जागा अंदाजाने ठरवली.

पुढे गुरुदेवांच्या निर्याणानंतर शुक्रवार ता. ९-२-१९६२ रोजी सकाळी साडेनऊ वाजता मैसूर राज्याचे मुख्यमंत्री बी. डी. जत्ती यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यानंतर सुमारे दोन महिन्यांनी, मंगळवार ता. १७ एप्रिल १९६२ रोजी सकाळी साडेदहा वाजता ओरिसा प्रांताचे राज्यपाल वाय. एन. सुकथनकर, आय.सी.एस. यांच्या हस्ते त्या जागेवर दगडी चबुतऱ्याचा कोनशिलासमारंभ झाला. या समारंभाची त्यावेळची निमंत्रणपत्रिका उपलब्ध आहे. ही पत्रिका गुरुलिंगप्पा भाऊराव मंगळवेढे (निंबरगी महाराजांचे पणतू) यांच्या नावाने काढलेली आहे. आज हा कट्टा ओढ्यापलीकडे दिसतो.

१९७१ साली दिल्ली, यवतमाळ, मुंबई, अथणी, सांगली, धारवाड, गदग, विजापूर, हरिहर, हुबळी, वगैरे ठिकाणच्या साधकांनी पुढाकार घेऊन देवळावर एक सुंदर शिखर बांधले. गाभाऱ्यात संगमरवरी काम करून घेतले व सभामंटपाची दुरुस्ती केली. १९९२-९३ साली देवळाच्या मागच्या बाजूला एक खोली बांधून सप्ताहास येणाऱ्या मंडळींची सोय केली गेली. तीन शौचालयेही झाली. १९९६-९७च्या दरम्यान आणखी एक शौचालय व चार न्हाणीघरे बांधून तयार झाली. निंबरगीला जाणाऱ्या साधकांची आता गैरसोय होत नाही.

निंबरगी महाराजांच्या समाधीची व्यवस्था पाहण्यास श्री गुरुलिंगजंगम महाराज मंदिर ट्रस्ट झाला आहे. १९९१ सालापासून या ट्रस्टने भाऊसाहेब महाराजांच्या वेळेपासून चालत आलेला मार्गशीर्षसप्ताह पुन्हा सुरू केला. हल्ली हा सप्ताह मार्गशीर्ष शु. ११

(गीताजयंती), ते मार्गशीर्ष पौर्णिमा (दत्तजयंती), असा पाच दिवस होतो. चैत्र शु. ९ ते १३ पर्यंत निंबरगी महाराजांच्या पुण्यतिथीचा सप्ताह निंबरगीला साजरा होतच असतो.



१९६२ सालचा समाधिकट्टा

गुरुसिद्धप्पा नागप्पा नीलवाणी यांनी सांगितलेल्या माहितीप्रमाणे निंबरगीस चार सप्ताह साजरे होत होते.

१. चैत्र शु. ९ ते १३, पाच दिवस, निंबरगी महाराजांची पुण्यतिथी.

२. श्रावण सप्ताह १ महिना, याला साधनसप्ताह म्हणत असत.

३. मार्गशीर्ष सप्ताह, सात दिवस, मार्गशीर्ष शु. ९ ते पौर्णिमा.

४. माघ शु. १ ते ३, तीन दिवस, भाऊसाहेब महाराजांची पुण्यतिथी.

२. बिळेन सिद्ध

निंबरगीला भीमरायाच्या देवळात 'बिळेन सिद्धांची ओवरी' आहे. तिच्याशी तीन गोष्टी निगडित आहेत.

(अ) विजापूरजवळ अरकेरी नावाचे गाव आहे. तिथे अमोघसिद्ध नावाचे एक संत होते. यांचा मुलगा बिळेन सिद्ध. बिळेन सिद्ध हेही मोठे सत्पुरुष होऊन गेले. भेवरगी (ता. जत) इथे त्यांचे वास्तव्य असे. जुन्या काळी निंबरगीचे एक पाटील बिळेन



बिळेन सिद्धांची ओवरी

सिद्धांचे निष्ठावंत भक्त असून ते रोज भेवरगीला जाऊन सद्गुरूंचे दर्शन घेत व मगच अन्नग्रहण करीत. एकदा त्यांच्या स्वप्नात बिळेन सिद्ध आले व म्हणाले की तुला रोज रोज इथे येण्याजाण्याचा त्रास होतो, म्हणून मीच निंबरगीस येतो. निंबरगीच्या भीमरायाच्या देवळातील एका ओवरीत त्यांचे अधिष्ठान आहे असा पाटलाला अनुभव आला. अमोघसिद्ध जसे काही तिथे येऊन राहिले आहेत अशी त्याची भावना झाली. तेव्हापासून त्या ओवरीला 'बिळेन सिद्धांची ओवरी' असे नाव पडले. भीमरायाच्या उजव्या अंगाला तटाखाली ही प्रशस्त ओवरी आहे. आता तिथे काही मूर्ती ठेवल्या आहेत. या ओवरीत निंबरगी महाराज ध्यानास बसत व दासबोधावर निरूपणही करत. एकूण भीमरायाच्या देवळाला एक साधुनिवास म्हणणे अगदी यथार्थ आहे.

(आ) दुसरी घटना निंबरगी महाराजांच्या हयातीत घडलेली आहे. निंबरगीचा पाटील मलकप्पा हा त्यांचा भक्त होता. काही एका तंट्याबखेड्यापायी त्याची कोर्टकचेरी चालू होती. मुंबईस हायकोर्टाकडे हे प्रकरण गेले होते. खटल्याच्या कामासाठी मलकप्पा पाटील मुंबईस निघाला. जाण्याआधी निंबरगी महाराजांना तो भेटायला आला. ते बिळेन सिद्धांच्या ओवरीत होते. 'तुम्ही आशीर्वाद द्या', म्हणून नमस्कार करून मलकप्पा उभा राहिला. 'ठीक होईल' असे निंबरगी महाराज म्हणाले.

मलकप्पा मुंबईस गेल्यानंतर एक दिवस दुपारी निंबरगी महाराज बिळेन सिद्धांच्या ओवरीत विश्रांती घेत होते. नरसप्पा शापेटी व मलकप्पाचा मोठा भाऊ वासप्पा त्यांचे पाय दाबत होते. एकदम निंबरगी महाराजांचे अंग गार पडले. इतके की ते गेलेच आहेत अशी या दोघांनाही भीती वाटली. पण दुसऱ्याला सांगण्याचे एकालाही धैर्य होईना. दोघांचेही अवसान गळाले, तरी ते तसेच मुकाट्याने पाय दाबत राहिले. उणा-पुरा तास गेला. नंतर एकदम निंबरगी महाराज जागे झाले व म्हणाले, 'नरसप्पा, मलकप्पाच्या खटल्याचा निकाल त्याच्या बाजूने लागला'. चार दिवसांनी मलकप्पा मुंबईहून आला व निकालाची साखर वाटू लागला. नरसप्पा दिसल्यावर त्यांनाही साखर दिली. 'कशाची साखर?' असे नरसप्पांनी विचारले. साखरेचे भांडे खाली ठेवून मलकप्पा रडू लागला. 'काय झाले?' या नरसप्पाच्या प्रश्नाला त्याने उत्तर दिले, 'माझ्या बाजूने निकाल लागला यात काहीच आश्चर्य नाही. खटला चालू असताना अर्धा-पाऊण तास निंबरगी महाराज कांबळे पांघरून जज्जच्या मागे उभे असलेले मला दिसले. असा आशीर्वाद असल्यावर निकाल माझ्या बाजूने होईल ह्यात नवल ते काय?'

(इ) बिळेन सिद्धांचे वडील अमोघसिद्ध यांच्याबद्दलची एक कथा प्रचलित आहे. कथेत बिळेन सिद्धांचाही भाग आहे. या कथेवर कन्नड भाषेत एक ढोलाच्या साथीवर म्हटलेले पद (डोळ्ळिन पद) रचलेले आहे. त्याला पोवाडा म्हणता येईल. मौखिक परंपरेतून आलेल्या या पोवाड्यात कधी कधी गावांच्या नावांची गल्लत होते. काही वेळेस एखादा शब्द किंवा एखादी ओळही सुटलेली जाणवते. या पदावरून दोन गोष्टी लक्षात घेता येण्यासारख्या आहेत. बिळेन सिद्ध हे मोठे साधुपुरुष होऊन गेले. पण साधुत्व जन्मजात असते असे नाही, ते तपश्चर्येने मिळते. तत्पूर्वी साधूच्या आयुष्यातही सामान्य माणसाप्रमाणे कधी कधी असे प्रसंग घडतात की द्वेष किंवा असूया हे विकार त्यांच्या ठिकाणी दिसतात. हाडामासाचा देह त्याला खाली खेचू पहात असतो. पण साधक प्रखर साधनाने षड्रिपूंवर मात करतो व साधुत्वाची पदवी मिळवतो. बिळेन सिद्धांच्या पूर्वायुष्यातील अशाच एका घटनेचा पोवाड्यात उल्लेख आहे. दुसरी एक गोष्ट या पदातून स्पष्ट होते. पारमार्थिक अधिकार वडिलांकडून मुलांकडे येत नसतो. तो गुरूकडून शिष्याकडे जातो. परमार्थात वारसाहक्क नाही. शिष्याला स्वतःच्या तपोबलाने अधिकार प्राप्त होतो. कधीकधी असेही घडते की जन्मदाते वडीलच सद्गुरू असून मुलगा त्यांच्याकडून अनुग्रह घेऊन त्यांचा शिष्य होतो. अशा वेळेला

मुलाला पारमार्थिक कार्याचा अधिकार मिळाला तर तो मुलगा म्हणून नव्हे, तर शिष्य म्हणून मिळतो. या दोन महत्त्वाच्या गोष्टी पदात आल्या आहेत. म्हणून थोडे विषयांवर पत्करून हा पोवाडा पाहायचा आहे. मूळ कन्नड पद व त्याचा मराठी भावार्थ पाहू.

ढोलाबरोबर म्हणण्याच्या पदाची पद्धत अशी आहे की आधी देवाला अक्षद द्यायची आणि मग कथा सुरू करायची.

स्वामी नम्मय देवरु बंदान घे
शिवने नम्मय देवरु बंदान घे।।
मर्त्यके बंदा कैलास योगि
मूरूर मुंगडि मुम्मेटगि
अवनिगे अंदार साधु अम्मोगि। केळिरप्पा
अवनिगे अंदार साधु अम्मोगि।।प।।
अरमनि माड्यान अरकेरिगे
गुरुमनि माड्यान भेवरगि ऊरिगे
महादेवन इळिस्यान मकणापूरिगे
मायनाद मकणापूर
जालिगेर ऊर सिद्दापूर
पद्मव्वन्निट्टान अरकेरि ऊरिगे।
जाग नोडि माड्यान मेट्ट
मूरूर मुंगडि मुम्मेट्ट
कोरि कंति निशानि अवनिगे। केळिरप्पा
कोरि कंति निशानि अवनिगे।।
महादेव कोट्टा प्रसाद गंटा मायद मग मासिद्दप्पा
ओय्दु इट्टा भंडार कवटीगे।
अवतार अवधूत सिद्ध
देवींद्र बिळियन सिद्ध
संशय बंदु केळ्यार तंदिगे।
नित्र मायद मादू कळ्ळा
नमग माडि होद मळ्ळा
प्रसाद गंटा ओय्दानेल्लिगे।

अवनिगे होडेदु बरतीवि ठार
अवतार तोट्ट निंतारवर
बंगार जीना हाक्यार कुदुरिगे।
बेळ्ळिय तंगा बंगार जीना
राक्षसनेंबुव लगामु खूना
म्याल कुंतु बिट्टार तेजीगे।
अंतर गमन देवर तेजि
ओत्तर माडि बंदारप्पा
शहाळ्या अंबा भीमानदिगे। केळिरप्पा
शहाळ्या अंबा भीमानदिगे।।
अष्टरदाग मासिद्दप्पा
होळेय दाटि नडेदानप्पा
धर्मरु हकार होडेदारवनिगे।
कळवु माडि तंदि प्रसाद गंटा
होळेय दाटि उळिद्यो बंटा
बिडुदिल्ल अंदार मासिद्द योगिगे।
होळ्याग बिट्टान प्रसाद गंटा
बरलिल्ल मासिद्दप्पन बिट्टा
धर्मरु शाप कोट्टारवरीगे। केळिरप्पा
धर्मरु शाप कोट्टारवरीगे।।
मासिद्द शाप कोट्टानवर
अन्न पान भेवरिगि ऊर
बेडिकोंडु होगिरो गंगनाडिगे।
यारिगे तिळिदिल्ल देवर आटा
मासिद्द कट्टिस्यान एळु मठा
भंडार तळा भंडार कवटीगे।
भारत हुण्णिवि एल्ला अळिदु
डोणद गूळि बंदद तिळिदु
बान हेरि रात्रि वेळीगे। केळिरप्पा
बान हेरि रात्रि वेळीगे।।

मुंगारि हिंगारि माड्यार होय्कि
बल्लवरु माडिकोरि तूक
नंबिगिट्ट नडीरि देवरिगे।
मठ मनि माड्यान मासिद्द हुट्टि
डाळजक कट्टिस्यार चक्कर कट्टि
निजरूप तोरिसि बिट्टान धर्मरिगे।
वरुषके ओम्मे तंदेय भेट्टि
खारीक खोब्बरि भंडार लूटि
मुम्मोटि गुड्डद मुत्त्यान जात्रिगे। केळिरप्पा
मुम्मोटि गुड्डद मुत्त्यान जात्रिगे।।
हाविनाळ चंद्रामन हाडिके छंदा
हुन्नूर सिद्धन दयदिंद
कलिसि बिट्टान निंबरगि हुडुगरिगे।।
हालमतद हरिव सागर देवरु बंदान घे।
गिरि ओंदु कोणदनूरेनो देवरु बंदान घे।

मराठी भावार्थ

गुरूच आमचा देव आहे. त्याचं चांगभलं.

आमचा देव शिव आला आहे. त्याचं चांगभलं.

ऐका हो ऐका. कैलासावरचा योगी मर्त्यलोकात अवतरला. त्याला अमोघसिद्ध म्हणतात. तीन गावांच्या सीमा भिडतात तिथे त्याने वास्तव्य केले.

त्याचा राजवाडा अरकेरी गावात होता, गुरूंचे स्थान भेवरगी गावी होते. मकणापूर गावाला त्याने महादेवाला अवतार घ्यायला लावले व मकणापूरलाच चिरविश्रांती घेतली. आपली बायको पद्मव्वा हिला त्याने अरकेरी या गावात ठेवले होते. तीन गावांच्या सीमेवर त्याने ठाण मांडले होते. निशाण म्हणून काळ्या कांबळ्याचा एक तुकडा आणि एक प्रसादाचे गाठोडे कैलासाहून निघताना त्याला शंकराने दिले होते. अमोघसिद्धाने मासिद्दप्पा (महासिद्धप्पा) नावाचा एक मुलगा सांभाळला होता. कैलासाहून येताना आणलेले प्रसादाचे गाठोडे व निशाण अमोघसिद्धाने मासिद्दप्पाला दिले व त्याने ते भंडारकवठ्याला ठेवले. अवधूत अवतार सिद्ध आणि देवेंद्र बिळेन सिद्ध ही दोन अमोघसिद्धाची मुले होती. मासिद्दप्पाने प्रसाद व निशाण भंडारकवठ्याला का बरे ठेवले

अशा संशयपिशाच्च्याने त्या दोघांना घेरले. आपण वारस असताना त्या पाळीव मुलाला वस्तू दिल्या हा रोष आधीच त्यांच्या मनात होता. वडिलांकडे जाऊन या दोघांनी त्यांना आव्हान दिले. 'तुमचा तो लाडका मासिद्दप्पा पक्का चोर आहे. आमच्या तोंडाला त्याने पाने पुसली. प्रसादाचे गाठोडे त्याने कसे पळवले? आम्ही त्याचा पुरा निकाल लावून येतो'. दोघांनी रुद्रावतार धारण केला. एक उमदा घोडा आणला. त्याच्यावर सोन्याचे जीन घातले. चांदीचे खोगीर चढवले. राक्षसी लगाम हातात घेऊन घोड्यावर मांड ठोकली. जणू काही आकाशमार्गाने जावे अशा वेगाने ते निघाले. बघता बघता शहाळी आणि आंबे यांनी नटलेल्या भीमेच्या तीरावर येऊन दाखल झाले. मासिद्दप्पा तोवर भीमेच्या पार गेला होता. खरं-खोटं करण्यासाठी दोघा भावांनी हाकारा केला. 'अरे, प्रसादाची चोरी करून पळालास, जीव वाचवायला नदीपार गेलास खरा, पण आम्ही तुला सोडतो काय?' आपल्यामागे हा ससेमिरा नकोच म्हणून मासिद्दप्पाने प्रसादाचे गाठोडे नदीत टाकून दिले. पण काय गंमत पहा, ते गाठोडे पुन्हा त्याच्याकडेच गेले, त्याला सोडीचना. धर्मशील लोकांनी दोघा भावांना शाप दिला. तसेच मासिद्दप्पानेही शाप दिला, "तुमच्या भेवरगी गावात कायम दुष्काळ पडेल. गंग राजांच्या प्रदेशात जाऊन तुम्हाला भिक्षांदेही करावी लागेल. देवाची लीला कुणाला उमगली आहे?"

मासिद्दप्पाने पुढे सात मठांची स्थापना केली. प्रसाद भंडारकवठ्याला ठेवला. तिथे भारत-पौर्णिमेला (माघ-पौर्णिमेला) मोठी जत्रा भरते. डोण नावाच्या मोठ्या ओढ्याच्या काठावरचा एक पोळ सगळ्यांना बाजूला सारून रात्रीच्या वेळी पाठीवर खिचडी घेऊन तिथं येतो. 'खरिपाचे पीक कसे येईल? रब्बिचे पीक कसे येईल?' असे प्रश्न लोक त्या नंदीबैलाला विचारतात. जाणकार लोक हो, नंदीबैल काय सांगतो त्याचा अर्थ तुम्हीच लावा. जाणते लोक जे सांगतात त्याच्यावर श्रद्धा ठेवून देवाची सेवा करा. मासिद्दप्पाचे घरच मठ बनून गेला. डाळजला त्याची समाधी आहे. श्रद्धावंतांना त्याने आपले निजरूप दाखवले. वर्षातून एकदा तो अमोघसिद्धांच्या भेटीकरता येतो. तिथे अमोघसिद्धांची जत्रा भरते. मासिद्दप्पा खारका, खोबरं व भंडारा लुटतो.

ऐका हो, आपले गुरू हुन्नूरसिद्ध यांच्या कृपेने हाविनाळ चंद्राम याचे पद गोड झाले आहे. चंद्रामने ते पद निंबरगीच्या मुलांना शिकवले. हालमताचा (हालमत ही धनगरांची एक शाखा आहे) देव आला आहे. त्याचं चांगभलं. आमच्या देवाचं चांगभलं.

या पदातील शेवटच्या दोन ओळींबद्दल एक लोककथा प्रचलित आहे. धनगरांच्या हालमत शाखेचे दैवत बीरप्पा. कोणदनूर व मुंडगनूर यांच्या दरम्यान कोणद नावाचा एक राक्षस होता. तो लोकांना त्रास देई. बीरप्पा देवाने त्याच्याशी युद्ध करून त्याचा

संहार केला. त्याचा देह जिथे पडला तिथे कोण्णूर करसिद्दप्पा हे देवस्थान असून, मुंडके पडलें तिथे मुंडगनूर माळिंगरायाचे देवस्थान आहे. ही दोन्ही जागृत स्थाने जमखंडी तालुक्यात आहेत. भक्तमंडळी इथे जातात.

३. 'महाराजरवर वचन' याचे एक वैशिष्ट्यपूर्ण हस्तलिखित

निंबरगी महाराज दासबोधावर निरूपण करीत. त्यांचे शिष्य रघुनाथाचार्य आद्य यांनी निरूपणाची टिपणे घेतली होती व पोथीरूपाने या बोधपर वचनांचा संग्रहही केला होता. हे मूळ हस्तलिखित किंवा निंबरगी येथील मूळ प्रत. याच्या पुढे अनेकांनी प्रती करून घेतल्या. त्यांत जमखंडी-प्रत, उमदी-प्रत, सातलगाव-प्रत, चडचण-प्रत यांचा समावेश होतो. पैकी चडचण-प्रत कन्नड लिपीत असून बाकी देवनागरी लिपीत आहेत. ही झाली हस्तलिखिते. रघुनाथाचार्य आद्यांच्या टिपणांना निंबरगी महाराजांचे विजापूरचे एक शिष्य बाबाचार्य काव्य यांनी वेगळे रूप दिले. त्यांनी त्या पोथीत संस्कृत, मराठी, कन्नड, हिंदी अशा बऱ्याच संतवचनांची भर टाकून 'महाराजरवर वचन' या नावाने विजापूरच्या ग्रामाधिकारी प्रेसमध्ये १९०८ साली एक पुस्तकच छापून काढले व या हस्तलिखितांच्या अभ्यासाला नवीन दिशा दिली. संप्रदायाची शिकवण प्रसिद्ध करण्याचा पहिला मान बाबाचार्यांकडे जातो. परमार्थाच्या कार्याला हे आर्थिक मदत करत. याबद्दलचे स्पष्ट उल्लेख महाराजांच्या जावक पत्रांच्या पुस्तकात पृ. २१० किंवा २२३ वर मिळतात. असो. या छापील पुस्तकाच्या पूर्वीच्या सर्व पोथ्या म्हणजे 'महाराजरवर वचन' या पुस्तकाची मूळ रूपे आहेत. ती निंबरगी महाराजांच्या तोंडून आलेल्या वचनांची टिपणे आहेत व त्या अर्थी 'महाराजरवर वचन' या नावाने त्यांना संबोधण्यास प्रत्यवाय नाही. बऱ्याच लोकांनी केलेली हस्तलिखिते होती. ती मिळाल्यास त्यांचा सखोल अभ्यास होणे जरूर आहे.

जसजसा शोध घ्यावा तसतशा नवीन गोष्टी उजेडात येतात. एक जरा वेगळ्याच पद्धतीची पोथी पाहायला मिळाली. तिच्यात ३४ पाने आहेत. बोलीभाषा आहे. मजकूर प्रकरणविल्हे नाही. सुरुवातीस मायना नाही व शेवटी समाप्तिदर्शक संकल्पही नाही. एखाद्या पोथीचा हा मधलाच भाग आहे असे दिसते. पोथीच्या पानांवर दोनतीन वेळा पृष्ठक्रमांक घातलेले आहेत. त्यांचा एकमेकांशी तसा मेळ बसत नाही. मजकूर वाचताना विषय ओळीने आले आहेत. कुठे धागा तुटल्यासारखा वाटत नाही. पोथीचे अक्षर अतिशय सुंदर आहे. इतरत्र न आढळणारे एक वैशिष्ट्य या पोथीत दिसले. प्रत्येक पानावर डाव्या बाजूला मूळ मजकुराशी काटकोन करणारी एक ओळ असून



'महाराजरवर वचन'च्या पोथीचे पान

तिच्यात त्या पानाचा सारांश आहे. या ३४ ओळी वाचल्या की पूर्ण पोथीचे सार कळावे. दुर्दैवाने पाने फाटल्यामुळे ५ पानांवरील आडव्या ओळी गेल्या आहेत. बाकीच्या वाचता येतात. या ओळी खालीलप्रमाणे आहेत.

।। संसारवु मिथ्यवादद्दु, अदक्के बडकोंडरे यल्लादरिंद कोरतियु. ।।

।। आत्मनन्नु यावागादरू मरियदे अखंड साधिसुत्ता इरबेकु.।।

।। सोक्कु यातरिंदू बरगोडदे, तगलु माडदे, चलो नडतियिंद इरबेकु.।।

।। मान बयसदे, आशे माडदे, सिट्टु बरगोडदे, शांततनदिंद इरबेकु.।।

।। सिट्टु बिट्टु शांततनदिंद सद्‌गुरुवचनदंते इरुवदु.।।

।। तानु देवरिगे हेसरिडदे, अन्याय माडदे, समबुद्धियिंद इरुवदु.।।

।। मोहदिंद मक्कळ म्याले...

।। ...भरवसा माडदे, आत्मने आधार.।।

।। देवरु कोट्ट केलसक्के अलक्ष्य माडदे इमानियिंद शरीर दुडिसबेकु.।।

।। मैगळ्ळतन माडिदरे यल्ला तरदिंद यल्लाक्कू हानियु.।।

।। यातरदू चिंति माडदे साधनदल्लि मनसु इट्टु इरबेकु.।।

।। संसारक्के बडकोंडु आसक्तनागि इरदे, दयदिंद, विवेकदिंद इरबेकु.।।

।। तोरुव लाभद म्याले दृष्टि इट्टु...

।। ... सिट्टु माडबारदु।।

।। बिगिदु जग्गुवदर बेन्नु हत्तदे, बिट्टरे ताने सैलवागुवदु.।।

।। पररु माडिद्दक्के फल बंदद्दु नोडि चलो बुद्धि हिडीबेकु.।।

।। चलो बुद्धि इट्टु सर्वदरल्लि ओब्बने इद्द आत्मन हित माडबेकु.।।

।। सर्वोत्तमनागबेकु.।। हिरियरिगे नोयिसबारदु।।

।। गुरुगळ आज्ञे, बल्ल हिरियर आज्ञे मीरिदरे तन्नदे घात.।।

।। छळिसिद्दरिंद, आज्ञे मीरिद्दरिंद, आयुष्य क्षीणवु. संसारद नाशवु.।।

।। व्यापारमुंतादरल्लि हळहळि तगोळ्ळदे संतोष तगोतिरबेकु.।।

।। गर्ववु केलस केडिसुवदु. भिडेयिंद सिगबीळबारदु.।।

।। याव केलसिनल्लि तन्नंते नोडुत्ता आत्मनल्लि लक्ष्यविरबेकु.।।

।। दत्तक होदरे संतति उळियुवदिल्ल।।

।। वृत्तिय म्याले उदास, निवृत्तिय म्याले उल्हासविरबेकु.।।

।। ...सत्यवु. तारुण्यदल्लि स्वतंत्रदिंद ध्यान.।।

।। तन्न संसार मक्कळिगे ओप्पिसि मुप्पिनतनदल्लि एकाग्र ध्यानवे.।।

।। मायादल्लि सिक्कु चिंति माडुत्त इरबारदु. समाधान इरबेकु.।।

।। गंडहेंडरु परस्पर आज्ञेयल्लि इद्दरे आगुव परिणामवु.।।

।। मनियल्लि हेंगसर कारभारवादरे मुंदकागुवदिल्ला.।।

।। समाधानदिंद समाधान बेळियुवदु. ताळिद्द तपवु.।।

।। यल्ला रीतियिंद यल्लारदू ताळुवदु धर्मवु.।।

।। जारकर्म सर्वथैव माडबारदु. अदरिंद नुकसानवु.।।

।। जारकर्मद परिणाम.।।

मराठी भावानुवाद :

संसार मिथ्या आहे. त्यात गुरफटले तर सगळ्या वस्तूंची ददात पडते.

आत्म्याला कधी विसरू नये. त्याचे अखंड अनुसंधान असावे.

कशाचीच मस्ती येऊ देऊ नये. कुणाची वंचना करू नये. सदाचरण ठेवावे.

मानसन्मानाची अपेक्षा नसावी, कसली अभिलाषा धरू नये. क्रोधापासून दूर राहावे. शांती धरावी.

रागावर ताबा असावा. शांतपणाने नामस्मरणात मग्न राहावे.

देवाला दोष देऊ नाही. कुणावर अन्याय करू नाही. समबुद्धी राखावी.

मोहाने मुलांवर...

... भरवसा धरू नये. आत्म्याचाच आधार खरा.

देवाने दिलेल्या कामाकडे दुर्लक्ष न करता इमान राखावे. आपले शरीर राबवावे.

अंगचोरपणा करू नये. त्याने सगळ्या कामांची नासाडी होते.

फुकटची चिंता सोडावी. मन लावून नामस्मरण करावे.

संसारात बुडून जाणे व त्याची आसक्ती बाळगणे अगदी वाईट.

मनात दया असावी. विवेक जागृत ठेवावा.

वरवर दिसणाऱ्या फायद्याची आशा धरून...

... राग धरू नये.

दुराग्रह टाळावा. आपण हट्ट सोडला की दुसरेही सोडतात.

करावे तसे भरावे हे लक्षात ठेवून वर्तनाला जपावे.

सद्बुद्धी असू द्यावी. आत्मा सर्वांतर्यामी आहे. आपण स्वतःचे कल्याण करावे.

वागणूक आदर्श असावी. मोठ्यांचे मन दुखवू नये.

सद्गुरूंची व वडील माणसांची अवज्ञा केली तर आपलाच घात होतो.

इतरांना छळले किंवा त्यांची अवहेलना केली तर आपले आयुष्य कमी होते. संसार बिघडतो.

व्यवहारात कुणाचा तळतळाट घेऊ नये. दुवा घ्यावा.

गर्वाने काम बिघडते. भिडस्तपणाने संकटात सापडू नये.

कुठलेही काम आपलेच आहे असे समजून मनापासून करावे.

आत्म्याचे ध्यान सोडू नये.

दत्तक गेले तर मुले जगत नाहीत.

प्रपंचाबद्दल उदासीन असावे. परमार्थात उल्हास बाळगावा.

... हेच सत्य. तरुणपणीच ध्यानमार्गाला लागावे.

संसार मुलांवर सोपवून म्हातारपणी एकाग्र ध्यानात राहावे.

मायापाशात अडकून, नको ती काळजी करत बसू नये. समाधानी असावे.

पतिपत्नी एकमेकांच्या आज्ञेत राहण्याचे परिणाम.

बायकांच्या हाती कारभार सोपवला तर भरभराट थांबते.

समाधानाने समाधान वाढते. सहनशीलता हेच तप.

सगळ्या व्यवहारांत सहनशीलता राखणे हाच धर्म.

व्यभिचाराच्या वाटेला लागू नये. त्यात नुकसान ठेवलेलेच आहे.

व्यभिचाराचे दुष्परिणाम.

हे हस्तलिखित निंबाळ आश्रमात श्री गुरुदेव रानडे समाधी ट्रस्ट, निंबाळ, यांनी सुरू केलेल्या वस्तुसंग्रहालयात आता ठेवले आहे.

‘महाराजरवर वचन’ या विषयाच्या निमित्ताने जाता जाता रघुनाथाचार्य आद्य यांच्याबद्दल चार शब्द लिहिणे अवाजवी ठरणार नाही.

रघुनाथाचार्य आद्य हे निंबरगी महाराजांचे शिष्य. त्यांचा जन्म अगरखेड येथे अक्षय्य तृतीया, शके १७८३ (सन १८६१) ला झाला. ते मॅट्रिक पास होते. भाऊसाहेब महाराजांचे वडील बंधू नानासाहेब यांचे ते जावई. महाराज व रघुनाथाचार्य यांचे एकमेकांवर फार प्रेम होते. निंबरगी महाराज दासबोधावर निरूपण करीत. ते ऐकून त्यांची शिकवण रघुनाथाचार्यांनी लिहून काढली होती. त्याच्या प्रती स्वहस्ते लिहून परोपकारबुद्धीने ते लोकांना वाटत असत. त्यांचे अक्षर फारच सुंदर होते. ते दूध पिऊन रहात. आपली मालमत्ता विकून त्यांनी निंबरगी महाराजांचा एक चांदीचा मुखवटा करून दिला होता. ते आपली बहीण धोंडूबाई हिला घेऊन निंबरगी येथे भीमरायाच्या देवळातील एका ओवरीत रहात असत. चडचणचे शेट्टेप्पा कोळी भाऊसाहेब महाराजांकडून नाम घेण्यास निंबरगीस आले होते तेव्हा रघुनाथाचार्यांनाच ते महाराज असे समजले व त्यांच्याकडून नाम घ्यावे असे त्यांना वाटले. मग रघुनाथाचार्यांनी महाराज जिथे होते तिकडे जाऊन नाम घेण्यास सांगितले.

अंतकाळी रघुनाथाचार्य भीमरायाच्या देवळात असताना त्यांना वाटले की आपण निंबरगी महाराजांच्या समाधीजवळ मरावे. तिकडे घेऊन जाण्यास आपल्या मंडळींना त्यांनी सांगितले. पण आजारामध्ये लोक बाहेर नेईनात. मग भाऊसाहेब महाराजांना निरोप पाठवला व काय करावे असे विचारले. महाराजांनी सांगितले की त्यांना भीमरायाच्या देवळातच राहू द्यावे, म्हणजे निंबरगी महाराजांच्या समाधीजवळ मरावे असा ध्यास लागून सद्‌गुरुस्मरण करीत असतानाच मृत्यू येईल. समाधीजवळ आणले तर हा ध्यास राहणार नाही. त्याप्रमाणे केले गेले. भाद्रपद शु. १४ (अनंतचतुर्दशी), शके १८१८, तारीख २०-९-१८९६ रोजी पहाटे सूर्योदयापूर्वी दीड तास रघुनाथाचार्य वारले. यांची समाधी निंबरगी महाराजांच्या पूर्वीच्या समाधीजवळ आहे. त्यांची भक्ती पाहून, ‘तुला निंबरगी महाराजांपुढे नंदी करून बसवतो’ असे महाराज म्हणाले होते. त्याप्रमाणे त्यांच्या अस्थी महाराजांनी निंबरगी महाराजांच्या समाधीसमोर पुरल्या.

रघुनाथाचार्यांची एक वही गुरुदेवांकडे होती. त्यांत पदे, अभंग, श्लोक वगैरे साहित्य इतके खचाखच भरले होते की ही वही वाचण्याचे काम कधीच न संपणारे आहे असे गुरुदेव म्हणत. या वहीतील लिखाण गुरुदेव पुष्कळदा वाचून घेत असत. महाराज गुरुदेवांना म्हणत की तू रघुनाथाचार्यांसारखा दिसतोस.

४. काही घटना

(अ) सप्ताहाचा खर्च : निंबरगी येथील सप्ताहाचा खर्च पाच लोक मिळून करीत असत. हे पाच लोक म्हणजे महाराज, बाबाचार्य काव्य, भीमण्णा नीलवाणी (निंबरगी महाराजांचा मुलगा), मलकप्पा माशाळ व पंढरीनाथ देसाई. उमदी येथे होणाऱ्या श्रावणसप्ताहाचा सर्व खर्च महाराज स्वतः करत असत.

(आ) निंबरगी महाराजांचे डोळे लाल : गुरुदेवांना निंबाळला असताना एकदा स्वप्न पडले व त्यात त्यांना निंबरगी महाराजांचे दर्शन झाले. त्यांचे डोळे लाल आहेत असे गुरुदेवांना दिसले. स्वप्नातच त्यांनी याचे कारण कुणालातरी विचारले. 'नेम (ध्यान) करून करून डोळे लाल दिसतात', असे त्यांच्या प्रश्नाला स्वप्नातच उत्तरही मिळाले. पुढे एका वर्षानंतर गुरुदेव जिगजेवणीला गेले असताना गोपाळराव कुलकर्णी या अंबुराव महाराजांच्या बंधूंची व त्यांची भेट झाली. गोपाळरावांनी निंबरगी महाराजांना पाहिले होते. बोलता बोलता सहज गोपाळराव गुरुदेवांना म्हणाले, 'निंबरगी महाराजांचे डोळे लाल होते बरं का!' गुरुदेवांनी विचारले, 'कशामुळे?' 'नेम करून करून' असे उत्तर मिळाले. गुरुदेवांच्या स्वप्नाला या उत्तराने दुजोरा मिळाला.

(इ) 'जो देखे सो कहे नही' : निंबरगी महाराज शेतात नेमास बसले होते. एक मनुष्य पळत येऊन कडब्याच्या गंजीच्या मागे लपून बसला. त्याचे एका बाईशी अनैतिक संबंध होते. त्याला मारण्याकरिता पाठीमागून लोक येऊन, 'तो कोणीकडे गेला?' असे निंबरगी महाराजांना विचारू लागले. त्यांनी निराळ्या दिशेकडे बोट दाखवून, 'तिकडे गेला' असे सांगितले. त्यास अनुलक्षून, 'ही जीभ खोटे बोलल्याकारणाने शेवटी माझी वाचा बंद पडेल' असे निंबरगी महाराजांनी सांगितले. अंतकाळी वाचा गेल्यावर त्यांनी जमिनीवर एक-दोन-तीन-चार-पाच-सहा असे आकडे लिहून सहाव्या आकड्याचे टोक वर करून सहा तासांनंतर आपले प्राण जाणार असे सुचविले.



(ई) कलादगीला जन्म घ्यावा लागेल : निंबरगी येथील भीमाबाई ही निंबरगी महाराजांची शिष्या असली तरी तिला महाराजांबद्दल आदर नव्हता. पाटल्या चोरल्याचा आरोप महाराजांवर तिने केला होता, ही कथा सर्वांना माहीत आहे. नीलगंगव्वा पाटलिणीने निंबरगी महाराजांची समाधी बुजवली त्यात भीमाबाई सामील होती. निंबरगी महाराज हयात असताना म्हणाले होते की, 'भीमाबाई गुरुद्रोही होणार आहे, त्यामुळे मला कलादगीला जन्म घ्यावा लागेल.' ही गोष्ट बाबांना कुणीतरी सांगितल्यावर बाबा उद्‌गारले, 'हे कसे शक्य आहे? निंबरगी महाराज परमेश्वराशी एकरूप झाले आहेत. त्यांना आता जन्म कुठला?' बाबांचे म्हणणे स्पष्टच आहे. परंतु या घटनेचे एक स्पष्टीकरण दिले जाते. समाधी बुजवण्यात भाग घेणे हा भीमाबाईचा गुरुद्रोह झाला. समाधी बुजवल्यामुळे १९१० मध्ये ओढ्याच्या पश्चिमेकडून महाराजांच्या अस्थी पूर्वेच्या काठावर आणल्या हाच जणूकाही पुनर्जन्म. समाधीवरचा दगड कलादगीजवळच्या सेल्लिकेरीहून आणलेला आहे, हा एक योगायोग आहे. कलादगी-जन्म याचा असा अर्थ लावला गेला आहे.

५. निंबरगी महाराजांच्या वस्तू

निंबरगी महाराजांच्या खालील तीन वस्तू पाहायला मिळतात.

निंबरगी महाराज रानात नेमाला जात असत. नेम झाल्यावर कापूर लावत. वारा येऊन ज्योतीला धक्का लागू नये यासाठी एका कमळाची योजना केली होती. कमळ धातूचे आहे. हाताने खालचा भाग फिरवून कमळाच्या पाकळ्या सहज उघडता किंवा मिटता येतात. पाकळ्या मिटल्या की ज्योतीला वारा लागण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

उघडलेले कमळ

शंभर-दीडशे वर्षांच्या या वयोवृद्ध कमळावर कालाचा परिणाम होऊन त्याच्या तीन पाकळ्यांची टोके थोडी तुटून गेली. ठिकठिकाणच्या कारागिरांकडे चौकशी करून दुरुस्ती करण्याचा प्रयत्न झाला.



मिटलेले कमळ

देवाच्या कृपेने एका कारागिराने तिन्ही पाकळ्या नवीन बसवून दिल्या. जुन्या मोडक्या पाकळ्यांपैकी एक पाकळी आता निंबाळ येथे श्री गुरुदेव रानडे समाधी ट्रस्ट यांनी सुरू केलेल्या वस्तुसंग्रहालयात ठेवली आहे.

दुसरी वस्तू म्हणजे निंबरगी महाराज वापरत असत ती चंची. तिच्यामध्ये कात, चुना, सुपारी, विड्याची पाने वगैरे जिन्नस ठेवण्याचे कप्पे आहेत. चंची बरीच फाटली होती. तुकडे तुकडे होऊन ती नाहीशी होऊ नये म्हणून आता तिला थोडा आधार दिला आहे.



चंची

निंबरगी महाराजांची चिलीमही प्रेक्षणीय आहे. तिच्यावर आकर्षक कोरीव काम आहे. दिसते एवढीशी, पण ती पेलणे जड जाते. ही धातूची आहे. उपयोगिता व कलात्मकता यांचा संगम चिलमीत दिसतो.

ही निंबरगी महाराजांची अजून पहायला मिळणारी तिसरी वस्तू.


चिलीम

श्री भाऊसाहेब महाराज

जन्म १८४३ निर्याण १९१४

प्रकरण दुसरे

श्री भाऊसाहेब महाराज

श्री व्यंकटेश खंडेराव देशपांडे हे निंबरगी महाराजांच्या प्रमुख शिष्यांपैकी एक होते. त्यांचा जन्म चैत्र शु. ९ (रामनवमी), शके १७६५, इ. स. १८४३ रोजी उमदी येथे झाला. निर्याण इंचगेरी येथे माघ शु. ३, शके १८३५, ता. २९-१-१९१४, गुरुवार रात्री आठ वाजता झाले. महाराजांची समाधी इंचगेरी येथे आहे. समाधीची स्थापना माघ शु. १४, शके १८३५, फसली १३२३, ता. ९-२-१९१४, सोमवार, पाच वाजता झाली. समाधीवरील देऊळ गिरिमल्लप्पा मेत्री यांनी बांधले. देऊळ पूर्ण झाल्याचा दिवस, 'मिती श्रावण शु. १५, शके १८३७, इ. स. १९१५', असा देवळाच्या गाभाऱ्याच्या भिंतीवर कोरला आहे. महाराजांची चरित्रे प्रसिद्ध झाली आहेत.

यशवंतराव ऊर्फ दाजीबा आणि मार्तंडराव ऊर्फ नानासाहेब असे भाऊसाहेब महाराजांचे दोघे मोठे बंधू होते.

यांचे वडील बंधू दोघेजण। नानासाहेब आणि दाजीबा जाण।
रघुनाथप्रियांनी कृपा करून। अनुगृहीत केले।।२.१५।।

असे नित्यनेमावलीतील पंचसमासीत यांच्याबद्दल म्हटले आहे. या दोघांपैकी फक्त नानासाहेबांचा फोटो मिळू शकला.

१. इंचगेरी मठस्थापना

निंबरगी महाराजांची समाधी बुजवल्यापासून इंचगेरीस मठस्थापना होईपर्यंत भाऊसाहेब महाराजांना फार मनस्ताप झाला. 'सगुण स्थापना' दुसऱ्या कोठेतरी होणे अवश्य वाटत होते. त्याप्रमाणे विचार चालू होता. "इल्ली ओंदु हिडि मण्णु तोगोंडु एल्लि स्थापना माडतीरि अल्लि जयजयकार आगतद" (इथली मूठभर माती घेऊन जिथे स्थापना



नानासाहेब देशपांडे

कराल तिथे जयजयकार होईल), असा दृष्टांत महाराजांना झाला, असे शिवलिंगव्वा सांगत असत. त्याप्रमाणे चैत्र शु. ९ शके १८२५, फसली १३१२, दि. ६-४-१९०३, सोमवार या दिवशी इंचगेरीस महाराजांनी मठस्थापना केली. हा निंबरगी संप्रदायाच्या विकासातला एक महत्त्वाचा टप्पा आहे. यानंतर इंचगेरी हे भक्तीचे केंद्र बनले.

मठस्थापनेच्या वेळी बाबांनी (अंबुराव महाराज) एका जस्ताच्या डबीत निंबरगी महाराजांचा अंगारा व चार आणे घालून ती डबी समाधीखाली ठेवली. डबी तांब्याची होती असे मनोहरपंत देशपांडे यांच्या 'जीवनगंगा' या पुस्तकात पृ. ४५ वर आहे. त्यावर महाराजांनी निंबरगी महाराजांच्या पादुकांची स्थापना केली. या पादुकांना थोडा इतिहास आहे. इंचगेरी येथे १९०२ साली मार्गशीर्ष सप्ताह तीन दिवस झाला होता. प्लेग असल्याने यानंतर निंबरगीचे साधक लवकरच निंबरगीस परत गेले. त्या गडबडीत उत्सवाकरिता निंबरगीहून आणलेल्या निंबरगी महाराजांच्या पादुका ते इंचगेरीसच विसरून गेले होते. प्लेगमुळे महाराज गावाबाहेर झोपडीत रहावयास गेले होते. तिथेच पादुका विसरल्या होत्या. याच पादुकांची स्थापना महाराजांनी केली. स्थापनेच्या वेळी महाराजांनी ज्ञानदेवांच्या अभंगांच्या गाथेचे पुस्तक उघडले (१८८४ सालची गोंधळेकर प्रत). पुस्तक उघडल्याबरोबर क्रमांक ४४९ व ४५० हे अभंग असलेले पान निघाले. अभंग असे आहेत :

(अ) *पाहणेची पाहासी काय पाहणे तेथें नाहीं।*
पाहाणेची पाही पाहणें रया।।धृ.।।
खुंटलें बोलणें बोलीं बोला।
बोलुचि मौन्यें ठेला मौन्यामाजीं।।१।।
बाप रखुमादेवीवरा विठ्ठलाचिये खुणे।
अनुभविया बोलणें पारुषलें।।२।।

(आ) *अमोलिक रत्न जोडलें रे तुज।*
कां रे ब्रह्मबीज नोळखिसी ।।१।।
न बुडे न कळे न भिये चोरा।
ते वस्तु चतुरा सेविजेसु।।२।।
ज्ञानदेवो म्हणे अविनाश जोडलें।।
आणूनि ठेविलें गुरुमुखीं।।३।।



निंबरगी महाराजांच्या पादुका

या पानावर महाराजांनी स्वतः लिहिलेले टिपण आहे. "*पादुका स्थापनाचे शेकुण, १३१२, चैत्र शु. ९, बारावर एक वाजता, प्रश्न.*" या घटनेची चर्चा गुरुदेवांनी Pathway to God in Hindi Literature या पुस्तकात पृ. २२८ वर खालीलप्रमाणे केली आहे. परमात्मरूपी अमोलिक रत्नाची प्राप्ती झाली आहे, या अर्थाच्या मीराबाईच्या पदाची चर्चा करताना गुरुदेव म्हणतात की ज्ञानेश्वरही देवाला अमोलिक रत्नच म्हणतात. परमेश्वर हे अमोलिक रत्न हाती आले आहे. हा अभंग मठस्थापनेच्या वेळी यदृच्छया उघडल्या गेलेल्या पानावर मिळावा, हा शुभशकुन होय असे महाराजांना वाटले असावे. म्हणून आपल्या टिपेत त्यांनी 'शकुन' शब्द वापरला असे दिसते.

पादुकास्थापनेच्या वेळी बांधलेला समाधीचा कट्टा साधारण प्रतीच्या दगडाचा होता. दुसऱ्या वर्षी त्याच्या जागी चांगल्या टाकीच्या दगडाचा कट्टा बांधला गेला. ७ मे १९०४ रोजी नंदेप्पा न्यामगौडा यांनी बाबांना पत्र लिहून कळवले की, समाधीचा कट्टा नवीन बांधायचा आहे. तरी चांगले दगड आणून टाकीने फोडून ठेवावे. कट्टा शोभायमान व्हावा अशी महाराजांची इच्छा होती. चांगला माल आणण्यास अडचण पडू नये म्हणून मनीऑर्डरने बाबांकडे १२ रुपये पाठवीत असल्याचे याच पत्रात आहे. पुढे नंदेप्पा कळवतात की, शिवलिंग व नंदी आपण आणत आहोत. त्याप्रमाणे त्यांनी हुबळीहून लिंग आणले. पहिले लिंग बाबांचे भाचे अण्णप्पा कुलकर्णी यांच्या घरचे होते. शिवलिंग व नंदी आल्यावर चांगल्या दगडाच्या कट्ट्यावर त्यांची स्थापना झाली.

सहज जाता जाता इथे एक गोष्ट पाहू. श्री. गो. जांभळीकर यांनी महाराजांकडून इंचगेरी येथे १९११ मध्ये नाम घेतले. त्यावेळेस इंचगेरी मठाची स्थूलमानाने रचना कशी होती याचा एक आराखडा जांभळीकरांच्या दप्तरात मिळाला. गुरुदेव सांगलीला माळबंगल्यावर असताना जांभळीकर त्यांना भेटायला गेले होते. त्यावेळी जुन्या आठवणी निघाल्या. तेव्हा तिथे जांभळीकरांनी हा नकाशा काढला. 'श्रीक्षेत्र हिंचगेरी येथे श्रीसद्गुरु भाऊसाहेब महाराजांचे भजनाचे वेळेचा नकाशा, १९११ सालचे प्रसंगाचा. श्री गुरुवर्य रामभाऊ अण्णा यांचेकडे (माळबंगल्यावर) आठवणीचे प्रसंगी काढलेला नकाशा. ६-१०-४९' अशी नकाशाच्या मागच्या बाजूला जांभळीकरांनी नोंद करून ठेवली आहे. जांभळीकर चित्रकार होते. त्यांच्या डोळ्यांनी टिपलेले हे चित्र आहे. गुरुदेवांसमोर नकाशा काढताना तो साध्या कागदावर शाईने काढलेला आहे. त्यात जागोजागी काय काय होते हेही लिहिलेले आहे. जांभळीकरांच्या आराखड्यावरून एका इंजिनीयर साधकाने सोबतचा नकाशा तयार केला आहे.



इंचगेरी मठाचा नकाशा (१९११)

सभामंटपाबाहेर भजनाची जागा दाखवली आहे. त्या ठिकाणी सप्ताहात भजन होत असावे. कारण सप्ताहास खूप साधक येत. सभामंटप पुरत नसेल. नंदेप्पा न्यामगौडा यांच्या कोठीची खोली नकाशात दिसते. कोठीची व्यवस्था नंदेप्पांकडे असणार. महाराजांच्या बैठकीची जागा दाखवून या ठिकाणी आपल्याला नाम मिळाले हे जांभळीकरांनी नमूद केले आहे. महाराजांच्या खोलीच्या मागे 'भजनाची माडी छत' असे शब्द असून एक बाण आहे. बायकामंडळींना माडीवर जाण्याचा रस्ता बाणाने सुचवला असावा. नित्यनेमावलीतील पंचसमासीमध्ये हे सुचवणारी एक ओवी आहे :

चौघडा वाजे समोर। स्त्रिया बैसती माडीवर।
घंटा टांगिली असे थोर। नादें अंबर भरतसे ।। ३.२४।।

या नकाशावरून त्या वेळेच्या मठाची कल्पना करता येते. आता मठाच्या रचनेत बराच बदल झाला आहे. मूळ नकाशा श्री गुरुदेव रानडे समाधी ट्रस्ट, निंबाळ, यांनी सुरू केलेल्या वस्तुसंग्रहालयात आता ठेवला आहे.

१९११ साली महाराजांच्या नेमाची एक दुमजली इमारत इंचगेरीस बांधली होती. महाराज तिथे ध्यानाला बसत. त्यांच्या निर्याणानंतर श्रेष्ठ साधकांनी तिथे नेम केला आहे. अलीकडे अलीकडेपर्यंत ही इमारत होती. अनेक साधकांना हे माहीत आहे.



महाराज नेमाला बसत ती दुमजली इमारत

२. साजरे होणारे सप्ताह

(अ) चैत्रसप्ताह : चैत्र शुद्ध नवमीला निंबरगी महाराजांच्या पादुकांची स्थापना झाली. हा दिवस म्हणजे निंबरगी महाराजांच्या पुण्यतिथीच्या सप्ताहाचा म्हणजेच चैत्रसप्ताहाचा पहिला दिवस. आपल्या सद्गुरूंच्या पुण्यतिथीच्या मुहूर्तावर १९०३ साली महाराजांनी मठस्थापना केली. सप्ताह त्रयोदशीपर्यंत चालला असावा. त्रयोदशीला निंबरगी महाराजांची पुण्यतिथी असते. इंचगेरी येथील हा पहिला चैत्रसप्ताह. १९०४ साली हा सप्ताह फक्त चैत्र शुद्ध १२/१३ असा झाला. तसे न करता हा सप्ताह शुद्ध नवमीपासून सुरू करावा असे महाराजांनी सांगितले. १९०५ मध्ये यानुसार पाच दिवसांचा सप्ताह झाला असे महाराजांच्या १९०५ सालच्या डायरीवरून समजते. पाच दिवस म्हणजे चैत्र शुद्ध नवमी ते त्रयोदशी.

(आ) मार्गशीर्षसप्ताह : सन १९०० पर्यंत मार्गशीर्षसप्ताह निंबरगी येथे साजरा होत असे. परंतु १९०१ साली चैत्रसप्ताहासच निंबरगीची पाटलीण व गुरव यांनी अडथळा केला. प्रथमग्रासे मक्षिकापात झाल्यामुळे महाराजांना दुःख तर झालेच, शिवाय हे असेच चालू राहिले तर आठ महिन्यांनंतर येणारा मार्गशीर्षसप्ताह निंबरगी गावी निर्विघ्नपणे पार पडेल किंवा नाही अशी त्यांच्या मनात चिंता उत्पन्न झाली. म्हणून मार्गशीर्षसप्ताह दुसऱ्या गावी करावा किंवा कसे याचा विचार सुरू झाला. त्यावेळी गणेशशास्त्री चौथाई यांना दृष्टान्त झाला की, "भीमाशंकर (निंबरगीचे ग्रामदैवत) इंचगेरीस गेला आहे, इंचगेरीस सप्ताह करा." म्हणून सप्ताह इंचगेरीस करण्याचे ठरले. पण इंचगेरी गावात त्यावेळी पाणी नव्हते म्हणून सप्ताह सातलगावला करावा असे वेणूबाई गौडती हिने सांगितले. "शास्त्रीबुवांस दृष्टान्त झाला आहे म्हणून सप्ताह इंचगेरीस करतो" असे महाराज म्हणाले. जमखंडीचे हरिअण्णा कानिटकर यांनी सप्ताह जमखंडीस करावा असे सुचवले. परंतु अखेरीस "सुदाम्याचे घर बरे आहे" म्हणून महाराजांनी इंचगेरी गाव पक्के केले. सुदामा म्हणजे बाबा. बाबांच्या गावी सप्ताह होऊ दे असे महाराजांचे म्हणणे पडले. सप्ताह १९ डिसेंबर १९०१ला सुरू झाला. या सप्ताहास शिवलिंगव्वा, नंदेप्पा, रामभाऊ फडणीस ही मंडळी आली होती. हा वृत्तान्त सांगणारे एक टिपण उपलब्ध झाले. त्यात पुढे काही त्रोटक वाक्ये आहेत. "पाण्याचा चमत्कार. कनकनाळीस जाऊन पाणी आणतो. बैल द्या." पुढील घटनेवरून या शब्दांचा अर्थ लागतो. त्यावेळेस इंचगेरीस दुष्काळामुळे पाणी नसल्याने जवळच असलेल्या कनकनाळ खेड्यातून पाणी आणीत. तिथे पाणी भरपूर मिळे. बैलावर माकण घालून पाणी आणले जाई. माकण म्हणजे बैलाच्या पाठीवर पाणी आणण्यासाठी घागरी ठेवण्याकरिता

केलेली लाकडी बैठक. कनकनाळहून बैलावरून पाणी आणण्याची तयारी रामभाऊ फडणीस यांनी दाखवली असावी. महाराजांनी त्यांना इंचगेरीच्या ओढ्यातून पाणी आणण्यास सांगितले. मठाजवळचा तो पुण्यसलिल ओढा वाळला होता. सप्ताहाला आलेल्या भक्तांना पाणी पुरवता येत नाही म्हणून दुर्मुखला होता. तीर्थस्नान बाजूलाच राहिले, पिण्याच्या पाण्याचीही वानवा होती. तरी केवळ महाराज सांगतात म्हणून रामभाऊ ओढ्यावर गेले. पाण्याच्या शोधार्थ ओढ्यातले दगड त्यांनी इकडे तिकडे केले आणि काय आश्चर्य, दगडाखाली पाणी दृष्टीस पडले. नंतर सप्ताह संपेपर्यंत तिथूनच पाणी आणले. सप्ताहाला पाणी पुरवून कृतार्थ झालेला तो ओढ्यातला खळगा सप्ताहानंतर आटून गेला असे सांगतात.

१९०२ साली दुसरा मार्गशीर्षसप्ताह झाला. हा इंचगेरी गावात अण्णप्पा कुलकर्णी यांच्या घरी तीन दिवस झाला. गावात प्लेगची साथ सुरू झाली होती. जिथे सप्ताह चालू होता त्या मंडपासमोरूनच मढी नेत असत. तिसऱ्या दिवशी सप्ताह संपवला.



अण्णप्पा कुलकर्णी यांचे घर

यावेळी पाऊस फार पडला. सप्ताहाला आलेली मंडळी सामान घेऊन इंचगेरीच्या मरडीवर (माळावर) गेली. रात्री अतोनात वृष्टी झाली. छप्परदेखील गळायला लागले. जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले. यानंतर इंचगेरीस न थांबता, गंगाबाई तिकोटेकर

व कृष्णक्का यांना घेऊन महाराज तिकोट्यास गेले. पुढे चैत्र महिन्यात ते पुन्हा इंचगेरीस आले.

१९०३ साली मठस्थापना झाल्यावर मार्गशीर्षसप्ताह इंचगेरीस झाला. मग हा सप्ताह इंचगेरीला दरवर्षी होऊ लागला.

(इ) श्रावणसप्ताह : निंबरगी महाराजांच्या निर्याणानंतर उमदी येथे महाराजांनी श्रावणसप्ताह सुरू केला. १८९२-९३ सालच्या डायरीत त्यांचा मुक्काम त्यावर्षीच्या श्रावणात म्हणजे ऑगस्ट-सप्टेंबर १८९३, १३०३ फसली, श्रावण शु. १ पासून भाद्रपद शु. ८ पर्यंत उमदीसच होता. 'सप्ता झाला' अशी डायरीत नोंदही आहे. महाराजांच्या ज्ञानेश्वरीच्या वह्यांपैकी पहिल्या वहीच्या सुरुवातीच्या पानावर पुढच्या एका सप्ताहाचा उल्लेख आहे. १८९६ मध्ये १० ऑगस्ट, सोमवार रोजी सप्ताह सुरू होऊन तो २९ दिवस चालला.

उमदी येथील श्रावणसप्ताहाच्या कार्यक्रमाचे वेळापत्रक म्हणजे सकाळी ६ ते दुपारी ३ पर्यंत नेम होई. जेवणाची वगैरे उत्तम व्यवस्था असे. सायंकाळी ५ वाजता साधक



महाराजांची नेमाची खोली, उमदी

नेमास पुन्हा बसून ९ वाजता उठत. रात्री जेवण वर्ज्य. ९ ते १२ पोथी. प्रथम काही वर्षे ४-५ लोकांबरोबर कमानीत बसून महाराज नेम करीत. नंतर पुढे ते बाहेरील लहान

खोलीत बसू लागले. त्यांच्या समोर पोथी असे. १५-२० लोक ढेलजेत (भिंतीतला कोनाडा) नेमाला बसत.

१९०१ व १९०२ सालीही सालाबादाप्रमाणे श्रावणसप्ताह उमदीस झाला. इंचगेरीस मठस्थापना १९०३ साली चैत्रमासी झाली. त्यावर्षी श्रावणसप्ताह इंचगेरीस झाला. महाराज सप्ताहासाठी इंचगेरीस आले होते. निंबरगी महाराजांचे देऊळ अद्याप बांधून झाले नव्हते. कौदेप्पाच्या मठात १२ दिवस सप्ताह झाला. या वेळेस महाराजांना



कौदेप्पाचा मठ

नवज्वर झाला. ताप फार होता. महाराज पौर्णिमेस उमदीला परत गेले. यासंबंधी अधिक माहिती मनोहरपंत देशपांडे यांच्या 'जीवनगंगा' पुस्तकात पृ. ४६-४७ वर आहे. १९०३ नंतर इंचगेरीस श्रावणसप्ताह होत होता किंवा नाही याबद्दल कुठेही लेखी माहिती किंवा प्रमाणभूत टिपण मिळाले नाही. मात्र दर पौर्णिमेस पुष्कळसे लोक नियमाने इंचगेरीस जात असत, असा बऱ्याच पत्रांतून मजकूर आहे. १६-२-१९०५ ला बाबांनी विष्णुभटजी निंबरगी यांना लिहिले होते की इंचगेरीस समर्थांचे स्थापनेचे ठिकाणी पौर्णिमेस भक्तीचा थाट होतो. विष्णुभटजी हे जमखंडीचे. ते रामभाऊ महाराज यरगट्टीकर यांचे शिष्य. यांना नेमात दिवसा चांदणे दिसत असे. त्यांचा मृत्यू सप्टेंबर १९०९ मध्ये झाला. त्यांची अधिक माहिती 'चिंतनिका' पुस्तकात पृ. १०४ वर आहे.

(ई) रघुनाथप्रिय महाराजांची पुण्यतिथी : रघुनाथप्रिय किंवा साधुबुवा यांच्याबद्दल महाराजांना अतिशय आदर होता. त्यांनीच महाराजांना निंबरगी महाराजांकडे नेले होते. निंबरगी महाराजांनी साधुबुवांकरवी महाराजांना नाम दिले होते. आपल्याला लहानपणी सगुण भक्तीकडून निर्गुण भक्तीकडे वळवण्यास साधुबुवा कारणीभूत झाले आहेत, हे आठवून महाराज त्यांच्याबद्दल आजन्म कृतज्ञता बाळगीत. साधुबुवांच्या पुण्यतिथीचा सोहळा उमदी येथे महाराज करत असत. १८९२-९३ सालच्या महाराजांच्या डायरीत लिहिले आहे की चैत्र शु. २, तारीख २०-३-९३ रोजी उमदी येथे साधुबुवांचा सप्ताह सुरू झाला व चैत्र शु. ३, तारीख २१-३-९३ रोजी उत्सव झाला. उत्सव झाला म्हणजे पुण्यतिथीच्या दिवशी सप्ताहाची समाप्ती झाली. महाराज उमदीसच होते. सप्ताहाचा कार्यक्रम ९ तास नेम, १० तास पोथी असा असल्याचे एक टिपण आहे.

महाराज परगावी गेले असले तरी साधुबुवांची पुण्यतिथी उमदी येथे होतच होती हे काही पत्रांवरून स्पष्ट होते. १९१२ मध्ये या सप्ताहाच्या वेळेला महाराज सोलापुरी होते. ता. ३-३-१९१२ला महाराजांनी आपला धाकटा मुलगा भीमराव याला उमदीस पत्र लिहिले आहे. त्यात ते म्हणतात, "साधू महाराजांचे उत्सव फार करून येथेच होणेचे मंडळींचे मत आहे. तुम्हीही तेथे सालाबादप्रमाणे करीत आहा." म्हणजे उमदीस तर दरवर्षीप्रमाणे सप्ताह होणार होताच, शिवाय महाराज सोलापूरला होते तिथेही हा उत्सव झाला. याला आणखीही पत्रांतून दुजोरा मिळतो. ता. ३-३-१९१२ याच दिवशी महाराजांनी आपल्या वडील मुलास म्हणजे कृष्णाजीपंतास पत्र लिहून कळवले की, "फार करून मला चैत्र शु. ३, साधु महाराजांचे उत्सव येथेच होईल असे मंडळींचे मत आहे." पाठोपाठ दुसऱ्या दिवशी ता. ४-३-१९१२ ला लिहिलेल्या पत्रात (हे पत्र बाबांना असावे) 'चैत्र शु. ३, सोलापूर मुक्कामीच पडणार' असे आहे. साधुबुवांचा उत्सव झाल्यानंतर चैत्र शु. ८-९ला सावळसंगावरून आपण इंचगेरीस जाणार असल्याचे महाराज या पत्रात कळवतात. चैत्र शु. ९ पासून निंबरगी महाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव इंचगेरीस होणार असल्याने त्यासाठी महाराजांचे तिकडे प्रयाण होणार होते हे स्पष्ट आहे.

३. महाराजांच्या डायऱ्या

महाराज डायरी लिहीत होते ही एक आश्चर्याची गोष्ट आहे. १०० वर्षांपूर्वी डायरी लिहिणे तितके प्रचलित नव्हते. कालमानाप्रमाणे ज्या गोष्टींची प्रथा पडत जाते त्यांत महाराज बिलकूल मागे नव्हते. महाराजांच्या डायरीत कोणते विषय असणार? परमार्थ

हाच प्रमुख विषय. नेम-पोथी-भजन या नित्यक्रमांच्या नोंदी तिथे होत्या. कुणाला कोणत्या गावी नाम दिले याचा उल्लेखही होता. सप्ताहासाठी कोणत्या गावाला गेले याचेही टाचण त्यात असे. मिळालेली सर्वांत जुनी डायरी १८९२-९३ अशी असून १९०४ ते १९१४ अशा सर्व डायऱ्या उपलब्ध आहेत. या डायऱ्यांचे महत्त्व गुरुदेवांना इतके वाटे की निंबाळच्या घरात महाराजांचा फोटो ठेवला आहे त्या जागेखाली तळघर (Cryplos) करून त्यात या डायऱ्या ठेवण्यात याव्या असे त्यांना एका वेळी वाटत होते. या डायऱ्या म्हणजे आमचा ग्रंथसाहेबच आहे असे ते म्हणत. महाराजांचा रोजचा सात तास ठराविक नेम व पाच तास पोथी-भजन यांत कधीही खंड पडला नाही. याशिवाय महाराज रात्री दोन तास नेम करीत. निंबरगी महाराजांची भक्ती वाढावी म्हणून हा नेम असे. डायरीमध्ये काही घटनांची नोंद आहे. महाराज पंढरपुरास गेले होते, ही नोंद १९१० सालच्या डायरीत आहे. तसेच पौष शु. ४, शके १८३२ रोजी निंबरगी महाराजांच्या इंचगेरी येथील समाधीमागे पंढरपूरहून आणलेल्या विठ्ठलमूर्तीची स्थापना झाली हेही लिहिले आहे. "श्री महाराजांच्या कागदपत्रांचा अत्यंत सूक्ष्मपणे अभ्यास करणे फार महत्त्वाचे व जरुरीचेही आहे. या सर्व साहित्याचा सूक्ष्म अभ्यास करणे हे नेम करण्यासारखेच आहे. यांच्या परिशीलनाने समजून येणाऱ्या अनेक महत्त्वाच्या गोष्टींमुळे अंतःकरण पवित्र होते, नेमास जोर येतो, मनास आनंद व उत्साह वाटतो व प्रचितीस वेळ लागत नाही." गुरुदेवांच्या सांगण्यावरून ता. २६-१-१९४६ रोजी लिहिलेल्या एका पत्रात बाबासाहेब संगोराम यांनी वरील मजकूर लिहिला आहे.

१८९२च्या महाराजांच्या डायरीनुसार २६-१२-१८९२ ते २-१-९३ असे आठ दिवस त्यांचा मुक्काम विजापूरला होता. यापैकी २६-१२-१८९२ बद्दल डायरीतील टिपण असे आहेः-

"२६-१२-१८९२ मुक्काम विजापूर. सिकारखाना येथे व्यंकटरमणाचे देवळात मुक्काम. अंबुराय व दादा, मी."

हा उल्लेख महाराजांच्या हस्ताक्षरात आहे. तो अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे असे म्हणून गुरुदेवांनी तो कागद दोनतीन वेळा वाचून पाहिला, असे बाबासाहेबांचे टिपण आहे. या उल्लेखाचे काय महत्त्व होते हे मात्र कळले नाही. यातील दादा म्हणजे खंडेराव यशवंतराव देशपांडे, महाराजांच्या वडील बंधूंचा मुलगा. महाराजांचा मुक्काम झालेले हे देऊळ विजापूर येथे सिकारखाना भागात म्हणजे गोलघुमटाच्या जवळ आहे. देऊळ अतिशय लहानसे व ठेंगणे आहे. बांधणीवरून त्याचे प्राचीनत्व एकदम स्पष्ट होते. गाभारा, तसेच छत असलेला पुढच्या बाजूचा लहान कट्टा एवढेच बांधकाम पूर्वीचे

आहे. दाराची उंची इतकी कमी आहे की ओणव्यानेच आत जाता येते. देवासमोर वाकूनच गाभाऱ्यात प्रवेश मिळतो. हल्ली देवळासमोर एक बेताच्या आकाराचा सभा-



विजापूर येथील व्यंकटरमणाचे देऊळ

मंडप झाला आहे. आत कट्ट्यावर लक्ष्मीनारायणाच्या मूर्ती आहेत. पूर्वी व्यंकटरमणाची मूर्ती होती पण ती भग्न झाली म्हणून नव्या मूर्ती आणल्या असे तिथले पुजारी म्हणाले. पुजाऱ्यांनी एक गोष्ट आवर्जून सांगितली. ते आता वृद्ध आहेत पण १९५३ पासून तिथले पुजारीपण सांभाळत आहेत. १९५३ साली गोपाळराव अंकलीकर यांना घेऊन गुरुदेव या देवळात गेले होते. महाराज व बाबा जिथे राहिले त्या जागी जाण्यात गुरुदेवांना नेहमी उत्साह असे. गुरुदेव देवळाची वास्तू पाहून गेले. 'त्यावेळी देवळात भाऊसाहेब महाराजांचा फोटो होता' असे पुजारी म्हणाले. महाराज, बाबा व गुरुदेव तिघेही ज्या देवळात गेले होते ते स्थान संप्रदायाच्या इतिहासाच्या दृष्टीने एक पावन भूमी आहे हे निःसंशय.

निंबरगी महाराजांनी लावलेला भक्तिवृक्ष बहरून यावा अशी महाराजांना तळमळ होती. उमदी व इंचगेरी यांच्या पंचक्रोशीतला सगळा मुलुख त्यांनी पायाखाली घातला होता. शिवाय सोलापूरसारख्या थोड्या दूरच्या ठिकाणीही ते जात असत. गुरुदेवांच्या सांगण्याप्रमाणे ५-३-१९०८ रोजी महाराजांचा मुक्काम निंबाळ येथे होता. ६-३-१९०८

रोजी ते होर्तीकडे गेले. निंबाळला ते कुठे राहिले होते याची नोंद नाही, पण निंबाळ स्टेशनवर एका झाडाखाली त्यांचे भजन झाले होते.

४. 'येकांतीं जाऊन विवरी। नाना ग्रंथ'।।

भाऊसाहेब महाराजांच्या नित्य वाचनात चौदा ग्रंथ होते हे सर्वश्रुत आहे. या यादीत १) ज्ञानेश्वरी, २) दासबोध, ३) रामदासकृत मनाचे श्लोक, ४) वामनकृत मनाचे श्लोक, ५) मुकुंदराजकृत परमामृत, ६) एकनाथांचे चिरंजीवपद, ७) गिरिधरकृत निवृत्तिराम, ८) मूळस्तंभ, ९) एकनाथकृत हस्तामलक-टीका, १०) महाराजरवर वचन, ११) मैहिपतिबुवा ताहराबादकर यांचा भक्तविजय, १२), अखंडेश्वर वचन, १३) एकनाथी भागवत व १४) हरिविजय या ग्रंथांचा समावेश आहे.

असे ऐकले आहे की, याखेरीज आणखी एक यादी असून तिच्यात ज्ञानेश्वरी, दासबोध, रामदासकृत मनाचे श्लोक, भक्तविजय, रुक्मिणीस्वयंवर, पांडवप्रताप, भावार्थ-रामायण, हरिविजय, अखंडेश्वर वचन व विवेकसिंधु हे ग्रंथ होते.

यांपैकी पहिली यादी अधिकृत समजण्यास हरकत नाही, कारण या यादीतील २-३ पुस्तकांची काकासाहेब कारखानीस यांच्याकडे चौकशी करावी, असे गुरुदेवांनी सांगितले होते. तसे टिपण आहे.

दासबोध, मनाचे श्लोक, भक्तविजय, महाराजरवर वचन, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, निवृत्तिराम वगैरे ग्रंथांतली अनेक अवतरणे महाराजांच्या पत्रांत वारंवार येतात.

अखंडेश्वर वचनाचा त्यांनी डायरीत आवर्जून उल्लेख केला आहे, हे खालील टिपणे पाहिल्यास सहज ध्यानात येते.

"१९०६ – शरणस्थल श्लोक (वचन) ७-८
प्राणलिंगस्थल वचन १०-११ (वाक्पंडित वगैरे)

१९०७ – शरणस्थल, वचन ६,७,८

१९०८ – शरणस्थल वचन, ८
महेश्वरस्थल वचन ९, १५, ३५, ३६

१९१० – शरणस्थल, वचन ८
महेश्वरस्थल, वचन ९, १५, ३५, ३६"

महाराज वापरत असलेली अखंडेश्वर वचनाची आवृत्ती, उमामहेश्वरी प्रेस, चित्तूर यांनी १८८४ मध्ये प्रसिद्ध केली ती असावी. ही पहिली आवृत्ती आहे. दुसरी आवृत्ती १९२३ मध्ये प्रसिद्ध झाली. म्हणजे महाराजांच्या हयातीत फक्त पहिली आवृत्तीच होती. महाराजांनी वापरलेली प्रत गुरुदेवांच्या संग्रही होती असे दिसते. तीतील हवा तो भाग गुरुदेव विद्यार्थांकडून वाचून घेत.

५. 'होगूदु, शिखर आगेद'

अंबुराव महाराजांनी माहिती सांगितल्याप्रमाणे हे टिपण आहे. गुरुदेवांनी बाबासाहेब संगोरामांकडून तसे शब्द लिहून ठेवले. त्यांत काही सूचक शब्दच फक्त होते. इतर टिपणांवरून ही हकीकत जुळवून घेतली आहे. इंचगेरीस निंबरगी महाराजांच्या समाधीवर देऊळ व शिखर व्हावे अशी महाराजांची फार इच्छा होती. जमखंडी येथील गिरिमल्लप्पा मेत्री यांनी स्वखर्चाने ते काम केले. देऊळ पूर्ण झाल्याचा दिवस मिती श्रावण शुद्ध १५, शके १८३४, इ. स. १९१२ असा गाभाऱ्याच्या दारावर कोरला आहे.

(अ) परमार्थात वारसाहक्क नाही : सोमवार, तारीख १९-१-१९१४ म्हणजे महाराजांच्या निर्याणाच्या ११ दिवस आधी सकाळी ९ वाजता महाराजांनी बाबा, नंदेप्पा, नागप्पा आणि भीमराव यांना खोलीत बोलावून घेतले आणि म्हणाले, "होगूदु, शिखर आगेद" (जाणे आहे, शिखर झाले आहे). या आधी १० वर्षे महाराजांनी सांगितले होते की 'माझे, आयुष्य ६० वर्षे आहे. ते पूर्ण झाले. आता मी जातो.' त्यावर बाबा व इतर मंडळींनी त्यांना गळ घातली की, '(इंचगेरीचे) निंबरगी महाराजांचे देऊळ पुरे व्हायचे आहे, शिखर व्हायचे आहे, कृष्णाजीपंतांची नोकरी अजून चालू आहे, तरी आपण जाऊ नये.' महाराजांनी त्यावर काही उत्तर दिले नव्हते. यानंतर दहा वर्षांनी वर दिलेले उद्गार महाराजांनी काढले की, 'शिखरसुद्धा झाले आहे. आता मी जातो.'

बाबांनी उत्तर दिले, "इन्नू नाकु वर्ष इरबेकु. अण्णा (कृष्णाजीपंत) मोन्ने पेनशन तोगोंडान." (आणखी चार वर्षे राहावे. अण्णांनी नुकतीच पेन्शन घेतली आहे). बावांच्या म्हणण्याचा मथितार्थ असा की कृष्णाजीपंत आताच तर नोकरीतून निवृत्त झाले आहेत. त्यांनी आता केवळ साधन करून परमार्थाची जबाबदारी घेईपर्यंत महाराजांनी रहावे.

यावर महाराज म्हणाले, "नी ब्यारे अल्ला. ना ब्यारे अल्ला." (तू आणि मी वेगळे कुठे आहोत ?) परमार्थाचा अधिकार वंशपरंपरा येत नाही, असे महाराजांचे ठाम मत होते. ते स्वतः व बाबा वेगळे नाहीत म्हणजे परमार्थाचा अधिकार बाबांकडे जातो.

कारण त्यांनी खडतर साधन करून उज्ज्वल अनुभव मिळवले होते. कृष्णाजीपंतांचा अधिकार व्यवहारात असेल पण परमार्थात नाही ही गोष्ट महाराजांनी इथे स्पष्ट केली.

(आ) निर्याणाचा कृतनिश्चय : महाराजांची प्रकृती ढासळत आहे हे भक्तांना कळून चुकले. सगुण रूपाच्या चिरवियोगाच्या धास्तीने बाबांसारखा स्थिरचित्त शिष्यही गलबलून गेला. महाराजांच्या निर्याणाच्या चार दिवस अगोदर सोमवार, ता. २६-१-१९१४ रोजी बाबा, नागप्पा व कृष्णाजीपंत हे तिघे मठात महाराज झोपले होते त्या खोलीत गेले व त्यांनी महाराजांना हाक मारली.



महाराजांनी देह ठेवलेली खोली, इंचगेरी

"यारु?" (कोण आहे?) महाराजांनी विचारले.

"ना अंबु इद्दीनि." (मी अंबु आहे.) बाबांनी उत्तर दिले.

बाबा पुढे म्हणाले, "दोड्ड महाराजरु... घोंगडी निम्म म्याले झाडिस्यार... मुंद भक्ति नडीलिक्के बेकु." (मोठ्या महाराजांनी तुमच्यावर घोंगडी झाडली आहे. भक्ती पुढे चालवली पाहिजे).

निंबरगी महाराजांनी आपली घोंगडी भाऊसाहेब महाराजांच्या अंगावर झाडून 'माझे सर्वस्व तुला दिले आहे, आता परमार्थ चालू ठेवण्याची जबाबदारी तुझ्यावर आहे' असे सांगितले होते, त्याला उद्देशून बाबांचे हे शब्द आहेत.

महाराजांनी उद्‌गार काढले, "नागप्पा हानल्ला." (नागप्पा आहे ना.) नागप्पा तुझ्या जोडीला आहे मग भक्ती वाढवण्याचे काम होईल असे महाराजांना म्हणायचे असावे.

बाबा म्हणाले, "नागप्पा इन्नऽसण्णावा हान. नीवु कृपा माडबेकु. भक्ति ह्यांग नडी-बेकु?" (नागप्पा अजून लहान आहे. तुम्हीच कृपा करून राहिले पाहिजे. नाही तर भक्ती वाढणार कशी?) त्यावर महाराजांनी निर्वाणीचे शब्द काढले, "अदर चिंति याक माडती?" (त्याची काळजी तुला कशाला?)

बाबांनी आणखी एक प्रयत्न केला, "चिंति माडबेकागेद." (काळजी करायची वेळ आली आहे).

लांबत चाललेले संभाषण पूर्ण थांबवण्याच्या इराद्याने महाराज बोलले, "चिंति माडिदरू तानऽ आगुहांग आगतद. चिंति माडदिद्रू तानऽ आगुहांग आगतद. होगरी." (चिंता केली तरी जे व्हायचं तेच होणार आणि न केली तरी व्हायचं तेच होणार. इथून चालू लागा).

महाराजांनी हाडाची काडे करून, खेड्यापाड्यात जाऊन परमार्थ समाजाच्या तळागाळापर्यंत पोचवला. जन्मतः कुणी उच्च नाही, नीच नाही, भक्तिमार्गात सगळे सारखेच आणि कुणीही देवाला हाक घालू शकतो हे त्यांनी दाखवून दिले. महाराजांवर त्यांचे शिष्य जीव टाकत, कारण पोटतिडिकेने महाराजांनी त्यांचे कल्याण साधण्यासाठी धडपड केली. त्यांनी घरप्रपंचाची लुडबूड परमार्थात होऊ दिली नाही. परमार्थ अलिप्त ठेवला. त्याची जपणूक, आणि प्रसार करायचा रस्ता बाबांना मोकळा करून दिला.

◫

श्री अंबुराव महाराज

जन्म १८५७ निर्वाण १९३३

प्रकरण तिसरे

श्री अंबुराव महाराज

श्री अंबाजी श्रीनिवास कुलकर्णी यांचा जन्म जिगजेवणीचा. जिगजेवणी गाव विजापूर जिल्ह्याच्या इंडी तालुक्यात आहे. हे भाऊसाहेब महाराजांच्या प्रमुख शिष्यांपैकी एक होते. संप्रदायात ह्यांना बाबा या नावाने संबोधले जाते. पौष शु. ६, शके १८५५, ता. २२-१२-१९३३, शुक्रवार, सकाळी ९.३० वाजता यांचे विजापूर येथे निर्याण झाले. ह्यांची समाधी इंचगेरी येथे आहे. समाधीच्या स्थापनेची वेळ– ज्येष्ठ शु. १५, शके १८५६, तारीख २७-६-१९३४, दुपारी १२ वाजता. यांची चरित्रे प्रसिद्ध झाली आहेत.

या पुस्तकात बाबांची काही पत्रे घेतली आहेत. पत्रांचे महत्त्व वेगळेच असते. त्या वेळचे निरोप इकडून तिकडे पोचवणे, इच्छा, भावना व्यक्त करणे, एखाद्या मुद्यावर आपले मत देणे हे पत्रांचे काम. बहुतेक वेळेला त्यात वस्तुस्थितीचे यथायोग्य चित्रण असते. अतिशयोक्तीचे तसे कारण नसते. म्हणून पत्रांचे रंग बहुशः फिकट असतात. गहिरे रंग भरून चित्र उठावदार करण्याचे पत्रलेखकाला प्रयोजन नसते. इतिहासकारालाही पत्रांमध्ये ढवळाढवळ करायला वाव रहात नाही. म्हणून पत्रे ही इतिहासाची फार प्रभावी साक्षीदार ठरतात.

१. महाराजांचे निर्याण

महाराजांच्या निर्याणाची दुःखद वार्ता बाबांनी गुरुदेवांना कळवली. त्याच शब्दांत ती बातमी पावाडेप्पा स्वामींना म्हणजे शिवलिंगव्वांच्या थोरल्या बहिणीच्या मुलाला कळवली. दोन्ही पत्रांवर ३०-१-१९१४ ही तारीख आहे. मजकुरात 'आज रोजी' महाराजांचे निर्याण झाले असे आहे. या शब्दांचा वरच्या तारखेशी मेळ बसत नाही. महाराजांचे निर्याण २९-१-१९१४ ला रात्री ८ वाजता झाले. दुःखाचा फटका बसलेल्या काळजाला कसेबसे सांभाळत त्याच रात्री लगोलग बाबांनी ही पत्रे लिहिली असतील

का? रातोरात ही पत्रे लिहिली असतील तर 'आज रोजी' हे शब्द चालतील, पण पत्रावरची तारीख ३० ऐवजी २९ समजली पाहिजे. दुसरा पर्याय म्हणजे तपःस्वाध्यायसंयमाने मनाला अंशतः सावरून दुसऱ्या दिवशी बाबांनी ही पत्रे लिहिली असतील. मग ३०-१-१९१४ ही तारीख जमते. मात्र मजकुरातील 'आज रोजी' याऐवजी 'काल रोजी' असे समजले पाहिजे. तारीख व मजकूर यांतील तफावतीवरून बाबांना शोक किती अनावर झाला असेल याची पुसट कल्पना येते.

हिंचेगेरी

३०-१-१९१४

सकलगुणसंपन्न रा.रा. पावाडेप्पा स्वामी मठदेवरु स्वामींचे सेवेसी

सेवक अंबाजी कुलकर्णी, मुक्काम हिंचगेरी, शिरसाष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. श्री सद्गुरुसमर्थ महाराज भाऊसाहेब उमदी आज रोजी माघ शु।। ३ रोज गुरुवार आठ वाजता इंचगेरी येथे स्वर्गस्थ जाहले. आपणा सर्व मंडळीस कळावे ही विनंती.

२. गुरुबंधूची तातातूट

लिंगप्पा सावळगी ३० मार्च १९१५ला रात्री ९ वाजता जमखंडी येथे वारले. ते महाराजांचे एक अतिशय निष्ठावंत शिष्य होते. त्यांच्या निधनाची वार्ता जमखंडीहून पत्राने मल्हारपंत जोशी यांना कळवली गेली. त्यावर त्यांनी बाबांना लिहिलेले हे पत्र. पत्रात उल्लेख असलेले गदगकर म्हणजे एम. एच. (गुंडोपंत) गदगकर, छत्रे म्हणजे डॉ. रामभाऊ छत्रे, देसाई म्हणजे तात्यासाहेब देसाई. हे सर्वजण महाराजांचे शिष्य होते. त्यावेळी हे सगळे शिक्षणासाठी मुंबईस होते.

श्री सद्गुरु प्रसन्न

मुक्काम विलेपार्ले, पोष्ट अंधेरी

ता. ५-४-१५

श्री समर्थ सद्गुरु अंबुराव महाराज कृपानिधी यांचे चरणसेवेशी. अज्ञान बालक मल्हारपंत जोशी, मुक्काम मुंबई, याचा अतिनम्रतेचा सिरसाष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. जमखंडीहून आमचे श्री समर्थ महाराज यांचे भक्तवर्य राजमान्य राजश्री लिंगप्पाअण्णा सावळगी यांना देवाज्ञा जाहल्याचे पत्र आलेले पाहून जिवास अत्यंत दुःख जाहले आहे. श्री समर्थास ही बातमी रामभाऊ रानडे यांचेकडून जमखंडीहून

कळलीच असेल. लिंगप्पा सावळगी यांचे प्रमाणे नेम करणारे, विश्वासुक, व शुद्धभाव असलेल्या लोकांना हल्ली आमचे पासून घेऊन जाण्याची श्री समर्थास इच्छा जाहली त्यास इलाज नाही. तथापि आमचे मूढपणामुळे मनाचे सांत्वन होत नाही. तरी समर्थांनी कृपावंत होऊन हे आता कसे जाहले याबद्दल शंका निवारण करतील अशी आशा आहे. त्याशिवाय आमचे दुःख कमी होणार नाही. लिंगप्पा सावळगी हे स्वर्गवासी जाहलेमुळे, इकडील सर्वत्र मंडळीस, गदगकर, छत्रे, देसाई, सर्वत्र मंडळीस अतिशय दुःख जाहले आहे. शिवाय आम्हा सर्वांस समर्थांचे चरणी नेण्यास लिंगप्पाच कारणीभूत होते. अशा वेळी समर्थांशिवाय दुःखाचे सांत्वन करणे कोणास शक्य नाही. म्हणून पत्राची अज्ञान बालक वाट पहात आहे. कालरोजी आपण स्वप्नांत येऊन लिंगप्पा यांचेबद्दल शोक न करता नेम करणेस सांगितले. तथापि श्री समर्थांचेकडून दोन अक्षरे आल्यास मनास जास्त समाधान वाटेल.

आपला अज्ञान बालक

मल्हारपंत जोशी

३. शिवभावाने पत्रभेट

हे पत्र बाबांनी शिवलिंगव्वांना लिहिलेले आहे. शिवभावाने आठवण झाली असल्यास प्रत्यक्ष भेट किंवा पत्र-भेट देवच घडवून आणतो. महाराज व बाबा यांची निंबरगीस झालेली भेट किंवा बाबा व मल्हारपंत जोशी यांची जळगावास झालेली भेट ही उदाहरणे बोलकी आहेत.

इंचगेरीस निंबरगी महाराज व भाऊसाहेब महाराज यांच्या समाधींची मंदिरे समोरासमोर आहेत. त्यांना जोडून महाराजांचे शिष्य गिरिमल्लप्पा मेत्री यांनी सभामंडप स्वखर्चाने बांधला. त्याची सुरुवात झाली असे हे पत्र सांगते.

श्री सद्गुरु समर्थ

हिंचगेरी २२-९-१६

कृतानेक दंडवत विनंति विज्ञापना. आपलेकडून कार्ड आजरोजी येऊन पोंचले. लिहिलेला मजकूर समजला. आनंद जाहला. इकडील सर्व मंडळी श्रीसमर्थ कृपेने आनंदरूप असो. विज्ञापना. आपले पत्राप्रमाणे सर्वास नमस्कार श्रुत केले आहे. पंधरा दिवसाखाली आपलेकडे पत्र घालावे असे आठवण जाहले तर तुमचेकडून पत्र

आलेवर उत्तर लिहावे अशीही आठवण जाहले. आजरोजी आपले कार्ड आलेले पाहून फारच आनंद जाहला. सर्व ठिकाणी आत्मा एकच आहे असा मनास आनंद जाहला. निरंतर आपली आठवण होतच आहे. कृपा असावी. हल्ली अश्विन शु. १५ पौर्णिमेदिवशी गिरमल्लप्पा जमखंडी यांनी येथील समर्थांचे सभामंडप बांधणेविषयी सांगून गेले आहे. समर्थांची भक्ति वाढत चालले आहे. कळावे. तीर्थरूप मुरगेव्वक्कास दंडवत नमस्कार श्रुत व्हावे. इकडील मंडळी वेंकप्पा मेस्त्री व बायकामंडळी यांचे दंडवत नमस्कार सांगितले आहे ते श्रुत व्हावे हे विनंती

अंबाजी कुलकर्णी
हिंचगेरी

४. नित्यनेमावलीची चौथी आवृत्ती

नित्यनेमावलीच्या पहिल्या तीन आवृत्त्या अनुक्रमे १९११, १९१६ व १९२४ साली प्रसिद्ध झाल्या. त्यानंतर १९३०ला चौथी आवृत्ती निघाली. तिच्या छपाईसंबंधी ग. वि. ऊर्फ काकासाहेब तुळपुळे यांनी बाबांना लिहिलेले हे पत्र असून लागलीच बाबांचे त्या पत्राला उत्तर लिहिण्याचे टिपण पत्राखाली आहे. १९३० सालची आवृत्ती नीलकंठ विष्णू तुळपुळे यांनी प्रसिद्ध केली. या नित्यनेमावलीत बरेच बदल केले आहेत. १९११ सालच्या प्रस्तावनेतील खूप भाग काढून टाकला आहे व इतरही बदल केले आहेत. ही आवृत्ती गुरुदेवांना विशेष आवडत नसे.

श्री

ता. ३-२-३० सोमवार *मुक्काम जळगांव*

श्री सद्‌गुरुचरणी अनंत प्रणिपात. श्रींचे कृपापत्र मिळाले. फार आनंद जाहला. सोबत नेमावलीसंबंधी रामभाऊ रानडे यांचे पत्र जोडले आहे. इंचगेरीचे देवळाचा फोटो नको काय? पुराणिकांची कविता घालणे जरूर आहे का? नवीन प्रतीतून प्रस्तावनेतील पाने ३१ ते ३८ (त्यांत १२ अभंगांसंबंधी चर्चा) काढून टाकावी व पंचसमासीही काढावी. महाराजांचे पुस्तक ४ आण्यांत देणेस परवडेल. तरी याबद्दल आपला विचार काय आहे तो कळवावे. एक पत्र मला लिहून त्याची नक्कल रानडे यांना पाठवावी. आपले उत्तर आल्यावर पुण्यास चिरंजीव निळूला छापविण्याचे काम सुरू करणेस सांगतो. इकडील सर्व मंडळींचा आपणास नम्रतेचा साष्टांग नमस्कार. टेंबे मास्तर

आपली फार फार आठवण करीत असतात व नेम नेमाने रोज करितात. निरंतर कृपा असावी हे विज्ञापना.

आपला नम्र शिष्य

गणेश विष्णु तुळपुळे

उत्तर विनंती -

इंचगेरीतील देवळाचे फोटो घातले पाहिजेत. इंचगेरी देवळाचे फोटो आलबत घाला, व निंबरगी महाराजांचे देवळाचे फोटो घातले तर हरकत नाही.

रामकृष्ण पुराणिक यांनी पाठविलेले पद लिहून घालावे व चांगले रीतीने पद समजणेजोगे छापावे. नवीन आवृत्तीत पंचेसमासी जो आगोधर महाराज असतानाच केलेली, ते कायम ठेविले पाहिजे. बारा अभंगही असावे.

याशिवाय या पत्रालगत आपलेकडे लिहिलेली रानडे महाराजाने ठेविलेली पत्र १ व रामकृष्ण पुराणिक यांचे पद १ असे दोन या पत्रालगत आहे. हे सर्व आपणाकडे पाठविले आहे. रानडेंचे पत्र जे आहे त्यात नवीन लिहिलेली (आष्टके ठेवावी) असे लिहिले आहे. काढणेचे व काढावे असे लिहिले आहे. ते समजून घ्यावे. आता आपणाकडेसच येऊ तर लिहिले आहे. आपले मर्जीप्रमाणे लवकर नेमावली छापणेची सुरू केल्यास फार उपयोगी पडतो. पत्राचे उत्तर यावे. तारीख १६-२-३० इसवी

आपला अंबाजी श्रीनिवास कुलकर्णी

इंचगेरी

घरातील सर्व मंडळीस नेमाबद्दल नमस्कार श्रुत असावे.

रामकृष्ण जमखंडी यांचे पद चांगले रीतीने छापावे.

५. औषधयोजना

पहिले पत्र बाबांनी महाराजांना लिहिले आहे. महाराजांच्या उत्तराचे मुद्दे दुसऱ्या पत्रात आहेत. इंचगेरी येथील निंबरगी महाराजांचे देऊळ बांधणे चालू होते. त्याचा उत्तरात उल्लेख आहे. महाराजांच्या सांगण्यावरून गोपाळप्पांनी हे उत्तर लिहिले आहे.

श्रीसद्‌गुरुसमर्थ

वडिलांस प्रार्थना

हली पित्तास अवषोध आज रोजी घ्यावे असे हेतु आहे. तरी सोलापुरचे डाकतर आवषोध घ्यावे अगर विज्यापुराचे गोरक चिंचाची आवषोध घ्यावे. दोनी पैकी येक कोणते घ्यावे हे विच्यार करून उत्तर यावे त्याप्रमाणे करितो हे विनंती

अंबाजी कुलकर्णी

उत्तर आसीरवाद

विज्यापुरचे गोरक आवषोध घेणेस आज्ञा व श्रीसमर्थ यांचे देऊळ, मेस्त्री यांचे म्हणणेप्रमाणे मागील जागा घेऊन बांधणेस हरकत नाही असा निघाले आहे. काही आंदेश नाही व मठात साप निघतात ते मारु नये. त्यास धक्का लावू नये. कोणासही इजा करीत नाही. पुढे बडती होणार आहे. असे खात्री होते कळावे हे आसीरवाद

गोपाळ

ताजा कलम. साप निघते ते श्रीसमर्थ यांचे देऊळ बांधणेस सुरू जाहले म्हणजे त्याचे शक्ती कमी होत आहे. हे काम होणेबद्दल साप निघत आहे ही खुलासा आहे. कळावे हे आसीरवाद.

आपले हेतूप्रमाणे भक्त येणार आहे. यासी काही काळजी करू नये. पुढील कमानाचे बेत ठेवून चालू करावे, असा निघते आहे.

६. चोखामेळा

बाबांचा मलकारी नावाचा एक हरिजन शिष्य होता. तो फार भाविक होता. तो पदे उत्तम म्हणत असे व भजने एकतारीच्या तालावर नाचत म्हणत असे. सनातनी मंडळींनी महाराजांच्या देवळात जाण्यास त्याला मनाई केली तर त्याच्या भक्तीत व्यत्यय येईल असे बाबांना वाटले म्हणून त्यांनी मलकारीसाठी एक स्वतंत्र देऊळ बांधून दिले होते. त्याला चोखामेळ्याचे देऊळ म्हणत. त्या देवळात मलकारीचे ध्यान, पूजा, भजन सर्व चाले. बाबा सर्व सप्ताहांच्या वेळेला तिथे जात असत. आजही हे देऊळ उभे असून इंचगेरी मठात बघायला मिळते. आकार ऐसपैस आहे. शहरवासीयांच्या डोळ्यांतून पाहिले तर तो एक चांगला लांबरुंद दिवाणखाना शोभेल. भिंती पक्क्या आहेत व वर पत्रे आहेत. दोन्ही बाजूंना दारे आहेत. आत मध्येच एक कट्टा असून त्याच्यावर पादुका कोरलेल्या आहेत. वर एक उभा दगड आहे पण त्याच्यावर पूर्वी अक्षरे किंवा काही चित्र असले तर ते आता पुसले गेले आहे. महाराजांच्या समाधीच्या मागच्या बाजूला हे देऊळ आहे. मलकारीचे भाग्य थोर यात शंका नाही ! चोखामेळ्याच्या या देवळाला लागणारे पत्रे रेल्वेने येणार होते त्यासंबंधी हे पत्र आहे.

श्री सद्‌गुरु समर्थ

ता. ३-२-२९ रविवार

रा.रा. जगन्नाथपंत रघुनाथ लेले मुक्काम पोस्ट निंबाळ यांसी इंचगेरी मठ अंबाजी श्रीनिवास कुलकर्णी याजकडून नेमाबद्दल अतिनम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार विनंति

विज्ञापना. समर्थ कृपेने आनंदरूप असो विज्ञापना. काल रोजी रा. रामराव रानडे यांजकडून अलाहाबादेहून पत्र आले आहे. त्या पत्रात त्यांची प्रकृति चांगली आहे म्हणून लिहिलेले पाहून मनास फार आनंद जाहले म्हणून मातोश्री यमनक्का यास कळविणे व सर्व मंडळीस शेट्याप्पासहित करून सर्वांस नेमाबद्दल नमस्कार कळवणे. सप्ता माघ शु. १ ता. १० रोजी सुरू होऊन ता. १२ रोजी समाप्त होत आहे. आपण सप्ताहास येतच आहा. कळावे.

इंचगेरी येथील चोखामेळ्याचे देऊळ

हल्ली पत्र लिहिणेचे कारण चोखामेळाचे पत्रे निंबाळास रेल्वेगाडीतून आले असतील. किती पत्रे आले आहेत ते मोजून उत्तर यावे. रेल्वेच्या खर्चाचे चार्ज ६ रु. १२ आणे रा. बसप्पा बालगाव, इंचगेरी येथे मठात आले होते तेव्हा त्यांच्या हातात दिले आहेत. तो पोचले असतीलच. सर्व हकीकतीचे उत्तर या पत्राखाली पाठवावे ही विनंती.

अंबाजी कुलकर्णी

इंचगेरी मठ

श्रीमती शिवलिंगव्वक्का

जन्म १८६७ निर्याण १९३०

प्रकरण चवथे

श्रीमती शिवलिंगव्वक्का

श्रीमती शिवलिंगव्वा या भाऊसाहेब महाराजांच्या एक आत्मानुभवी शिष्या होत्या. जन्मभर पाठपुरावा करणाऱ्या संसारातील दुःखांना त्यांनी परमार्थाची मलमपट्टी लावली. यांची बरीच पदे प्रसिद्ध आहेत. नीती व परमार्थ शिकवणारी ही पदे भक्तीच्या जिव्हाळ्याने दाटलेली आहेत. अजून कितीतरी पदे अप्रकाशित आहेत. ध्यानपक्व शिवलिंगव्वा अधिकारवाणीने गुरुबंधूंना उपदेश करीत. त्यांची अगदी त्रोटक माहिती देणारे टिपण मिळाले आहे. ते कन्नड भाषेत आहे.

जत- तवरु मने
उमराणी- अत्तेय मने
प्राथमिक शाळा मास्तर, मराठी.
करबसय्या बिन परय्या नंदीकोलमठ साकिन उमराणी

सही- १०, माहे ऑगस्ट, सन १८८२, (कन्नड लिपीत). (शिवलिंगव्वांचे माहेर जतेस व सासर उमराणीस होते. त्यांच्या पतीचे पूर्ण नाव करबसय्या परय्या नंदीकोलमठ, रहाणार उमराणी. त्यांची सही कन्नडमध्ये आहे). यांचे चरित्र प्रसिद्ध झाले आहे.

१. काही पत्रे

(अ) लोकांस आत्मज्ञानाचा विसर :

श्रीगुरु समर्थ

श्रीमत् आनंदमय आत्माराम अंकित रामराय अण्णा रानडे, मुक्काम पुणे, यांस जतेहून दासानुदास सीवक्का दोनी कर जोडून समर्थ चरणी मस्तक ठेवून त्रिकाल अतिनम्रतेचा शिर साष्टांग नमनपूर्वक नमस्कार करीत आहे. लोकांस आत्मज्ञानाचा

मार्ग कसा लाभेल या विवंचनेतच आहात म्हणून तुम्ही पत्र लिहिले आहे खरे. त्यापैकी मठात तिळमात्र आत्मज्ञान बोलूच नये की. समर्थांचे भक्तीचा अभिमान जर सर्वांस असेल तर समक्ष भेटी अंती खुलासा होईल. तेथील हकिकत लिहिता येत नाही. किती काय म्हणून लिहू? समर्थ इंचगेरीस येऊन ते क्षेत्र कशाकरता केले आहे. आणि पुण्य पवित्र कशाकरता म्हणविले आहे याचा विचार आपण सुज्ञ पुरुष करीतच आहा. त्या पुण्यक्षेत्रात समर्थ ईश्वराचे नामस्मरण कसे चालावे किती चालावे...

हे पत्र अपूर्ण आहे. ते १९२० सालच्या आसपासचे असावे असे पत्राच्या मजकुरावरून वाटते. त्या वेळी इंचगेरी मठातील परिस्थिती असमाधानकारक होती. महाराजांच्या शिष्यांत थोडा मतभेद होता व वातावरण तंग होते. इंचगेरीच्या अध्यात्मवैभवाबद्दल आत्मीयता असणाऱ्या शिवलिंगव्वक्कांना हे पाहून दुःख झाले असले तर नवल नाही.

(आ) सांत्वनपर पत्र :

श्री. गो. जांभळीकर यांच्या मातोश्री रुक्मिणीबाई यांचे निधन झाले. त्या वेळी शिवलिंगव्वक्कांनी जांभळीकरांना लिहिलेले हे पत्र. पत्र पोस्टकार्डावर असून त्याचे चारी कोपरे फाटून गेले आहेत. अवशिष्ट भाग वाचता येतो. पत्र जतेहून १ मे रोजी निघून ३ मे रोजी कोल्हापूरला पोचले आहे. पोस्टाच्या शिक्क्यात सन अस्पष्ट आहे. तो १९२६ किंवा १९२८ असावा असा अंदाज आहे. पत्र शिवलिंगव्वक्कांच्या हस्ताक्षरात आहे.

चिरंजीव ... श्रीपाद बालक यास आनंद आशीर्वाद. गुरुकृपा निरंतर असो. पत्र आले ते वेळी मी गावी नव्हते. म्हणून पत्र घालण्यास विलंब झाले आहे. गुरुमाऊली माझी. रुकमाबाईचे निर्याण ऐकून फार हळहळ जाले. माया संबंधामुळे वाईट वाटते. परतण्याचे कार्य या मानात उत्तम जाले. रामरूपात मिळाले. माऊली माझी. रुकमाबाईचे भक्ती, कोमल भाव, लिहिता सांगता प्रेमाची अश्रुधार नयनी लोटते आपोआप. भक्तीचे कनवाळु म्हणून पवित्र स्थळात मिळाले. तर त्याचे तिळमात्र हळहळ करू नये... दुःख आणू नको... मान्य आहे, आपण नेमनाम करून आनंदरूप असावे. आपण सवडीनुसार येऊन भेट देऊन जावे. मुरगेव्वक्कास फार हळहळ झाली आहे. भेट देऊन जावे.

सीवक्का

श्री. गो. जांभळीकर
मुक्काम जांभळी, पोस्ट हातकणंगले,
कोल्हापूर

हे शिवलिंगव्वांचे पत्र अनेक दृष्टींनी महत्त्वाचे वाटते. पत्रास उशीर झाल्याचे त्यांना जाणवत आहे. जांभळीकरांचे पत्र आले तेव्हा त्या गावाला गेल्या होत्या ते वेगळे. पण पत्राला उत्तर लागलीच गेले पाहिजे ही त्यांची भावना लक्षात घेण्यासारखी आहे. गुरुमाऊली आणि गुरुकृपा याशिवाय त्या बोलत नाहीत. दोन ठिकाणी 'गुरुमाउली माझी' असे सद्‌गुरुस्मरण पत्र लिहिता लिहिता त्यांनी केले आहे. संसारधंदा करताना सतत गुरूंचे अनुसंधान त्या ठेवत असत हे लागलीच लक्षात येते. रुक्मिणीबाईंच्या निधनाचे दुःख 'माया रडवते' या भूमिकेतून त्यांनी व्यक्त केले आहे. रुक्मिणीबाईंना अंतकाळी यातना झाल्या नसाव्यात असा तर्क वाहतो. 'परतण्याचे कार्य' म्हणजे निधन. विना दैन्येन जीवनम् अनायासेन मरणम् असे एक सुभाषित आहे. त्यानुसार देवाकडे परत जाण्याचा प्रसंग घडला असावा. त्या आपल्या भक्तीने रामरूपात मिसळल्या तेव्हा दुःख करू नये असे जांभळीकरांचे सांत्वन अक्कांनी केले आहे. त्यांचे स्त्रीहृदय व कविहृदय या पत्रात स्पष्टपणे प्रतिबिंबित झाले आहे. पत्रात उल्लेख असलेल्या मुरगेव्वक्का म्हणजे शिवलिंगव्वक्कांच्या मोठ्या बहिणीची मुलगी.

(इ) 'जो भाव ठेवतो तो भाग्यवंत' :

श्रीमत्

श्रीमत् सच्चिदानंद नित्यपरिपूर्ण निर्मल निजानंद स्वरूपाधिकारी महाराज पौत्र नागप्पा बालक निंबरगी यांस जतेहून सीवक्का हिचा दोन्ही कर जोडून समर्थ चरणी मस्तक ठेवून त्रिकाळी अतिनम्रतेचा शिर साष्टांग दीर्घ दंडवत नमस्कार. नेमाबद्दल प्रार्थना. विनंति विशेष. आता आपणास पत्र लिहिण्यास कारण की समर्थे केलेली उपकार अंतःकरणी ठरली असता समर्थाचे आज्ञा हाच प्रथम नेम. नेम म्हणजे हरतऱ्हेचे नाना प्रकारचे भक्तीमध्ये बहुरूप येत आहे. त्याचेकडे न पाहता हाच एक निकट नेम जर पाहिले तर आहाहा होते. समर्थाचे वाक्य असा आहे की "गंभीर नाम व सूक्ष्म रूप हा तीनी वक्रतप दृष्टीने जपून तुम्ही हत्तीवर बसा, काही हरकत नाही." असे समर्थांचे वाक्य आहे. हा तरी तुम्हास पक्का माहीत आहे. हीच गुरुआज्ञा पालन करितो तोच देवाचा अंश व कुळवंत, गुणवंत. भाव ठेवलेला भाग्यवंत तोच एक, त्याचेकडे लक्ष ठेवलेला तोच एक लक्ष्मीवंत, हा एक बलात्कारे भक्ती करील तोच एक बलवंत. तोच एक गुरुभक्त इत्यादि पथ्यमार्गाने चालेल त्याचे होईल कल्याण. आयते ताट वाढून समर्थांने ठेवले आहे ते ताट साधून घेण्याचे आपलेकडे आहे. हा

ताट पुढे साधून घेईन म्हणेल तो आवघा आत्मघातकी. आपल्या हाती आपण गळा कापून घेतले सारखी होईल. नातरी सध्या साधून घेऊ. हे वेळ पुढे मिळणार नाही. म्हणून आजचे आज साधून घेऊ असे अंतःकरणी ठरवून जबरदस्त खबरदारीने नेमनाम करीत जाईल तोच प्रकाशवाहन होईल. सत्यवंत सत्यपुरुष होतच आहे. काही या गोष्टीला तिळमात्र संदेह नाही.

सिवाक्का

श्री. गो. जांभळीकर यांनी या पत्रावर एक टिपण लिहिले आहे ते वाचण्यासारखे आहे :

"श्री नागप्पणास पत्र लिहिले त्याचा सारांश, मुख्य उपदेशामृताचे सार व त्यातील थोडा विस्तारपूर्वक विचार

"प्रथम श्री शिवलिंगव्वा अक्का यांनी श्री गुरुलिंगजंगम महाराज पौत्र महाराज नागप्पणा यांचे बद्दल जो सुरुवातीचा मायना लिहिला आहे तो इतका उत्तम आहे की त्याच्या बद्दल थोडा विचार करणे जरुरीचे आहे. त्या म्हणतात नित्यपरिपूर्ण, निर्मल, निजानंद, स्वरूपाकार असे जे निंबरगी महाराज त्यांचे आपण पौत्र आहात. दोन्ही कर जोडून समर्थचरणी मस्तक ठेवून अतिनम्रतेचा नमस्कार करून विनंती करून विशेषेकरून नेमाबद्दल प्रार्थना केली आहे. त्या म्हणतात की समर्थांनी आम्हांवर उपकार करून ठेवले आहेत. त्यांचा विचार अंतःकरणात ठरवून आम्हांस प्रथम कर्तव्य म्हणजे श्री समर्थ आज्ञा, गुरुवचन प्रतिपालन हा नेम. आपल्या ध्यानाचे वेळी भक्तीचे प्रसंगी निरनिराळे विचार, कल्पना, विकल्प वगैरे येतात, त्यांकडे अगदी दुर्लक्ष करून, मन एकाग्र करून, अंतःकरण शुद्ध करून, कशाकडेही, विकल्पांचे आडरान न घेता, लक्ष न देता अतिनेमाने, निकट भावाने ईश्वराकडे, गुरुवचनाकडे लक्ष ठेवून श्री गुरू समर्थांनी सांगितल्या प्रमाणे समर्थ वाक्याप्रमाणे– गंभीर नाम, सूक्ष्म रूप, वक्रतप दृष्टीने म्हणजे नासाग्री दृष्टी ठेवून जपून तुम्ही हत्तीवर बसा काही हरकत नाही. अशा वाक्याचा अर्थ सतत गंभीर नाम व सूक्ष्म सुंदर रूपडे, दृष्टीवरून जपून म्हणजे आपण कोणत्याही परिस्थितीत असले तरी नाम, रूप व दृष्टी ही तीन्ही सोडता कामा नये. हत्तीवर बसा म्हणजे वैभवात असा अगर दारिद्र्यात असा. गुरुवचन प्रतिपालन वरील प्रमाणे करावे.

"हे सर्व आपणास माहीत आहेच, गुरुआज्ञा पालन करणे म्हणजे आपण देवाचे कार्य अंशरूपाने करीत राहणे. कुळाचा उद्धार करणे. भाव ठेवलेला भक्त भाग्यवंत,

लक्ष ठेविलेला भक्त लक्ष्मीवंत, बळात्काराने म्हणजे अंतःकरणापासून भक्ती करणारा भक्त बळवंत, तोच एक गुरुभक्त. अशा पथ्याने चालणारा भक्त म्हणजे देवाला, गुरूला, प्रिय असणारा भक्त होय. त्याचे कल्याण करणे श्रीसमर्थांना जरूर आहे. आपण आपल्या नरजन्माचा विचार करावा. इतके समजत असूनही आपल्यास आपले कल्याण समजत नाही असे झाले तर आपण दुर्दैवी खरेच! कारण इतके वैभवाचे नामामृताचे ताट श्रीसमर्थांनी आपल्यासाठी वाढून ठेवले आहे, या वैभवास तुच्छ समजू नये. ही वेळ साधून घेणेचे आपले कर्तव्य आहे. पुढे मागे केव्हातरी आपण गुरुभक्ती करू, नरजन्म पुष्कळ आहे, केव्हांतरी जमून जाईल, हा सिद्धांत खोटा आहे. "यांच जन्मी, यांचि डोळां पाहीन मुक्तीचा सोहळा" या तुकाराम वचनाप्रमाणे आताच साधून घ्यावे. आत्मघातकीपणाने वागू नये. आपला गळा आपण कापून घेतल्यासारखे होईल. पुढे वेळ मिळणार नाही. काळ आपल्यासाठी थांबत नाही. आजचे आज साध्य करून घेऊ असे अंतःकरणात ठरवून जबरदस्त खबरदारीने नेमनाम गुरुवचनाप्रमाणे करत गेल्यास श्री समर्थकृपा प्रसाद होण्यास वेळ लागणार नाही. डोळ्यासमोर चित्प्रकाश दिसेल. सत्यमार्गाने सत्याने व पथ्याने चालेल तो सत्यवंत पुरुष, सत्पुरुष या संज्ञेस प्राप्त होतो. 'आपुल्यासारिखे करिती तात्काळ', या प्रमाणे सत्यमार्गाने सत्पुरुष होतो. यात तिळमात्र संदेह नाही."

शिवलिंगव्वांची योग्यता व नागपण्णांच्या निमित्ताने आपणा सर्वांना उपदेश करण्याचा त्यांचा अधिकार लक्षात घेऊन पत्राचा अर्थ जांभळीकरांनी लावला आहे. पत्राच्या अभ्यासाचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे. या पत्रातला उपदेश सर्वांना, सर्वकाळी, सर्व ठिकाणी, सर्व परिस्थितीत लागू पडतो.

२. ग्रंथार्पण

जांभळीकरांच्या दप्तरात एक छोटी चोपडी मिळाली. तिच्या वरच्या पानावर अक्कांच्या हस्ताक्षरातील अर्पणपत्रिका आहे. पानाच्या मागच्या बाजूवरही त्यातला थोडा भाग पुन्हा लिहिला आहे.

ग्रंथार्पण

श्रीमत् परमपूज्य श्री सद्गुरु भाऊसाहेब प्रिय महाराज. श्री सद्गुरु. श्री सद्गुरु भाऊसाहेब साधुमहाराज प्रिय मठ हिंचगेरी, संस्थान जत यांचे परमपावन दीनोद्धारक चरणी अर्पण केले असे.

संस्थान जत येथे रहाणार, गुरुचरण सेवेसी सेवक, सीवलिंगव्वा अक्का. नामात निमग्न

अर्पणपत्रिका शिवलिंगव्वांचा सद्‌गुरूविषयीचा परमादर व भक्ती तर दाखवतेच, शिवाय लेखिका नामात निमग्न राहून आपले पारमार्थिक कर्तव्य चुकू देत नाही हेही सांगते. ही अर्पणपत्रिका असणारा कोणता ग्रंथ अक्कांनी लिहिला असेल असे कुतूहल साहजिकच जागृत होते. 'श्री सद्‌गुरू समर्थ गुरुलिंग जंगम महाराज यांचे वचनामृत' असा मथळा देऊन त्यांनी रघुनाथाचार्य आद्य यांनी संग्रहित केलेल्या निंबरगी महाराजांच्या वचनांच्या एका पोथीतील काही पाने लिहिली आहेत. संप्रदायाच्या या आद्यग्रंथाचे महत्त्व ही संतमंडळी जाणून होती. शिवाय रघुनाथाचार्य आद्य यांच्या पावलावर पाऊल टाकून हा ग्रंथ पुन्हा पुन्हा लिहून काढण्याची परंपरा संप्रदायात होती हेही स्पष्ट होते. शिवलिंगव्वक्कांच्या या चोपडीत पुढे निंबरगी महाराजांचे एक पद, ज्ञानेश्वरीतील काही ओव्या व इतर पारमार्थिक पदे लिहिलेली आहेत.

ही अर्पणपत्रिका आता श्री गुरुदेव रानडे समाधी ट्रस्ट, निंबाळ, यांनी सुरू केलेल्या वस्तुसंग्रहालयात ठेवली आहे.

३. सूचक दृष्टान्त

"श्री शिवलिंगव्वा अक्का यांना श्री समर्थ भाऊसाहेबांनी ८ वाजता निर्याणाचे वेळी 'आकाशमंडपाचे पलीकडे जातो' असे सांगितल्याची नोंद"

शिवलिंगव्वांच्या कागदपत्रावरून जांभळीकरांनी केलेले हे टिपण आहे. आकाशमंटपाच्या पलीकडे या महाराजांच्या शब्दांनी स्थलकालातीत स्थिती दाखवली जाते. सर्वांच्या पलीकडे म्हणजे निर्गुण-निराकार परमतत्त्व. त्याच्याशी महाराज एकरूप झाले. निजानंदात समरस झाले असा याचा अर्थ.

४. 'सावधान सावधान'

पुढील वाक्य जांभळीकरांनी 'शिवलिंगव्वांच्या वचनांची सुमनांजली' म्हणून लिहिलेल्या कागदांत आहे. ते फार महत्त्वाचे आहे.

"गुरूच्या ठिकाणी गुरू होऊन ह्या सभामंटपात पाया पडून घेता हा फार अन्याय अन्याय होतो."



ग्रंथार्पण.

श्रीमत्परम पुज्य - श्री सद्गुरु
भाऊसाहेब प्रिय महाराज
श्री सद्गुरु - श्री सद्गुरु
भाऊ साहेब सादु महाराज
प्रिय . मठ . हींचगेरी संस्थान
जत याचे परम पावन व
दीनोद्धारक चरणी अर्पण
केला असे

संस्थान जत येथे राहणार
गुरु चरण - सेवेशी सेवक
श्री शिवलींगवा आक्का [illegible]

ग्रंथार्पण (शिवलिंगव्वांचे हस्ताक्षर)

तपःपूत वाणीने शिवलिंगव्वक्कांनी उच्चारलेल्या या एका वाक्याने अमानित्वाचा उदात्त आदर्श जगापुढे ठेवला आहे. जांभळीकरांच्या हृदयाला हे जाऊन भिडले यात नवल नाही. त्यांच्या स्वतःच्या बाबतीत पूर्वी एक अशा छापाची घटना घडली होती. ते निंबाळला गेले असताना त्यांनी गुरुदेवांच्या पायावर डोके ठेवून नमस्कार केला. ते गुरुदेवांना बिलकूल आवडत नसल्याने ते रागावले. भाऊसाहेब महाराजांच्या चरणांइतके कुणीच थोर नाही म्हणून असा नमस्कार करणे बरोबर नाही असे त्यांनी जांभळीकरांना बजावले. जांभळीकरांनी गुरुदेवांचा राग तर मनावर घेतला नाहीच, उलट गुरुदेवांच्या तोंडून सद्‌गुरूंची महती ऐकायला मिळाली व आपला महाराजांबद्दलचा आदर द्विगुणित झाला असे त्यांनी गुरुदेवांना लिहिले. ते पत्र वाचून गुरुदेव गहिवरले होते. आपल्या मातृतुल्य ज्येष्ठ गुरुभगिनीच्या तोंडातून आलेल्या महावाक्याचे प्रात्यक्षिक गुरुतुल्य ज्येष्ठ गुरुबंधूच्या वर्तनात जांभळीकरांना दिसले.

मंदिरात पाळावयाच्या नियमांच्या संहितेत असे स्पष्ट सांगितले आहे की मंदिरात प्रवेश केल्यावर त्या मंदिरातल्या दैवताखेरीज अन्य कुणालाही नमस्कार करू नये.

ता. ३ ते ५ जानेवारी १९५२ या तीन दिवसांत निंबाळला झालेल्या सिंटिंग्जची एका साधकाने टिपणे करून ठेवली आहेत. त्यांतील एक टिपण असे आहेः-

निंबाळची सद्यः परिस्थिती वर्णिताना गुरुदेव म्हणाले, "हल्ली लोक सगुणाच्या मागे फार आहेत. जो उठतो तो मला नमस्कार करतो. महाराज किंवा अंबुराव यांच्याप्रमाणे मला नमस्कार करणारी व्यक्ती न दिसता तिच्या जागी देव दिसत असता, तर गोष्ट निराळी होती. पण तसे नसताना मला व्यर्थ नमस्कार करणे म्हणजे माझ्या मनात विनाकारण अहंकार उत्पन्न करणे आहे. हा सर्व सगुण भक्तीचा अतिरेक होय. येथे निर्गुणाची जागा एकच आहे व ती म्हणजे नेमाची खोली. ही खोली मात्र निर्गुण आहे."

नुसते नमस्कार करून मोकळे होण्याऐवजी नमस्कार न करता निवांत बसून नेम करणे हे केव्हाही श्रेष्ठ आहे. सर्व संत कंठरवाने हे पुन्हा पुन्हा सांगत आहेत. पण लक्षात कोण घेतो?

□

श्री गुरुदेव रानडे

जन्म १८८६ निर्याण १९५७

प्रकरण पाचवे

श्री गुरुदेव रानडे

श्री रामचंद्र दत्तात्रेय रानडे यांचा जन्म ३ जुलै १८८६ रोजी जमखंडी येथे झाला. संप्रदायात यांचा उल्लेख 'गुरुदेव' असा केला जातो. कार्तिक शु. १४ (वैकुंठचतुर्दशी), शके १८२३, तारीख २५-११-१९०१ रोजी जमखंडी येथे भाऊसाहेब महाराजांकडून त्यांना नाम मिळाले. त्यांचे निर्याण ६ जून १९५७ रोजी निंबाळ येथे झाले. निंबाळ आर. एस. जिल्हा विजापूर, येथे त्यांनी आश्रम स्थापन केला आहे. त्यांची समाधी निंबाळ येथे आहे. यांची चरित्रे प्रसिद्ध झाली आहेत.

१. निंबाळसंबंधी दृष्टांत

अ) गुरुदेवांना- निंबरगि महाराजरु निंबाळक्क होग्यार (निंबरगी महाराज निंबाळला गेले आहेत).

आ) गोपाळप्पांना- निंबाळला जेव्हा नुसती जागा होती तेव्हा गोपाळप्पांना तिथे तंबू, बंगले, राजेरजवाडे यांचा दृष्टांत झाला. गोपाळप्पा हे महाराजांचे शिष्य.

इ) शिवलिंगव्वक्कांना- निंबाळ पुढे अध्यात्माचे केंद्र बनणार असा सूचक दृष्टांत. त्याचा तपशील उपलब्ध नाही.

ई) स्वप्नात बाबांनी 'माझी समाधी निंबाळ येथे करता का?' असे विचारले. स्वप्न गुरुदेवांना पडले असावे.

गुरुदेवांच्या सांगण्यावरून १४-१०-१९४६ रोजी बाबासाहेब संगोराम यांनी हे टिपण केले आहे.

२. ‘नी मुंद होगु; ना हिंद बरतीनि’

१९२२-२३ साल असावे. गुरुदेव इंचगेरीला होते. त्या वेळेस त्यांना एक स्वप्न पडले. गुरुदेव व भीमराव (महाराजांचे चिरंजीव) या दोघांना उद्देशून महाराज म्हणाले, ‘निंबरगि महाराजरु निन्न बेन्न मेले इद्दारे; नी मुंद होगु; ना हिंद बरतीनि’ (निंबरगी महाराज तुझ्या पाठीशी आहेत; तू पुढे चल; मी मागाहून येतो).

त्या वेळेस गुरुदेवांना काही आर्थिक अडचण होती. तसेच भीमरावांच्या दत्तकाबद्दल कोर्टात खटला चालला होता. महाराजांचे वडील बंधू मार्तंडराव ऊर्फ नानासाहेब यांना भीमराव दत्तक गेले होते. दत्तकप्रकरणी काही तंटा निर्माण झाला होता असे दिसते.

स्वप्नानंतर घडलेला प्रसंग म्हणजे गुरुदेव इंचगेरीहून होर्तीस आले. तिथे त्यांना मुंबई युनिव्हर्सिटीकडून आलेले पैसे मिळाले. त्या वेळेस इंचगेरीस पोस्ट नव्हते. होर्तीस पोस्ट ऑफीस असून आठवड्यातून एकदा पोस्टमन इंचगेरीस जाऊन पत्रे देत असे. गुरुदेव स्वतःच अनायासे होर्तीस आल्यामुळे पोस्टातील अधिकाऱ्यांनी तिथेच पैसे त्यांच्या हाती सुपूर्त केले. गुरुदेवांची आर्थिक अडचण निवारण झाली व महाराजांचे शब्द खरे झाले. पुढे गुरुदेव पुण्यास गेले. तिथून मिरज-शेडबाळ-अथणी मार्गे ते इंचगेरीस परत येत होते. वाटेत शेडबाळ स्टेशनवर भीमराव भेटले. त्यांना खटल्यासंबंधी काळजी लागली होती. गुरुदेव त्यांना म्हणाले, ‘निंबरगी महाराज तुमच्या पाठीशी आहेत, तुमचे काम होणार.’ पुढे दोन-चार दिवसांतच खटल्याचा निकाल भीमरावांच्या बाजूने लागला. म्हणजे भीमरावांच्या बाबतीतही महाराजांचे शब्द खरे झाले.

३. महाराजांचे चिताभस्म

गुरुदेवांनी महाराजांचे चिताभस्म एका पुडीतून आणून घरी जपून ठेवले होते. गुरुदेवांना एक स्वप्न पडले व त्या स्वप्नात ती भस्माची पुडी हरवणार असे सूचित झाले. जगन्नाथपंत लेले हे गुरुदेवांचे नातेवाईक नेहमी त्यांच्याकडेच असत. त्यांना गुरुदेव म्हणाले की, ‘आता ही पुडी जिवापाड जपली पाहिजे बरं का!’ पण इतके करूनही ती पुडी चोरीला जायची ती गेलीच. गुरुदेव अतिशय हळहळले. नंतरची कथा अशी की गुरुदेवांना पुन्हा स्वप्न पडून महाराजांकडून दिलासा मिळाला की भस्माची दुसरी पुडी मिळेल, पण ती जागा बदलून ठेवावी. पुढे शेट्टप्पा कोळी यांच्याकडून चिताभस्माची पुडी मिळाली व महाराजांचे स्वप्नातले शब्द वास्तवात उतरले. गुरुदेव तेव्हा जुन्या घरात राहत होते. त्यांनी चिताभस्माची पुडी महाराजांच्या फोटोच्या खाली कोनाड्यात ठेवली.

४. नित्यनेमावली

(अ) प्रास्ताविक : नित्यनेमावली म्हणजे संप्रदायाची भजनावली. संप्रदायात त्रिकाळ भजनाचा परिपाठ आहे. याशिवाय आरत्या, पाळणे, करुणाष्टके वगैरे रोजच्या म्हणण्यात असतात. पहिली नित्यनेमावली १९११ साली प्रसिद्ध झाली. या नित्यनेमावलीची विस्तृत प्रस्तावना गुरुदेवांनी लिहिली आहे. तिथे स्वतःचे नाव घातले नाही हे सर्वश्रुत आहे. १५ ते १८ जुलै १९५२ या दिवसांत ज्या सिटिंग्ज निंबाळला झाल्या त्यांपैकी एका सिटिंगमध्ये गुरुदेवांनी याबद्दल हकीकत सांगितली. त्याचे एका साधकाने टिपण करून ठेवले आहे. गुरुदेव म्हणाले, "ही प्रस्तावना मी इ. स. १९१० मध्ये लिहिली. महाराजांनी ती रबकवी ते तेरदाळ या प्रवासात मजकडून चार वेळा वाचून घेतली. ऐकल्यावर त्यांना आनंदाचे भरते आले व ते इतकेच म्हणाले की, 'पहा, सर्व करून आपण कसा नामानिराळा राहिला आहे तो.' या प्रस्तावनेत मी महाराजांविषयी जे काही लिहिले आहे त्यात त्यांची स्तुती अशी मुळीच नाही. Facts आहेत. महाराजांत जे मी पाहिले ते लिहिले आहे".

प्रस्तावना गुरुदेवांनी लिहिलीच. याशिवाय पंचसमासीमधल्या दुसऱ्या समासातील पुष्कळसा मजकूर व पाचव्या समासातील मुक्तिलक्षण (ओव्या ६७-८१) हा भाग गुरुदेवांच्या हातचाच आहे.

(आ) पहिली आवृत्ती, १९११ : एक जुनी नित्यनेमावली निंबरगी येथे मिळाली. ही १९११ सालची म्हणजे पहिली आवृत्ती आहे. ती भाऊसाहेब महाराज विद्यमान असताना निघालेली असल्याने तिला महत्त्व आहे. हिचा आकार १३.५ × १०.५ सेंटिमीटर असून विषयानुक्रमणिकेपासून शेवटपर्यंत संहितेची सर्व पाने धड स्वरूपात मिळाली. सूचीमधल्या पद्यारंभ व पृष्ठक्रमांक अशा सविस्तर मांडणीत गुरुदेवांच्या पद्धतीतला नीटसपणा स्पष्ट दिसतो. रात्री म्हणण्याच्या भजनापासून नेमावलीची सुरुवात होते. प्रथमतः गुरुवार ते बुधवार असे भजनारंभ असून लागलीच 'धन्य हो प्रदक्षिणा' इथपासून 'देह तो पंढरी'पर्यंत भजन येते. हल्ली हा भाग दुपारचे भजन म्हणून धरला जातो. या पाठोपाठ बारा अभंगांपासून 'अहो बोलिलें लेकरूं' या अभंगाच्या अखेरपर्यंत पद्ये छापलेली आहेत. मग 'गणाधीश जो ईश' इथून सुरू होणारे सकाळचे भजन आढळते. हे 'आनंदु रे' या अभंगाअखेर आहे. मात्र 'कृपाळु सज्जन' हा अभंग मध्येच म्हणजे 'पहिलें पाहतां श्रीमुख' या अभंगाच्या पाठोपाठ दिला आहे. यानंतर 'पाहे प्रसादाची वाट' या अभंगाने रात्रीच्या भजनाचा धागा उचलला जातो, तो 'माडो परमेश्वर

गुरुध्यान' हे पद संपेपर्यंत धरला जातो. याचा अर्थ असा की रात्रीचे भजन प्रदक्षिणेपासून जे सुरू होई, ते सध्याचे सकाळचेही भजन मध्येच सामावून घेऊन मग पूर्ण होई. ढोबळ मानाने असे म्हणता येईल की काकडारती वेगळी काढली असून हल्लीचे सकाळचे, दुपारचे व रात्रीचे तीन्ही भजने एकत्र गुंफली आहेत. नित्यनेमावलीत यानंतर विडा, आरत्या, शेजारती, अष्टके, धावा, पाळणे, भारुडे आहेत. मग येते काकडारती. नेहमीप्रमाणे 'एळु नारायण' व 'शरणु सिद्धिविनायक' ह्या भूपाळ्या येतात. लागलीच 'उठोनिया प्रातःकाळी' हा अभंग दिसतो. मात्र या पद्यानंतर एकदम 'फळलें भाग्य माझें' या आरतीला स्थान दिले आहे. 'गुरु हा संतकुळीचा राजा' हा अभंग इथे नाही याचे जरा आश्चर्य वाटले. हा अभंग १९१६च्या आवृत्तीतही नाही. यावरून दुसऱ्या एका प्रसंगाची आठवण होते. गुरुदेव फार आजारी होते म्हणून त्यांना भेटण्यासाठी २० मे १९५७च्या सुमारास सोलापूरचे एक साधक श्री वामनराव कुलकर्णी निंबाळला गेले होते. त्यांना गुरुदेवांनी सांगितले की काकडारतीच्या वेळेला 'गुरु हा संतकुळीचा राजा' हा अभंग म्हणू नका. हा अभंग नेहमी म्हटला जाई. पूर्वी तो म्हणू नका असे कधीही गुरुदेवांनी सांगितले नव्हते. आता हा अभंग नित्यनेमावलीच्या पहिल्या दोन आवृत्त्यांत नसावा आणि गुरुदेवांनी तो अभंग म्हणू नका असे सांगावे यात अर्थाअर्थी काही संबंध आहे काय हे एक गूढच राहते. असो. काकडारतीनंतर नेमावलीत पंचसमासी असून मग काही शिष्यमंडळींची पदे घातली आहेत. गुरुदेवांनी १० डिसेंबर १९१० रोजी महाराजांना लिहिलेल्या पत्रात 'चार पदे घातली आहेत' असेच लिहिले आहे. या चार पदांपैकी 'पूर्ण प्रतापा भक्तवत्सला' आणि 'ज्याही देऊनि बीजमंत्र' ही दोन पदे लक्ष्मणराव लिमये यांनी, 'माझ्या सद्‌गुरुचा अगाध महिमा' हे पद मल्हारपंत जोशी यांनी व 'जय जय जय भाऊरावराज सद्‌गुरु' हे पद सोमनाथपंत पंचनदीकर यांनी रचले आहे. गुरुदेवांनी लिहिलेली प्रस्तावना पूर्ण स्वरूपात इथे आहे.

हाती आलेल्या पुस्तकाचे मुखपृष्ठ फाटून गेल्याने त्याच्या वरचा सन पाहावयास मिळाला नाही. आता ही नेमावली '१९११चीच आहे असे वाटते' एवढे म्हणून भागणार नाही. इतिहासाला भोळा भाव मानवत नाही. त्याला निर्णायक पुराव्याची खणखणीत नाणी लागतात. इथे तीन सबळ अन्तर्गत पुरावे देता येतात.

१. 'संपलेसे वाटे अवतारकार्य' हा भाऊसाहेब महाराजांच्या निर्याणाचा अभंग इथे नाही. म्हणजेच ती १९१४च्या आधीची असली पाहिजे. नेमावलीची दुसरी आवृत्ती १९१६ मध्ये बाहेर आली. तेव्हा १९१४च्या आधीची एकमेव आवृत्ती म्हणजे १९११चीच

असणार हे ओघानेच येते. निर्याणाचा अभंग नेमावलीच्या १९१६ सालच्या आवृत्तीत पहिल्यांदा येतो.

२. रात्रीच्या भजनात बारा अभंगांनंतरच्या ओळींत 'रामाश्रम सद्‌गुरुराज गुरुलिंग-जंगम महाराज' असा फक्त निंबरगी महाराजांचा जयजयकार आहे. तेथेच तो थांबतो. भाऊसाहेब महाराजांचा जयजयकार नाही. अर्थातच ही नेमावली १९१४च्या आधीची म्हणजे १९११ची आहे हे उघड आहे. भाऊसाहेब महाराजांचा जयजयकार १९१६च्या आवृत्तीत पहिल्यांदा दिसून येतो.

३. या नित्यनेमावलीच्या प्रस्तावनेत पृ. १४ वर इंचगेरीस चैत्र, श्रावण व मार्गशीर्ष असे तीन उत्सव होतात असे म्हटले आहे. भाऊसाहेब महाराजांच्या पुण्यतिथीचा उल्लेख नाही. म्हणजे या आवृत्तीच्या वेळेस महाराज हयात होते. सर्वाधिक निर्णायक पुरावा म्हणजे प्रस्तावनेच्या १३-१४ या पृष्ठांवर महाराजासंबंधी 'त्यांचे वय हल्ली ६८ वर्षांचे आहे' हे वाक्य. यावरूनही ही १९११ सालची आवृत्ती आहे हे सिद्ध होते. महाराजांच्या पुण्यतिथीचा निर्देश पहिल्याप्रथम आला तो १९१६च्या आवृत्तीत. १९११ सालची पहिली आवृत्ती विष्णू रामचंद्र फडके, सोलापूर यांनी काढली.

नित्यनेमावलीची वर वर्णन केलेली जुनी प्रत आता निंबाळ आश्रमात, श्री गुरुदेव रानडे समाधी ट्रस्ट यांनी सुरू केलेल्या वस्तुसंग्रहालयात ठेवली आहे.

(इ) दुसरी आवृत्ती, १९१६ : निंबरगी येथे गवसलेले आणखी एक रत्न म्हणजे १९१६ सालची नित्यनेमावली. हिच्या सनाबद्दल संशय घेणे किंवा पुरावा देणे दोन्ही अनावश्यक आहेत. कारण हिचे मुखपृष्ठ शाबूत असून तिच्यावर १९१६ हा सन व आवृत्ती दुसरी हे शब्द स्पष्ट छापलेले आहेत. आतल्या पानावर 'सुधारून वाढवलेली आवृत्ती दुसरी' असे छापलेले आहे. हिचाही आकार १३.५ × १०.५ सें.मी. असा आहे. या आवृत्तीतसुद्धा गुरुदेवांची प्रस्तावना पुरती छापली आहे. ही नित्यनेमावली काकडारतीपासून सुरू होते. याही आवृत्तीत १९११ प्रमाणे 'गुरु हा संतकुळीचा राजा' हा अभंग आलेला नाही. काकडारतीनंतर 'पहिलें पाहतां श्रीमुख' या अभंगाने सुरू होणारे सकाळचे भजन आहे. पण हे भजन 'कृपाळू सज्जन तुम्ही संतजन' हा अभंग झाल्याबरोबर संपते. इथे 'दुपारचीं पदें' असा एक विभाग आढळतो. जेवण झाल्यावर महाराज लहान मुलांकडून पदे म्हणून घेत असत, ती ही पदे असावी. ही १० आहेत. नंतर 'धन्य हो प्रदक्षिणा'पासून 'देह तो पंढरी' अखेर दुपारचे भजन मिळते. मग येते ते रात्रीचे भजन. पाठोपाठ आरत्या, शेजारती, अष्टके, धांवा, पाळणे, भारुडे व

पंचसमासी दिसतात. श्री माधवानंद सरस्वतीकृत एक अष्टक लागलीच समाविष्ट केले आहे. अखेरीस काही शिष्यमंडळींची पदे आहेत. त्यात गुरुवे इरलारे, सै सै सै कुंतिदिने, धन्य सुदिन आजि आम्ही, ही तीन पदे पूर्ण असून 'पूर्ण प्रतापा भक्तवत्सला' हे पद अर्धेच आहे. पुढचा भाग फाटून गेला आहे.

१९१६ सालच्या या नेमावलीत 'संपलेसे वाटे अवतारकार्य' हा महाराजांच्या निर्याणाचा अभंग दृष्टीस पडतो. महाराज १९१४ साली गेले. नंतर निघालेल्या आवृत्तीत हा अभंग येणे तर्काला धरून आहे. दुसरी गोष्ट म्हणजे बारा अभंगांनंतरच्या ओळींत निंबरगी महाराजांच्या जयजयकारापाठोपाठ महाराजांचा जयजयकार आला आहे. त्यांना इथे 'रामाश्रम सद्‌गुरुराज उमदी भाऊसाहेब महाराज' असे संबोधले आहे. तिसरे म्हणजे १९१६ सालच्या आवृत्तीत प्रस्तावनेच्या पृ. १३ वर, महाराजांबद्दल लिहिताना 'त्यांनी शके १८३५, माघ शु. ३ रोजी देह ठेविला' हे वाक्य आले आहे. पहिल्या आवृत्तीत इंचगेरीस तीन उत्सव होतात अशी माहिती आहे, तर इथे चार उत्सव होतात असा स्पष्ट उल्लेख आहे. चवथा उत्सव महाराजांच्या पुण्यतिथीचा आहे असे सांगितले आहे.

१९१६ सालची ही दुसरी आवृत्ती पहिल्या आवृत्तीप्रमाणेच सोलापूर येथील विष्णू रामचंद्र फडके यांनी काढली. निंबरगीस मिळालेली ही जुनी नित्यनेमावली निंबाळ आश्रमात श्री गुरुदेव रानडे समाधी ट्रस्ट यांनी सुरू केलेल्या वस्तुसंग्रहालयात आता ठेवली आहे.

(ई) पाचवी आवृत्ती, १९४५ : नित्यनेमावलीची तिसरी आवृत्ती शिवलिंगप्पा चिक्कोण यांनी १९२४ साली जमखंडीस प्रसिद्ध केली. ही आवृत्ती दुर्दैवाने बघायला मिळाली नाही. १९३० साली नीलकंठराव तुळपुळे यांनी पुण्यास चौथी आवृत्ती काढली. तिची माहिती प्रस्तुत पुस्तकात पृ. ६४ वर येऊन गेली आहे. त्यानंतर १५ वर्षांनी गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली १९४५ मध्ये पाचवी आवृत्ती बाहेर आली. तीमध्ये १९११ सालच्या पहिल्या आवृत्तीमधील प्रस्तावना पूर्ण छापली आहे. इथे रात्रीच्या भजनात निंबरगी महाराज व भाऊसाहेब महाराज यांच्या जयजयकारानंतर 'इंचगेरीवासी सद्‌गुरुराज जिगजेवणी अंबुराव महाराज' असा बाबांचा जयजयकार आहे. शिवाय मनोहरपंत देशपांडे यांनी रचलेला बाबांच्या चरित्रावरील सहावा समासही अंतर्भूत आहे. हे तर्कसंगत आहे, कारण बाबांचे निर्याण १९३३ मध्ये झाले.

या आवृत्तीचे वैशिष्ट्य म्हणजे हिच्या अखेरीस अनुभवपदशतक या नावाने

संप्रदायात चालत आलेली हिंदी, मराठी, कन्नड पदे, संस्कृत श्लोक वगैरे समाविष्ट केले आहेत. यांची संख्या ११० आहे. पहिल्यापासून संप्रदायात चालत आलेली अशी पदे गुरुदेव एकत्र करत होते. तसा उल्लेख १९११सालच्या नित्यनेमावलीच्या प्रस्तावनेत आहे. सहज जाता जाता सांगता येईल की १९४८ साली प्रसिद्ध झालेल्या 'बोधसुधे'त अनुभवपदशतक भाग २ अशा नावाने आणखी ११० पदे घातली आहेत. अंबुराव महाराजांच्या आठवणी हा ग. वि. तुळपुळे यांनी आठवणींचा केलेला संग्रह १९५० मध्ये बाहेर आला, त्यात अनुभवपदशतक भाग ३ या शीर्षकाखाली आणखी ११० पदे प्रसिद्ध झाली. अखेर १९५२च्या नित्यनेमावलीच्या ६व्या आवृत्तीत अनुभवपदशतक भाग ४ असे म्हणून पुन्हा ११० पदे छापली आहेत. म्हणजे एकूण ४४० पदे प्रसिद्ध झाली. संप्रदायातील अजमासे ५०० पदे लोकांपुढे आणावी असा गुरुदेवांचा मानस होता. ते काम राहून गेले होते. त्यांच्या निर्याणानंतर १९६३ मध्ये 'परमार्थमंदिर' या नावाचा उण्यापुऱ्या ५४० पदांचा एक संग्रह प्रसिद्ध झाला. त्यात पहिली ४४० पदे अंतर्भूत आहेत.

१९४५ सालची नित्यनेमावली कृ. दा. संगोराम यांनी प्रकाशित केली.

(उ) आठवी आवृत्ती, १९६० : १९५२ मध्ये नित्यनेमावलीची सहावी व १९५५ मध्ये सातवी आवृत्ती बाहेर आली. या दोन्हींचे प्रकाशक कृ. दा. संगोराम हे आहेत. १९६० साली आठवी आवृत्ती छापली गेली. १९५७ मध्ये गुरुदेवांचे निर्याण झाले. त्यानंतर निघालेली ही पहिलीच आवृत्ती. साहजिकपणेच या आवृत्तीमध्ये रात्रीच्या भजनात 'निंबाळवासी सद्‌गुरुराज गुरुदेव रामभाऊ महाराज' असा जयजयकार आला. तसेच मनोहरपंत देशपांडे यांनी रचलेला गुरुदेवांच्या चरित्रावरील सातवा समास आला. या आवृत्तीत प्रथमच अंबुराव महाराज व गुरुदेव यांच्या आरत्या घालण्यात आल्या. या आवृत्तीचा आणखी एक विशेष म्हणजे चिम्मड मठातील भजनामधली पाच पदे (पंचपदी) इथे पहिल्यांदा समाविष्ट करण्यात आली. हीही आवृत्ती कृ. दा. संगोराम यांनी काढली.

(ऊ) अकरावी आवृत्ती, १९८८ : नित्यनेमावलीच्या आवृत्त्या पाठोपाठ निघत होत्या. प्रत्येक वेळी काहीतरी बदल होणे क्रमप्राप्त होते. म्हणून गुरुदेवांनी प्रत्यक्ष मार्गदर्शन केलेली १९४५ सालची आवृत्ती प्रमाणभूत धरून १९८८ साली श्री गुरुदेव रानडे समाधी ट्रस्ट, निंबाळ, यांनी नवीन आवृत्ती काढली. १९४५ सालच्या आवृत्तीत जो भाग नव्हता, पण जो आता म्हणण्याची रूढी पडली होती तो भाग या नव्या

आवृत्तीत घेतला आहे. मात्र ही नवी आलेली संहिता परिशिष्टात दिली आहे. तरीही सर्व नवीन म्हटले जाणारे अभंग, श्लोक, पदे वगैरे परिशिष्टात घालून भागण्यासारखे नव्हते. नव्याने आलेल्या काही ओळी भजनांच्या मध्येमध्ये येणाऱ्या होत्या. केवळ 'नवीन' या सदरात बसतात म्हणून त्या तिथून उचलून परिशिष्टात टाकणे बरोबर नव्हते. कारण त्यामुळे भजन म्हणताना खंड पडला असता. यास्तव हा सर्व भाग भजनात मध्ये जिथे येतो तिथेच छापला आहे व तो नवीन आहे हे दर्शवण्यासाठी त्यावर खूण करून तळटीपा दिल्या आहेत.

५. निंबरगी संप्रदायाचा चित्रमय इतिहास

१९५१च्या आसपास गुरुदेवांना महाराजांच्या एका फोटोचे स्वप्नात दर्शन झाले. त्यावरून संप्रदायाचा चित्रमय इतिहास लिहिण्याची कल्पना निघाली. १९५२ जूनमध्ये विजापूरचे फोटोग्राफर नारायणराव कुलकर्णी यांनी गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली कामाला सुरुवात केली. पूर्वीचे फोटो जिथे जिथे व ज्यांच्या ज्यांच्याकडे होते ते जमवले. सिद्धगिरी, निंबरगी, चिम्मड, उमदी, इंचगेरी, जमखंडी वगैरे गावी जाऊन संप्रदायाच्या दृष्टीने महत्त्व असलेल्या जागा, वास्तू व मिळतील त्या भिन्न भिन्न वस्तू यांचे फोटो काढले. या कामी नारायणराव कुलकर्णी व बाबासाहेब संगोराम यांनी अपार कष्ट केले. या सर्व चित्रांचा गठ्ठा ३ जुलै १९५६ रोजी गुरुदेवांच्या अमृतमहोत्सवाच्या दिवशी, जमखंडी येथे त्यांना अर्पण करण्यात आला. त्यानंतर बरीच वर्षे ही संकलित चित्रे तशीच होती. पुढे १९६८ साली ती पुस्तकरूपाने बाबासाहेब संगोराम यांनी प्रसिद्ध केली. या चित्रसंग्रहाने निंबरगी संप्रदायाच्या इतिहासाची काहीशी कल्पना येते. महाराजांच्या ज्या फोटोच्या दर्शनाने चित्रमय इतिहासाची मूळ कल्पना निघाली तो फोटो त्या पुस्तकात पृ. ४४ वर पाहायला सापडतो. (प्रस्तुत पुस्तकात पृ. ८६ वर हा फोटो आहे.) या इतिहासातील विशेष नावाजण्याजोगी वैशिष्ट्ये म्हणजे इथे उजव्या बाजूला फोटो दिलेले असून डाव्या बाजूला इंग्लिश, मराठी व कन्नड तिन्ही भाषांत फोटोंचे विवरण दिले आहे. एकाच फोटोवरून तीन भाषकांची सोय होते. विवरणाचे पृष्ठ व फोटोचे पृष्ठ याला एकच क्रमांक दिला आहे. त्यामुळे माहिती व फोटो यांची गल्लत होण्याचा काडीइतकाही संभव नाही. आता हे पुस्तक दुर्मिळ झाले आहे.

६. 'खनाळामध्यें जाऊन राहे। तेथें कोणीच न पाहे'।।

गुहेच्या कल्पनेला आपल्याकडे प्राचीन परंपरा आहे. कठोपनिषदात (१.३.१)

चित्रमय इतिहासातील भाऊसाहेब महाराजांचा फोटो

जीवात्मा व परमात्मा हे दोघे हृदयाकाशातील बुद्धिरूपी गुहेत शिरले असे म्हटले आहे. या मंत्रावरील भाष्यात शंकराचार्य म्हणतात की शरीराने व्यापलेल्या बाहेरच्या स्थलापेक्षा हृदयाकाश श्रेष्ठ आहे. तेव्हा त्यातली गुहा (बुद्धी) परमात्म्याचे उत्कृष्ट असे वसतिस्थान मानले जाते. गुहां प्रविष्टौ (वेदान्तसूत्र, १.२.११) या सूत्रावरील शांकरभाष्यातही हृदयाकाशातील गुहेत म्हणजे बुद्धीच्या पवित्र स्थानी परमात्म्याचे वास्तव्य आहे हेच पुन्हा गिरवले आहे. तर अशा या गुहेत बसून तपश्चर्या करणे परमकल्याणकारक असणार यात संशय नाही. ठिकठिकाणी थोर महात्म्यांनी तप केलेल्या गुहा, घळी, डोंगरकपारी आढळतात. जिथे दिवसासुद्धा पाऊल टाकायला भ्यावे अशा शांत, जनपदाचा संपर्क नसलेल्या गिरिगुहरात ईश्वरचिंतनात मग्न झालल्या अगणित ऋषींची नावे इतिहासाच्या पानोपानी सापडतात. श्रीशैलाच्या गुहेत शंकराचार्यांनी तप केले. समर्थांची शिवथर घळ सर्वांना परिचित आहे. प्रभुदेव किंवा अल्लमप्रभू या नावाने प्रसिद्ध असलेल्या कन्नड संतपुरुषाचे गुरू अनिमिषदेव अमृतलिंग हातात घेऊन, त्यावर दृष्टी ठेवून, भूगर्भातील निवांत जागी बसून आत्मानंदात मग्न झाले होते, असे वर्णन 'शून्यसंपादने' या ग्रंथात मिळते. 90३350

निंबरगी महाराजांचे गुरू मुण्पिन मुनी यांचे साधन सिद्धगिरी या ठिकाणी गुहेमध्येच चालू असे. निंबरगी महाराजांना तिथेच अनुग्रह मिळाला. कोल्हापूरजवळचे सिद्धगिरी हे स्थान म्हणजे निंबरगी संप्रदायाची गंगोत्री आहे. हल्ली या ठिकाणाला कणेरी मठ असे म्हणतात. टेकडीवरील काडसिद्धेश्वराचे पुरातन देवालय वनराजीने सुशोभित आहे. महाद्वाराच्या डाव्या अंगाला प्राकाराबाहेर एक भुयार दिसते. दहाएक पायऱ्या उतरून आत जाता येते. वाट अरुंद म्हणजे जेमतेम दोन फूट आहे. आत जाताक्षणी तीन फूट लांब व तीन फूट रुंद असा जमिनीपासून थोडा वर उचललेला चौथरा डोळ्यांसमोर येतो. हे सद्‌गुरूंना बसण्याचे उच्चासन असावे. साधारण सहा फूट लांब, सहा फूट रुंद व सात फूट उंचीच्या या ऐसपैस घुमटीत पाच-सात लोक सहज ध्यानाला बसू शकतात. देवळांच्या छतासारखे नक्षीदार छत नजर वेधते. आज ही एकच खोली पाहायला मिळते. पण असे सांगतात की आतल्या अंगाला आणखी दोन खोल्या होत्या. त्या आता बुजवल्या आहेत. गुहेत अंधार राज्य करतो. वरून एखादा कवडसा आत आला की हा अंधार 'दिसतो'. वेढून टाकणाऱ्या काळोखाने मन कातर होते. गुहेतल्या गूढरम्य वातावरणाने माणूस भारावून जातो. अन्तर्मनाने देवाकडे झेप घेतली नाही तरच आश्चर्य !

भुयाराशी निगडित असणारी दुसरी जागा म्हणजे निंबरगी. इथे निंबरगी महाराजांची समाधी आहे. समाधीसमोरील कट्टा करताना त्याच्याखाली तळघर बांधण्याची योजना होती, पण ती नंतर रद्द केली गेली, ही हकीकत मागे आली आहे (पृ. २१ पहा).

तिसरा संदर्भ गुरुदेवांच्या 'Pathway to God in Hindi Literature' या ग्रंथात पृ. ४१४ पासून पुढे आहे. इथे सुरुवातीस 'अलख पुरुष निर्वाण है' व 'घरका भया तो क्या भया' या दोह्यांची चर्चा सुरू होते. अलख पुरुषाचे म्हणजे देवाचे दर्शन होण्यास साधकाच्या ठिकाणी काही गुणांची आवश्यकता असते. साधकाला सद्‌गुरूंचा सहवास लाभायला हवा, त्यांच्याबद्दल त्याच्या मनात भक्ती हवी. साधक सतत जागृत असला पाहिजे. सद्‌गुरूंच्या ध्यानात कसलाही अडथळा येऊ नये अशी त्याने दक्षता घेणे जरूर आहे. नम्रता हा आणखी एक गुण आवश्यक आहे. तसेच आपल्या ध्यानधारणेचा बोभाटा न करता त्याने गुप्ततेने साधन करावे. सद्‌गुरूंची आज्ञा पाळण्यात त्याने तत्परता दाखवावी. पण एवढे गुण असून भागत नाही. शिष्याच्या ठिकाणी पूर्ण शरणागतीची भावना हवी. सद्‌गुरूंची चरणसेवा करायला मिळावी अशी ओढ त्याच्या ठिकाणी असली पाहिजे. 'घर का भया तो क्या भया' या दोह्यातील 'तखत तरे का होय' हे शब्द फार महत्त्वाचे आहेत. शिष्याने तख्ताच्या खाली म्हणजे सद्‌गुरूंच्या चरणापाशी जागा घ्यावी असे दोहा सुचवतो. यापुढचे गुरुदेवांचे विवेचन गुहा या कल्पनेशी बांधलेले आहे. जर संपूर्ण पृथ्वी हीच देवाची पाय ठेवण्याची जागा मानली तर ध्यान करणाऱ्याने जमिनीच्याही खाली बसावे असा यातून अर्थ निघतो. भागवत पुराणात (१०.४०.१३) मध्ये अक्रूर श्रीकृष्णांची स्तुती करताना म्हणतो– अग्निर्मुखं ते अवनिः अंघ्रिः। (अग्नी तुझे मुख असून पृथ्वी हे तुझे चरण आहेत). गुरुदेव हेच सांगतात. भूगर्भात बसून ध्यान करावे या म्हणण्याला तखत तरे का होय हे दोह्यातले शब्द दुजोरा देतात.

या संदर्भात गुरुदेवांनी आपला एक अनुभव सांगितला आहे. अलाहाबादला महाराजांच्या एका पुण्यतिथीच्या दिवशी गुरुदेवांना स्वप्नात महाराज एकटेच तळघरात ध्यानाला बसलेले दिसले. बाहेर त्यांच्या नोकर पुंडप्पा हट्टी राखण करत होता. प्रथम या स्वप्नाचा अर्थ गुरुदेवांना उलगडेना. कर्मधर्मसंयोगाने काही वेळाने अलाहाबादच्या लष्कर विभागातून दोन अनोळखी गृहस्थ त्यांना भेटायला आले. त्यांनी गुरुदेवांना घर का भया तो क्या भया हा दोहा आणून दिला. त्यांच्याबरोबर या दोह्याच्या अर्थाबद्दल चर्चाही झाली आणि गुरुदेवांना एकदम जाणवले की दोह्यात जे सांगितले आहे त्याचेच

प्रात्यक्षिक आपण स्वप्नात पाहिले. तळघरात ध्यानात रंगून जाण्याचाच विषय दोह्यात आहे, आणि त्याच अवस्थेत महाराज बसले आहेत असे आपल्याला दर्शन झाले.

आता चौथा संदर्भ : या घटनेनंतर जणू काही महाराजांचा संदेश अमलात आणण्यासाठीच की काय, निंबाळला गुरुदेवांनी एक गुहेसारखी जागा करून घेतली होती. हे ऐकल्याबरोबर आपल्या डोळ्यांसमोर अनेक प्रश्न नाचतात- गुहा कशी होती? केवढी होती? कुठे होती? ही गुहा आश्रमाच्या पूर्वेकडे थोड्या अंतरावर आज जे वडाचे झाड दिसते तिथे होती. तिथे मोकळ्याढाकळ्या जागेत एक खड्डा केला होता. त्याला गुहा किंवा भुयार म्हणणे कठीण आहे. जागा जमिनीच्या पातळीच्या खाली होती, हेच तिचे वैशिष्ट्य. ती एक साधन-गुंफा होती. तिथे गुरुदेवांचे ध्यान चाले. बाहेरच्या बाजूस १५-२० फुटांवर गुंडू, अल्ली, विठोबा किंवा रूपला यांच्यापैकी कोणी एक नोकर बसलेला असे. प्रत्यक्ष ही जागा पाहिलेले अगदी थोडेजण आज हयात आहेत. विठोबा व रूपला हे त्यांपैकी आहेत. दोघेही निंबाळलाच राहतात. विठोबाकडून या ध्यानाच्या जागेची हकीकत समजली. तिच्या तोंडाचा भाग गोलाकार असून अदमासे ५ फूट व्यासाचा होता. खोदकाम जसजसे खाली खाली गेले तसा हा खड्डा निमुळता होत गेला. तळाशी साधारण अडीच-तीन फूट व्यासाची सपाट जागा होती. मांडी घालून एक माणूस सहज बसेल एवढी. एका काळ्या सपाट दगडावर बसून गुरुदेव ध्यान करीत. जागेची जमिनीखालची खोली अंदाजे ५।।-६ फूट होती. बाजूने जाणाऱ्याला आत बसलेले माणूस दिसत नसे. खाली उतरायला उत्तराभिमुख ४-५ पायऱ्या होत्या. वरचा भाग उघडाच होता. सकाळी उन्हाच्या आधी गुरुदेव तिथे बसत. थोड्या उन्हातही कधीकधी जात. ही गुहा बुजवून तिथे नंतर वडाचे झाड लावले गेले.

माहिती ऐकल्यावर विठोबा राठोडला प्रश्न केला, " विठोबा, असं ऐकलं आहे की एकदा तिथं साप निघाला होता. तुम्ही पाहिला होता का?"

"मी पाहिला नाही. पण एकदा गुंडू खाली उतरला होता तेव्हा दगडाच्या खाली त्याला सापाचे तोंड दिसले. 'तिथे साप आहे' असे गुंडू गुरुदेवांना म्हणालाही. 'छट्, इथे कुठे साप येतो' असे म्हणून गुरुदेव तिथे ध्यानाला बसले."

विठोबाने गुहा प्रत्यक्ष बघत असल्याप्रमाणे तपशीलवार वर्णन केले. गुरुदेव ध्यान करत असताना त्याने वेळोवेळी राखणदाराचे काम केले होते. त्याची स्मृतीही उत्तम आहे. तेव्हा ही माहिती वस्तुस्थितीला धरून आहे असे समजण्यास प्रत्यवाय नाही. तरीही आता या गोष्टीला ५० वर्षांचा काळ लोटत आला. विठोबाचे वयही ऐंशीच्या

घरात आहे. मोजमापाच्या तपशिलात रेसभर फरक होऊ शकतो एवढेच. विठोबा हा निंबाळ आश्रमातील जुन्या मंडळींपैकी आहे. तो, त्याची बायको, मुले, नातवंडे, पतवंडे निंबाळलाच नांदतात.

७. जाता जाता

(अ) देवाची कृपा : एकदा सिटिंग चालू असताना कृपा म्हणजे काय हा विषय निघाला. त्यावेळेस पुढील चर्चा झाली. ब्रह्मसूत्रकार म्हणतात– अधिकोपदेशात्तु (३. ४.८). God = Morality + Grace. This plus (अधिक) is Grace (ईश्वर = नीती + कृपा). व्यक्तीमध्ये नीतीचा कितीही उत्कर्ष झाला तरी परमेश्वरप्राप्तीला तो अपुरा पडतो. तिथे काहीतरी 'अधिक' लागते. हीच कृपा. नीतीची बैठक हवीच हवी पण तितक्यानं भागत नाही. कृपेशिवाय देव दिसत नाही. साक्षात्कारासाठी प्रयत्न व कृपा दोन्हींची आवश्यकता आहे. आपण प्रयत्न करत रहायचे. कृपेपोटी कुणाला, कुणाकरवी, कुठून, काय, किती, कुठे, कसे किंवा केव्हा द्यायचे ते मात्र तो सूत्रधार ठरवणार.

(आ) फक्त शंभर वर्षे : एकदा दोन वयोवृद्ध साधक निंबाळला भेटले असताना वृद्धापकाळाबद्दल बोलणे निघाले. गुरुदेव तिथेच होते. वयानुसार शरीराच्या कुरकुरी अपरिहार्यच असतात. दोघांपैकी एकजण सहज बोलून गेले, "पासष्टी आली. वय जाणवू लागले आहे." दुसरे त्यावर चटकन म्हणाले, "पासष्टच ना, मी सत्तरी गाठली आहे. माझे काय होत असेल?" हे बोलणे दुरून ऐकत असलेले नरसप्पा शापेटी तिरीमिरीसरसे उठले आणि त्यांच्याजवळ जाऊन आपल्या अरे-तुरेच्या शैलीत म्हणाले, "कायरे, काय म्हणतो आहे तो? पासष्ट-सत्तर हे काय म्हातारपण झाले? मी शंभरी ओलांडली आहे. आता बोला !" त्यांचे उद्‌गार सगळ्यांना गप्प करणारे होते. नरसप्पा १०५ वर्षांचे होऊन स्वर्गवासी झाले हे सर्वज्ञात आहे. हे निंबरगी महाराजांचे शिष्य होते. मृत्यू आषाढ शु. ८, शके १८५७, मंगळवार ता. ९-७-१९३५. यांची जास्त माहिती बोधसुधेच्या प्रस्तावनेत आहे. तसेच 'चिंतनिका' या पुस्तकात पृ. ३० वर आहे.

नरसप्पा शापेटी

(इ) भक्त तितुका मेळवावा : प्रपंचाची बेडी सगळ्यांच्याच पायात असते. हरएक सप्ताहासाठी निंबाळता जाणे फार थोड्याजणांना साधते. ज्या गावी साधक रहातात त्या गावीच ते सामुदायिक सप्ताह, नामस्मरण, भजन वगैरे कार्यक्रम करतात. यात बऱ्याच लोकांना भाग घेता येतो. अलीकडे पुष्कळ गावी अशी नामस्मरण-केंद्रे झाली आहेत. ही अतिशय समाधानाची बाब आहे. ठरलेल्या साधकांच्या घरी विशिष्ट सप्ताह पार पडतात. स्थानिक लोक त्यात भाग घेतातच. बाहेरगावची काही मंडळीही सवडीनुसार येतात. एकत्र जमून नामस्मरणाचे कार्यक्रम करण्यात सोलापूर पहिल्यापासून अग्रेसर आहे.

निंबरगी महाराजांचा जन्म सोलापूरचा आहे ही जाणीव सोलापूरकरांच्या अन्तर्मनाला सुखवत असते. भाऊसाहेब महाराज भक्तिप्रसारासाठी गावोगावी जात व सप्ताह करीत. तसे ते सोलापूरलाही येत. १९०९, १९१०, १९११, १९१२, १९१३ या पाच वर्षी ओळीने महाराज सोलापूरला आले होते. बयाबाई सोहनींकडे त्यांचा मुक्काम असे. तिथलाच पत्ता ते पत्रव्यवहारासाठी देत. महाराज स्वत: जिथे हजर असत तिथे भक्तीचा सोहळा होई हे साहजिकच आहे. कोणत्याही गावाला आनंदात साजऱ्या झालेल्या सप्ताहांचा महाराजांच्या पत्रात आवर्जून उल्लेख असे. सोलापूरबद्दल ४-५-१९१३ रोजी लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणतात, “भक्तीथाट आनंद चालले आहे. ते लिहिता येत नाही. असो. ज्याचे त्यांनी करून घेत आहे. त्यात आपला म्हणून काही नाही.” रघुनाथप्रिय साधुबुवांच्या पुण्यतिथीचा सप्ताह चैत्र शु. ३ ला असून तो दरवर्षी उमदीस होत असे. पण १९१२ साली सोलापूरकरांनी आग्रह करून महाराजांना या सप्ताहासाठी सोलापूरला ठेवून घेतले होते. गुरुदेवांनीही आपण १९१०, १९११, १९१२ व १९१३ साली महाराजांबरोबर सोलापूरला होतो व तिथली भक्ती प्रत्यक्ष पाहिली आहे असे शिफारसपत्र दिले आहे. ३-४-१९५१ रोजी सोलापूर येथील दिवाणबहादूर एन. सी. लिमये यांना लिहिलेल्या पत्रात गुरुदेवांनी सोलापूरकरांच्या भक्तीचा गौरव केला आहे. सोलापूरच्या सत्संग-सप्ताहांना अशी जुनी परंपरा आहे. साधक एकत्र जमून नामस्मरण करणे हा नित्याचा कार्यक्रम असे. गुरुदेवांच्या निर्याणानंतरही असाच ध्यान व भजन यांचा रिवाज चालू होता. भांडी गल्लीतील विठ्ठल मंदिरात भजन होई. कधी कधी रात्री धाटीचे भजन होई. बारा अभंगांना महाराजांचे चिरंजीव रामराव यांनी धाटी बसवून दिल्या होत्या. अभंगांची चाल वरचेवर बदले व भजन खूप वेळ रंगत असे. याशिवाय सोलापूर-भजन म्हणून नाव असलेल्या भजनाचा प्रकारही होई. यात उलट सुलट फिरून भजन म्हटले जाई.



बयाबाई सोहनींचा वाडा



बयाबाईंच्या वाड्यातील महाराज राहात ती खोली

पंढरीनाथ दत्तात्रेय भुजंग, दिगंबर पंढरीनाथ भुजंग, दत्तोपंत फडके, गुंडोपंत जोशी, कुंभारीचे रंगनाथराव कुलकर्णी, बाबूराव भुमकर, दत्तोबा टिकले, काटवे, मोहरे, कोन्हाळेकर वगैरे जुनी मंडळी म्हणजे या उमदीश भजनमंडळाचे सभासद. तिथे अंबुराव महाराजांची पुण्यतिथी मोठ्या थाटाने साजरी होई. बाबांचे शिष्य गणपतसा वाळवेकर हे सप्ताहासाठी सामान देत. पोथीच्या चौरंगाच्या वर फुलांचा मोहपा टांगलेला असे. त्याला फुलांच्या झुरमुळ्या सोडलेल्या असत व खाली एकेक फुलांचा गोंडा लावलेला असे. शेवटच्या दिवशी पोथी वाचणाऱ्याच्या गळ्यात हार घालत असत. एकूणच फार शोभा करून वातावरणात उत्साह निर्माण करीत. वेळात वेळ काढून गोपाळराव औरंगाबादकर, डॉ. एन. एस. पारिपत्यदार किंवा डॉ. जगन्नाथराव चिडगुपकर न चुकता समाप्तीच्या कार्यक्रमास उपस्थित रहात. सगळ्यांचा उत्साह ओसंडून जाई.

मोहपा

१९५१ मध्ये दिवाणबहादूर लिमये यांनी साधकांना ध्यानाला बसण्याची सोय असावी म्हणून आपल्या घराच्या आवारात एक स्वतंत्र खोली बांधली. हे ध्यानमंदिर संतसमागमाचे केंद्र आहे. आजही तिथे रोज साधक येऊन ध्यान व भजन करतात. सोलापूर येथे इतर १-२ ठिकाणीही मंडळी जमून नामस्मरण करतात. सोलापूरकरांचा हा उल्हास आपल्या गावापुरता मर्यादित नाही. बाहेरगावी कुठे सप्ताह ठरला असेल तर सोलापूरच्या साधकांचा जथा तिथे जातो, सप्ताहाची सूत्रे हातात घेऊन सप्ताह शिस्तीने व आनंदाने पार पाडतो व तिथल्या मंडळींची वाहवा मिळवून आपल्या मठीत परत येतो.

(ई) वेदान्तावरील ग्रंथ : १९ जुलै १९४४ रोजी निंबाळला सिटिंगच्या वेळी आपल्या वेदान्तावरील संकल्पित ग्रंथाबद्दल काय योजना होती त्याबद्दल गुरुदेव म्हणाले, "वेदान्तावरचा ग्रंथ तयार आहे. मी सांगेन, कुणीतरी लिहिणारा पाहिजे. त्यावर मी अनेक वर्षे अभ्यास केला आहे व अगदी नवीन दृष्टिकोन घेणार आहे. दुसऱ्याची एक ओळही त्यात नाही व नसावी. थोडे भरले तरी चालेल, पण स्वतंत्र पाहिजे.

उमदीश भजनी मंडळ, सोलापूर, १९३६

नाहीतर मग Research (संशोधन) तो काय? ही दृष्टी दुसऱ्या कुणाला येणे शक्य नाही. कारण आम्हाला परमार्थाची जोड आहे, देवाचे पाठबळ आहे, गुरुकृपा आहे, म्हणून ही नवीन दृष्टी आली."

१९२८ साली गुरुदेवांनी श्रीगोपाल बसु मलिक व्याख्याने कलकत्ता युनिव्हर्सिटीतर्फे दिली. ही व्याख्याने वेदान्तावरील होती. या व्याख्यानांची त्या वेळची टिपणे होती. बादरायणाचार्यांच्या ब्रह्मसूत्रांवरील ग्रंथाची मांडणी कशी असावी याचा गुरुदेवांचा विचार सतत चालू होता. प्रकरणे कोणती असावीत, त्यांत जन्यजनक-व्यवस्था कशी साधावी, विभाग-उपविभागांत कोणते मुद्दे असावेत याची चर्चा होई. यावरून सामान्य रूपरेषा गुरुदेवांनी आखली होती. पण कार्यबाहुल्याने पुस्तक प्रत्यक्ष लिहिण्याचे काम हातात घेतले गेले नाही. त्यांच्या निर्याणानंतर त्यांच्या दोन विद्यार्थ्यांनी हा ग्रंथ जुन्या टिपणांच्या साहाय्याने लिहिला. अर्थातच गुरुदेवांची या ग्रंथाबद्दलची जी नवीन दृष्टी होती ती विद्यार्थ्यांना येणे शक्य नव्हते. गुरुदेवांनी स्वतः ग्रंथ लिहिला असता तर तो वेगळा झाला असता.

(उ) "सहज बोलणे" : सिटिंगच्या वेळी काही साधकांनी टिपून ठेवलेले गुरुदेवांचे उद्‍गार–

१. 'आनंदवनभुवन' हे रामदासांचे एक Prophetic Vision (रामराज्याची कल्पना) होते.

२. मंत्रपिंड म्हणजे नामरूपी मंत्राच्या सतत पुनरुच्चाराने तयार झालेला अनुभव-रूपी पिंड किंवा Spiritual Body.

३. महानुभाव वाङ्मयातील परमार्थास उपयोगी वेचे काढून interpretation सहित छापावेत. भक्ती, नीती इत्यादी विषयांची मानभावी संतांची वचने देऊन साम्ये दाखवावीत.

४. मृत्यू ही परमार्थाची एक प्रभावी प्रेरणा आहे, याबद्दल एकदा बोलणे निघाले होते तेव्हा गुरुदेव म्हणाले, "अलीकडे पुष्कळ डॉक्टर्स परमार्थाकडे वळत आहेत, कारण त्यांना रोज मृत्यू दिसत असतात. मी १९१०च्या सुमारास फर्ग्युसन कॉलेजमध्ये होतो तेव्हा लकडी पुलापलीकडे रस्त्याच्या बाजूला बसून नामस्मरण करीत असे. बाजूला स्मशानात प्रेते दिसत. तेव्हा तुकारामांचा 'एक पाहतसा एकांची दहने' हा अभंग आठवे. रामदासांनीही 'मरणाचे स्मरण असावे' असे म्हटलेच आहे."

५. बिंदुतीर्थाबद्दल महाराज काय म्हणत ते गुरुदेवांनी सांगितले. "बिंदू म्हणजे रूप व त्या रूपावर डोळ्यांतून ओघळणारे अश्रू म्हणजे बिंदुतीर्थ. अशा बिंदुतीर्थात स्नान

करावे. पायाचे तीर्थ घेऊन काय करावयाचे?"

६. नेम चालू असताना मी जे नारायण नारायण म्हणतो ती एक reflex action आहे. अर्थात त्याचा उपयोग नेमाचा जोर वाढवण्यास होतो हे काही खोटे नाही. पण नारायण नारायण म्हणतो त्यात माझा effort किंवा free will नसून केवळ reflex action मुळे हे होते.

(Reflex action म्हणजे विचार न करता शरीराकडून आपोआप घडणारी क्रिया).

७. नामस्मरण करताना जिभेची थोडी हालचाल होऊन अस्पष्ट असे उच्चारण होते, केवळ स्मरण करणे अवघड जाते असे एक साधक म्हणाले. त्यावर गुरुदेवांनी उत्तर दिले की "काहीच हरकत नाही. नामाचा उच्चार, मानसिक म्हणजे mental उच्चार झाल्यावाचून त्याचे स्मरण कसे होणार? मानसिक उच्चाराचे सूक्ष्म शारीरिक परिणाम होऊ शकतात."

८. महाराज कामाच्या माणसास अधिक दिवस रहाण्याचा आग्रह करीत नसत. ते विचारीत, "बाबा, किती दिवसांची पुंजी घेऊन आला आहेस?"

९. महाराज पुढे पुढे एक पक्व फळ झाले होते. त्यांचे वर्णन काय करावे? त्यांचे आम्हांवरील उपकार अमोल आहेत. चोवीस तास ते व देव एकच असत. (हे टिपण करणाऱ्या साधकाने पुढे लिहिले आहे की एवढेच बोलून गुरुदेव एकदम नेमाच्या खोलीत गेले.)

८. गुरुस्थानांचे अखेरचे दर्शन

गुरुदेवांची निंबरगीला शेवटची भेट १३-१-१९५७ रोजी घडली. सकाळी ते निंबाळहून निंबरगीस गेले. पुष्कळशी साधक मंडळी ट्रकमधून गेली. गुरुदेव गाडीने गेले. तिथे आपल्या परमगुरूंचे दर्शन गुरुदेवांनी घेतले. या प्रसंगी निंबरगी महाराजांच्या देवळात साधकांसमवेत घेतलेला गुरुदेवांचा फोटो सर्वपरिचित आहे. त्याच दिवशी रात्री गुरुदेव निंबाळास परतले. त्यानंतर लगेच २४-१-१९५७ रोजी ते इंचगेरीस जाऊन आले. श्री भाऊ निंबरगी यांनी निंबाळहून ता. २८-१-१९५७ला बाबासाहेब संगोराम यांना अथणीला पत्र लिहिले आहे. त्यात इतर मजकुराबरोबर असे एक वाक्य आहे की, "परवां ता. २४ रोजी आम्ही सर्वजण इंचगेरीस जाऊन आलो." निंबरगी महाराज

व भाऊसाहेब महाराज यांचे एकदा डोळेभरून दर्शन घेण्यास गुरुदेव निंबरगी व इंचगेरी या दोन्ही पावन क्षेत्रांना जाऊन आले.

९. न झालेले बोलणे

अखेरच्या दिवसांत गुरुदेवांना संप्रदायातील ज्येष्ठ साधकांशी काही बोलायचे होते असे दिसते. निर्याणापूर्वी बरोबर १५ दिवस म्हणजे गुरुवार २३ मे १९५७ला निंबाळहून श्री. सुरेश गजेंद्रगडकर यांनी बाबासाहेब संगोराम यांना एक पत्र लिहिले आहे. त्यात ते लिहितात, "ती. काकासाहेब तुळपुळे येथे आले आहेत. ते रविवारपर्यंत येथे रहाणार आहेत. तरी तोपर्यंत आपण इकडे यावे. शिवाय थोडेसे महत्त्वाचे कामही आहे." हे महत्त्वाचे काम काय असावे हे कळत नाही. यापुढे रहायचे नाही असा त्यांनी निश्चय केला होता काय? तसे असेल तर काकासाहेब व बाबासाहेब यांच्याशी पुढील व्यवस्थेसंबंधी त्यांना काही बोलायचे होते का? गुरुदेवांचा व्याप मोठा होता. महाराजांच्या पत्रांसारखे संप्रदायातील साहित्य गुरुदेवांच्या दृष्टीने एक अमोलिक ठेवा होता. त्या पत्रांवर विवेचनात्मक टिपणे गुरुदेवांनी लिहावी अशी भक्तमंडळींची इच्छा होती. कारण या कामाला इतर कुणी अधिकारी नव्हतेच. विवेचन राहिले, निदान पत्रे तरी छापावी असे गुरुदेवांच्या मनात होते. ते काम त्यांना साद घालत होते. कन्नड संतांवरील ग्रंथ अर्धा लिहून झाला होता. गीतेवरील महत्त्वाचे पुस्तक प्रकाशनासाठी तयार होते. त्याची पुढची व्यवस्था करणे होते. वेदान्तावरील संकल्पित ग्रंथाची टिपणे तयार होती, ग्रंथाला आकार द्यायचा होता. विविध संस्थांशी भिन्न भिन्न विषयांवरील चालू असलेला पत्रव्यवहार, पांडुरंगराव बापट देखरेख करत होते ती निंबाळमधील लायब्ररीची इमारत, एक ना दोन, अनेक कामे करायची होती. बाबासाहेब आल्यावर या सर्व गोष्टींबद्दल विचार होणार होता का? बाबासाहेब काही अडचणींमुळे येऊ शकले नाहीत आणि गुरुदेवांच्या मनात जे होते ते बोलणे झालेच नाही. ते बोलणे काय होते हे आता कधीच कळणार नाही. काकासाहेब ठरल्याप्रमाणे चार दिवसांनी रविवारी २६ मे रोजी परत गेले. काकासाहेब व बाबासाहेब यांना समोर बसवून गुरुदेवांनी त्यांना काही सांगणे तर झाले नाहीच, पण या दोघांचीही गुरुदेवांशी अखेरची भेटसुद्धा झाली नाही. १५ दिवसांनी ६ जूनला गुरुदेवांचे निर्याण झाले. काकासाहेब व बाबासाहेब त्यांच्या अन्त्यविधीलाच हजर राहू शकले.

१०. स्वानंदज्ञानमंदिर

गुरुदेवांच्या निंबाळ येथील नव्या घराचे श्री. गो. जांभळीकर यांनी केलेले हे वर्णन आहे. १९४२ मध्ये घर बांधल्या बांधल्या जी रचना होती तिचे हे चित्र आहे. ते गुरुदेवांबद्दलच्या भक्तीने ओथंबलेले आहे. जांभळीकरांच्या लिखाणाचा आशय नीटपणे कळावा म्हणून मध्ये मध्ये स्पष्टीकरणवजा एखादे वाक्य कंसात घातले आहे. जांभळीकर लिहितात :

गुरुवर्य प्रोफेसर रानडे यांनी आपल्या निवासस्थानी जे नवीन घर, बंगला, मंदिर, काहीही म्हणा, बांधले त्याच्या बांधणावळीसंबंधाने चर्चा चालली होती. त्यांच्या आवडी-प्रमाणेच राहात्या निवासस्थानाबरहुकूम तो नवीन बंगला बांधला आहे. (राहते निवासस्थान असे जांभळीकर ज्याला म्हणतात ते जुने घर म्हणजे आता जिथे समाधी आहे तिथले घर. नवीन घर बांधले तरी गुरुदेव जुन्या घरातच बरेच दिवस राहत होते). विवक्षित अशी ठेवण त्याच पद्धतीची आहे. अलाहाबाद येथील बंगल्यात (१५ ए हेस्टिंग्ज रोड) जुन्या राहत्या घराच्या (२ बेली रोड) ठेवणीचीच बांधणी आहे. इत्यादी आवडीसंबंधी विचार चालू होते. परंतु निंबाळ येथील नवीन बांधलेल्या इमारतीसंबंधी आध्यात्मिक विचार सहज सुचले आहेत. ते कितपत बरोबर असतील ते समर्थच जाणे.

उत्तराभिमुख असे हे मंदिर, त्याला 'स्वानंदज्ञानमंदिर' असे म्हणता येईल. कारण त्या ठिकाणी जी संतमहंत मंडळी जमतील त्यांनी अध्यात्मज्ञानचर्चा करावी व स्वानुभवानंदाचे लोण एकमेकांना पोचवावे अशी समर्थांची– गुरुवर्य रानडे यांची– इच्छा असणे साहजिकच आहे. त्या दृष्टीने इमारतीचा विचार करताना पाया शुद्ध हवा. इथे शुद्ध म्हणजे तर्कशुद्ध विचारसरणी. त्यानुरूप त्याची बांधणी असावी असा कयास करणे चुकीचे होणार नाही.

पहिल्याने त्याची बांधणावळ अगदी उत्तम तऱ्हेने केली आहे. ती जागासुद्धा अत्यंत पवित्र अशी आहे. राहत्या निवासस्थानाच्या पिछाडीस ते मंदिर बांधण्याचे एक कारण आहे. गुरुदेव केव्हातरी एका सायंकाळी तिथे बसले होते. सहजस्फूर्तीने 'या ठिकाणी पुष्कळ अनुभवी मंडळींची ज्ञानचर्चा व्हावी' असे त्या जागी बसल्या बसल्या ते म्हणाले होते. त्यानंतर त्या जागेची रचना अशी आहे की स्वानुभवी मंडळींना समर्थ स्वतः पुढे उभे होऊन, आपल्याबरोबर सर्वांनी असावे ही सद्भावना उत्पन्न होऊन किंवा एक प्रकारचे पुढारीपण म्हटल्यास हरकत नाही, घेऊन सर्वांनी मिळून ज्ञानामृताचे सेवन करावे या हेतूने रचना केली असावी. राहत्या घराच्या पाठीमागे नव्या घराची रचना

केल्याने संतमंडळी पाठीराखी आहेत ही कल्पना आहे. उलट येणाऱ्या मंडळींच्या दृष्टिकोनातून म्हणता येईल की त्यांना डोळ्यांसमोर राहते निवासस्थान दिसते. त्या मंडळींना आदर्श म्हणजे जुन्या घरात राहणारे गुरुदेव. भाविक मंडळींना देवाचे ध्यान समोरच पाहिजे. म्हणजे जुन्या घरात राहणारे गुरुदेव हे आदर्श पुरुष भक्तांच्या डोळ्यांपुढे राहतात व नव्या घरातली संतभक्तमंडळी गुरुदेवांच्या पिछाडीस पाठीराखी म्हणून शोभतात. नवीन घर जुन्या घराच्या मागच्या बाजूस बांधलेले आहे, हे वर आलेलेच आहे.

रचनेची कल्पना याप्रमाणे झाल्यावर, पुढचा विचार सूर्यप्रकाश. सूर्यप्रकाश सूर्योदया-बरोबर आपल्या समोर येऊ नये. कारण नामनेम करणाऱ्या मंडळींनी पहाटे उठून स्वानंदसूर्यप्रकाश पाहत असताना सहज दिसणाऱ्या भौतिक सूर्यप्रकाशाची कल्पना त्यांच्या नजरेसमोर एकदम येऊ नये. स्वानंदसूर्यप्रकाशाचे सुख व अनुपम आनंद त्यांनी अनुभवीत राहावा. पश्चिम भागचा वायू त्यांना नेहमी उत्तेजित करीत रहावा, त्यासाठी उत्तराभिमुख द्वार असावे.

त्यानंतर मूळ जागेची– स्वानंदज्ञानमंदिराची रचना व बांधणी इतकी उत्तम आहे की कोणत्याही तत्त्वाने पाहिले तरी ती योग्यच ठरावी. आत्मज्ञानी मंडळींसाठीच हे मंदिर आहे असे वाटते. ज्ञान हेच मुख्य सार असल्याने त्या मंदिराला तीन दरवाजे आहेत. त्यापैकी दोन बंद असून ज्ञानाचा एकच मधला मुख्य दरवाजा तेवढा उघडा आहे. त्यानंतर भक्ती व कर्म या दोन दरवाजांनी ज्या ज्या मनोवृत्तीची मंडळी येतील त्याप्रमाणे त्यांना ते उघडे ठेवावे ही योजना आहे. ज्ञानद्वाराच्या पूर्वेकडील दरवाजा भक्तीचा व पश्चिमेकडील कर्माचा आहे. प्रथम ज्ञानमंदिरात चढावयाचे असल्यास तीन पायऱ्या चढत जाव्या लागतात. या त्रिगुणातीत वास्तूच्या आत जाण्यास सत्त्व, रज व तम या पायऱ्या चढून पलीकडे जावे लागते. त्यानंतर ज्ञानाच्या दारात उभे राहिल्याबरोबर आपल्यासमोर दिसणारे कपाट. त्याला कोनाडा म्हणा हवे तर. त्या कपाटात श्री समर्थ भाऊसाहेबांचा फोटो दृश्यमान होतो. या कपाटाची उंची छातीइतकी आहे. म्हणजेच हृदयसंपुष्टात समर्थांचे स्वरूप उभे राहते, मगच ध्यानाची सुरुवात होते. या योजनेने सर्वप्रथम सद्‌गुरूंचे दर्शन घडते.

या मंदिराला बारा खांब आहेत. ते उद्दिष्टहेतूनेच घातले आहेत. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा ही सहा शास्त्रे व सौर, वैष्णव, शाक्त, शैव, वैनायक व स्कांद ही सहा मते हे बारा आधार देणारे ज्ञानमंदिराचे खांब उभे असावेत

अशी कल्पना येते. गंमत अशी की या मंदिराला दहा खिडक्या आहेत. (जांभळीकरांनी मोजलेल्या खिडक्या दहा होत्या, पण आता काही बदल झाले असल्याने या संख्येत तफावत दिसणे साहजिक आहे). या खिडक्यांतून ज्ञानमंदिरात शास्त्रीय ज्ञानाचा वारा खेळता रहावा अशी योजना आहे. (सर्व शास्त्रे उपयोगाची आहेत पण ती आत्मज्ञानाच्या आधीन असावी असे गुरुदेवांचे मत होते. पाखंड मतांचा भन्नाट वारा अगदीच बाधक असतो. त्याला प्रवेशच असता कामा नये. पण शास्त्रीय ज्ञानही ईश्वराच्या शक्तीचा आविष्कार आहे ही जाणीव राहिली पाहिजे. म्हणजे त्यावर अध्यात्माचे नियंत्रण पाहिजे. इथे एका गोष्टीची आठवण होते. निंबाळच्या नव्या घरात वारा कसा नियंत्रित केला आहे हे सांगताना गुरुदेव म्हणाले होते, 'Wind is the mind of Nature and that must be controlled first').

मधल्या मुख्य चौकात डोक्यावर एक झरोका ठेवला आहे. त्याचे कारण असे असावे की ध्यान धरण्याचे दृष्टिस्थान ज्याप्रमाणे डोळे त्याप्रमाणे हा झरोका आहे. त्या नयनाद्वारे समर्थचरणांचे म्हणजे आत्मप्रकाशाचे स्थान ज्याप्रमाणे भ्रूमध्य त्याप्रमाणे ते कवाड असले पाहिजे. साहजिकच ऊर्ध्वदृष्टी लावली असता आकाशाकडे नजर लागून चंद्रतारे वगैरे दिसणारी प्रकाशचिन्हे आत्मदृष्टीला पोषक होतात. अशा या ध्यानमंदिरात संतमंडळींचा नामनेम होऊन त्याचे स्वानंदज्ञानमंदिर हे नाव सार्थकता पावेल.

□□

प्रकरण सहावे

इये मार्गीचिये कापडी

परमार्थपथावरील वाटसरूंच्या पुढे दिलेल्या माहितीत फक्त भाऊसाहेब महाराजांच्या शिष्यांना स्थान दिले आहे. त्यांच्या शिष्यांची संख्या ३६००च्या वर गेली होती. त्या मानाने ही सूची त्रोटकातील त्रोटक आहे, ही टोचणी आहे. या शिष्यवर्गापैकी कित्येकांची नावनिशाणीही शिल्लक नाही. काहींची फक्त नावनिशाणीच आहे. त्यांच्या चरित्रगाथेबद्दल इतिहासाने मौन स्वीकारले आहे. जी नुसती नावेच ऐकली आहेत त्यांची जंत्री देऊन काहीच बोध होण्यासारखा नव्हता, म्हणून ती नावे इथे घेतली नाहीत. ज्यांच्याबद्दल निदान एखादे वाक्य लिहिता आले त्यांचा समावेश प्रस्तुत लिखाणात केला आहे. महाराजांच्या बऱ्याच शिष्यांची माहिती पूर्वी प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांतून आलेली आहे. तिची पुनरावृत्ती केली नाही. आम्हाला मिळालेल्या टिपणांतून तारीखवार हकीकती होत्या. त्या उजेडात आणण्यावर भर दिला आहे. तारखांमुळे काळ निश्चित ठरतो व इतिहास अधिक तंतोतंत होतो. महाराजांच्या डायऱ्यांतून कोणाला, कुठल्या गावाला, कोणत्या तारखेला नाम दिले हे लिहिलेले असते. दुर्दैवाने सर्व डायऱ्या उपलब्ध झाल्या नाहीत. ज्यांच्या पुसटसुद्धा पाऊलखुणा दिसत नाहीत त्या शिष्यांची माहिती मिळवण्याचे अन्य कोणतेच साधन आज हाताशी नसल्याने जेवढे पदरात पडले तेवढ्यावर समाधान मानणे भाग आहे. गावोगावी जाऊन सप्ताह करणे हे महाराजांचे तीर्थभ्रमण होते. अशा वेळी एकेका घरातल्या जुन्या-नव्या पिढ्यांतील अनेक व्यक्ती त्यांच्या भक्तीने प्रभावित होत व अनुग्रह घेत.

निंबरगी महाराजांच्या शिष्यांची माहिती बोधसुधेत आहे. तिची पुनरावृत्ती इथे केली नाही. तसेच अंबुराव महाराज किंवा गुरुदेव यांच्या शिष्यवर्गाचा समावेश इथे नाही. त्या कामाचा व्याप या पुस्तिकेत आटोपण्यासारखा नाही. म्हणून फक्त महाराजांच्या शिष्यांपुरतीच

ही सूची मर्यादित ठेवली आहे. व्यक्ती कोण हे नेमके कळावे यासाठी इथे प्रचलित नावे घेतली आहेत. कुणी नावाने, तर कुणी आडनावाने, तर आणखी कुणी टोपणनावाने परिचित असतो. त्या त्या प्रकारानेच व्यक्तीची ओळख करून दिली आहे. महाराजांच्या शिष्यांचे फोटो जमवण्याच्या प्रयत्नांना साधक बंधु-भगिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. इथे एका गोष्टीची नोंद करणे जरूर आहे. काही साधकांची माहिती मिळवण्याच्या कामी त्यांची मुले, नातू, किंवा क्वचित पणतू यांची मदत झाली. पण नातवंडांनी, किंवा विशेषकरून पतवंडांनी सांगितलेल्या माहितीत काही तपशिलाचा फरक पडणे शक्य आहे. तरीही घराण्यातील मंडळींकडून माहिती घेण्यावाचून दुसरा मार्ग नसल्याने जशी मिळाली तशी माहिती घातली आहे.

या संकलनाचे दोन भाग केले आहेत. छायाचित्रे मिळालेल्या साधकांचा परिचय '(अ)' विभागात देऊन '(आ)' विभागात छायाचित्रे न मिळालेल्या साधकांची माहिती दिली आहे. दोन्ही भागांतील व्यक्तींची मांडणी अकारविल्हे केली आहे. सुरुवातीस जे दोन फोटो दिले आहेत त्या फोटोंना पूर्वसूरींचा दरबार हेच नाव शोभते. त्यात महाराजांचे गुरुबंधू व शिष्यवर्ग अशी सरमिसळ आहे. फोटो फार जुने आहेत. त्यांत असणाऱ्या व्यक्तींना ओळखणारे आता जवळजवळ कुणीच राहिले नाहीत. ज्येष्ठ-श्रेष्ठ साधकांच्या एवढ्या तरी प्रतिमा रहाव्या म्हणून हे दरबार सादर केले आहेत.

छायाचित्रे जमवण्याच्या कामी जुनी दप्तरे, जुनी पुस्तके, संप्रदायातील वयोवृद्ध साधक, यांचे फार उपकार झाले. त्यांच्याबद्दल कृतज्ञता कशी व्यक्त करावी?

पूर्वसूरींचा दरबार, इंचगेरी (सुमारे १९०१-१९०२)



पूर्वसूरींचा दरबार, विजापूर (सुमारे १९०१-१९०२)

(अ) **महाराजांचे शिष्य** (छायाचित्रे उपलब्ध)

अल्लप्पा धडूती : हे चिम्मड येथे राहणारे होते. यांचे नामस्मरण उत्तम असे. ते निंबाळला गुरुदेवांकडे वरचेवर येत, इतकेच नव्हे तर सोलापूर, मुंबई, बेंगळूर अशा गावांनाही सप्ताहासाठी जात. ते वृत्तीने फार शांत होते. नित्यनेमावलीतील पंचसमासीत खालील दोन ओव्यांत यांचे वर्णन आहे :

अल्लप्पा धडूती

चिम्मडी असती दोन सेवक। कबीर अल्लप्पा एक।
विरक्त आणि भाविक। गुह्यज्ञानी।।४.२१।।
तयांचे करावया कथन। वक्रदृष्टिक हेचि कारण।
विवेकी असती परिपूर्ण। म्हणून लिहिलें।।४.२२।।

शिवाय सोमनाथपंत पंचनदीकर यांनी भाऊसाहेब महाराजांच्या मुख्य शिष्यांचे जे वर्णन केले आहे त्यात ते म्हणतात :

अल्लप्पा श्री कबीर नामें। चिम्मड स्थानाला।

शोभती चिम्मड स्थानाला।।

अल्लप्पा व कबीर (सय्यद अल्ली सरकावस) यांची नेहमी जोडी असे.

श्रीनिवासराव आनीखिंडी

आनीखिंडी, श्रीनिवास कृष्ण : हे जमखंडीचे राहणारे. जमखंडीस बसप्पा कटगी यांच्या घरी २३-१०-१९११ या दिवशी त्यांनी नाम घेतले. १९२२ ते १९३२ पर्यंत इंचगेरीस जाऊन अंबुराव महाराजांना ते सप्ताहासाठी जमखंडीस घेऊन येत. अंबुरावांनी महाराजांच्या व स्वतःच्या चिपळ्या श्रीनिवासरावांना दिल्या होत्या. वयाच्या ७८व्या वर्षी १९७३ मध्ये मुंबईस मृत्यू.

गोपाळराव आपटे

आपटे, गोपाळ धोंडो : हे जमखंडी येथील रहिवासी. जन्म १८८०. १५-६-१९०५ला यांनी महाराजांकडून नाम घेतले. निंबाळला गुरुदेवांकडे येत असत. मृत्यू १९५४.



धोंडोपंत आपटे

आपटे, धोंडो गोपाळ : जन्म १८५४. मुधोळ येथे ते मामलेदार होते. ह्यांनी १५-६-१९०५ला नाम घेतले. महाराज यांच्या घरी जाऊन सप्ताह करीत असत. आपला मुलगा गोपाळ याला नाम द्यावे अशी त्यांनी महाराजांना विनंती केली. ज्या दिवशी नाम दिले त्या वेळेस महाराजांच्या डोळ्यांना पाणी आले. लगेच धोंडोपंतांनी विचारले, 'मायेमुळे माझ्या डोळ्यांत पाणी येईल, पण तुमच्या डोळ्यांत पाणी का?' त्यावर महाराज म्हणाले, 'याचे पुढचे दिवस वाईट आहेत म्हणून.' पुढे घडणाऱ्या घटना जाणून महाराजांनी हे शब्द उच्चारले होते. गोपाळरावांचे पुढचे आयुष्य दारिद्र्यात गेले. धोंडोपंतांना भविष्याचा नाद होता. एका ज्योतिष्याने त्यांना 'तुमचे आयुष्य ६० वर्षे आहे' असे सांगितले. ६० वर्षे होण्याच्या वेळेस योगायोगाने महाराज त्यांच्या घरी गेले. त्यांनी धोंडोपंतांना सांगितले की मी नेमाला बसतो. माझ्या मागे तू नेमाला बैस, पण आसन सोडू नको. धोंडोपंतांनी तसे केले. रात्रभर दोघे ध्यान करत बसले होते. पहाटे महाराजांनी त्यांना विचारले, 'अरे, तू मेला कसा नाहीस? हे बघ, साधकाने असल्या भविष्यावर विश्वास ठेवू नये.' सद्गुरूंच्या सान्निध्यात मृत्यूसुद्धा येण्यास धजत नाही असे म्हणता येणार नाही का? धोंडोपंत १९२१ साली मृत्यू पावले.

चिदंबरराव कन्नूर

कन्नूर, चिदंबर अप्पाराव : यांना महाराजांकडून अनुग्रह मिळाला होता. जन्म १८९२ सालचा होता. यांचा मृत्यू विजापूर येथे ९-१२-१९४९ला झाला.

कन्नूर मास्तर

कन्नूर मास्तर : यांचे पूर्ण नाव हणमंतराव अप्पाराव कन्नूर. जन्म ३० डिसेंबर १८९४, मृत्यू २१ जुलै १९९१. भाऊसाहेब महाराजांकडून लहानपणीच त्यांनी नाम घेतले होते. महाराजांच्या अकरा मारुतींपैकी हे एक होते. सद्गुरूंचा सहवास यांना बराच लाभला व त्यांची मनोभावे सेवा करण्याची संधी मिळाली. गुरुदेवांकडे निंबाळला कन्नूर मास्तर अखेरपर्यंत येत. बेंगळूर येथे आपल्या घरी बाबांच्या

पुण्यतिथीपासून महाराजांच्या पुण्यतिथीपर्यंत एक महिन्याचा सप्ताह यांनी कित्येक वर्षे केला. त्यांचे घर बेंगळूर येथील नामस्मरणाचे एक केंद्र आहे. यांची अधिक माहिती 'चिंतनिका' पुस्तकात पृ. १२५ वर आहे. तसेच 'दासबोधसुधा' या ग्रंथात पृ. ३९३ वर आहे.

कबीर साहेब

कबीर साहेब : हे चिम्मड येथील रहाणारे. यांचे पूर्ण नाव सय्यद अल्ली सरकावस. महाराज यांना कबीर म्हणत. ध्यान करण्यात हे खंबीर होते. असे ऐकले आहे की महाराज एकदा संतसभेत म्हणाले- 'सद्गुरूंनी सांगितल्याप्रमाणे नाम घेतल्यापासून न चुकता नित्यनेम जे करतात त्यांनी उभे राहावे.' हे ऐकल्यावर फक्त कबीरसाहेब उभे राहिले. बाकी कुणी नाही. या प्रसंगावरून त्यांची पदवी कळेल. ठराविक नामस्मरण झाल्याशिवाय ते अन्नग्रहण करीत नसत हे सर्वांना माहीत आहे. कबीर व अल्लप्पा यांची नेहमी जोडी असे. या दोघांबद्दल नित्यनेमावलीतील पंचसमासीमध्ये व सोमनाथपंत पंचनदीकर यांच्या पदात आलेले गौरवपर उद्गार वर अल्लप्पा यांच्या माहितीत दिले आहेत.

अन्नपूर्णाबाई करंदीकर

करंदीकर, अन्नपूर्णाबाई : जमखंडीला अंताजीपंत रिसबूड हे महाराजांचे शिष्य होते. त्यांची कन्या म्हणजे अन्नपूर्णाबाई. लहानपणीच ज्या वेळेस महाराज जमखंडीस जात तेव्हा त्यांनी नाम घेतले. २८-४-२००० रोजी मृत्यू.

करबसप्पा रामप्पा आवटी : हे भाऊसाहेब महाराजांचे चडचण येथील शिष्य. महाराजरवर वचन या निंबरगी महाराजांच्या वचनांची कन्नड लिपीत लिहिलेली पोथी यांच्याकडे होती. ती त्यांनी गुरुदेवांना आणून दिली. ही पोथी नाम घेतल्यावर एका वर्षाने म्हणजे १९०१ साली महाराजांनी आपल्याला दिली होती असे ते सांगत. हे अगदी स्पष्टवक्ते होते. कुणाचीही भीडभाड ठेवत नसत. करबसप्पा भारुडे रंगवून म्हणत. म्हणताना अभिनय करीत. 'अगलि ना

करबसप्पा आवटी

इरलारे' हे जात्यावरचे पद ते गात. 'नयनेंद्रिय विषयदिंद' हे अखंडेश्वरांचे वचन त्यांना फार आवडे व हातवारे करून फार परिणामकारक रीतीने हे वचन ते म्हणत असत. 'नोड सखी बेळगुतद परमप्रकाशद ज्योति' हे त्यांचे आणखी एक आवडते पद होते.

काकूसाहेब रानडे : सीताबाई रामचंद्र रानडे या गुरुदेवांच्या पत्नी. त्या भाऊसाहेबांच्या एक भाविक व निष्ठावंत भक्त होत्या. जन्म १९०९, मृत्यू १९८२. गुरुदेवांच्या निर्याणानंतर आश्रमाची धुरा त्यांनी दोन तपे वाहिली. याच काळात गुरुदेवांच्या जुन्या घराचे समाधिमंदिरात रूपांतर झाले. त्याच्यासमोर एक भव्य सभामंटप उभारला गेला. त्यांनी अनेक प्रकारे आश्रमाची सेवा केली. त्यांतील विशेष प्रशंसनीय कार्य म्हणजे गुरुदेवांच्या ग्रंथांबद्दलचे आहे. गुरुदेवांचे अपूर्ण ग्रंथ त्यांनी पूर्ण करवून घेऊन त्यांच्या प्रकाशनाची वाट खुली केली. त्यांच्या प्रेरणेने काही ग्रंथांच्या नवीन आवृत्त्या निघाल्या. भाऊसाहेब महाराजांच्या पत्रांबद्दल गुरुदेवांचा निःसीम पूज्यभाव कसा होता हे सर्वांना ज्ञात आहे. ती पत्रे पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याचे श्रेय काकूसाहेबांकडे जाते. हा ग्रंथ निंबरगी संप्रदायाच्या इतिहासावर फार मोठा प्रकाश टाकतो. हा दुवा जोडला गेला नसता तर अनेक घटना विस्कळित राहिल्या असत्या. गुरुदेवांचे कोणतेही लिखाण प्रसिद्ध करण्याची आस्था कुणी दाखवण्याचा अवकाश, काकूसाहेब त्या विषयावर गुरुदेवांनी तयार केलेले सर्व साहित्य उपलब्ध करून देत. या बाबतीत त्यांनी कोणतीही अट घातली नाही. निंबाळ आश्रमाच्या उन्नतीसाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. यांची अधिक माहिती 'दासबोधसुधा' या ग्रंथात पृ. ४८१ वर आहे.

काकूसाहेब रानडे

कारखानीस, गणेश गोविंद : जन्म मलकापूर (कोल्हापूर). जन्मतारीख २०-४-१८९०. ह्यांनी भाऊसाहेब महाराजांकडून ५-११-१९१० ला जमखंडी येथे नाम घेतले. त्यांची महाराजांवर दृढ श्रद्धा होती. ज्ञानेश्वरांच्या साहित्याचा त्यांचा गाढा अभ्यास होता व ज्ञानेश्वरी त्यांना जवळजवळ पाठ होती. त्यांनी हरिजनसेवेचे काम जन्मभर तळमळीने केले. जेव्हा जेव्हा गुरुदेव बोलावत तेव्हा तेव्हा ते लगेच निंबाळला येत. २०-१२-१९८९ला विजापूर येथे मृत्यू. ह्यांचे चरित्र प्रसिद्ध झाले आहे. काका कारखानीस या नावाने ते ओळखले जातात.

काका कारखानीस

कुर्तकोटी, शंकरराव गुरुराव : हे गदग येथील राहणारे. जन्मतारीख १-१०-१८९०. ते एक नामवंत शिक्षक होते. कन्नड, संस्कृत, इंग्रजी, गुजराथी, हिंदी व बंगाली या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. अद्वैत वेदान्ताचा त्यांचा सखोल अभ्यास होता. ते एक वर्षभर निंबाळला गुरुदेवांजवळ राहिले होते. अध्यात्म-विद्यामंदिराच्या स्थापनेनंतर त्या संस्थेतर्फे गुरुदेवांचे जे लिखाण चालू होते त्या कामात त्यांना शंकररावांनी खूप मदत केली. गुरुदेवांनी भागवतातील वेचे काढले होते. तसेच कन्नड संतकवींच्या पदांचे विवरण करण्याचे त्यांचे कामही चालू होते. या दोन्ही प्रकारच्या अभ्यासात शंकररावांचे गुरुदेवांना साहाय्य झाले. शंकररावांच्या विद्वत्तेला विनोदाची झालर होती. बेळगाव येथे १९-११-१९५९ रोजी त्यांचे निधन झाले.

शंकरराव कुर्तकोटी

कुलकर्णी, शंकर रघुनाथ : सोलापूरजवळच्या कुमठे या गावी ते असत. त्यांना महाराजांकडून २४-२-१९०८ला नाम मिळाले. हे फार निष्ठावंत होते. महाराजांचा ह्यांच्या घरी काही दिवस मुक्काम झाला होता. गुरुदेवही त्यांच्यासमवेत होते. गुरुदेवांची प्रकृती ठीक नव्हती म्हणून त्यांच्या मातोश्रीही त्यांच्याबरोबर आल्या होत्या. गुरुदेव सर्वांना सांगत असत की महाराज शंकररावांकडे उतरले होते, तुम्ही तिथे जाऊन महाराजांनी नेम केलेल्या जागी नेम करून या. अलीकडे सोलापूरचे काही साधक शंकररावांकडे मुद्दाम गेले होते, तेव्हा साधकमंडळी आपल्या पायाने घरी आलेली पाहून त्यांना अत्यंत आनंद झाला. असे सांगतात की सोलापूरहून निंबाळला जाताना कुमठे गावाजवळून रेल्वेगाडी जाताना गुरुदेव शंकररावांच्या घराच्या दिशेने हात जोडत असत.

शंकरराव कुलकर्णी

गिरिमल्लप्पा महाराज : यांचे पूर्ण नाव गिरिमल्लप्पा यल्लप्पा मेत्री. जन्म १८७३. महाराजांकडून १०-७-१९०६ रोजी नाम घेतले. हे जमखंडी येथील कापसाचे प्रसिद्ध व्यापारी. सत्कार्याला ते सढळ हाताने मदत करत. साधन उत्तम करून त्यांनी पारमार्थिक अनुभवांची जोड केली. इंचगेरी येथे निंबरगी महाराजांच्या समाधीचे मंदिर व शिखर, भाऊसाहेब महाराजांच्या समाधीचे मंदिर व शिखर आणि त्या दोहोंमधील

भव्य सभामंटप हे सर्व त्यांनी स्वखर्चाने बांधले. त्यांची भक्ती अनुपमेय होती. त्यांनी भक्तिप्रसाराचे काम अत्यंत उत्साहाने केले. इंचगेरी येथे त्यांची समाधी आहे. त्यावरील मंदिर प्रेक्षणीय आहे. निर्याण, माघ शु. ४, शके १८५६. इंचगेरी येथे दरवर्षी यांच्या पुण्यतिथीचा उत्सव होतो.

गिरिमल्लप्पा महाराज

गिरिमल्लप्पा भक्तीने त्या बांधिती शिखराला।

सजविती सद्गुरुनाथाला।।

असे सोमनाथपंत पंचनदीकर यांनी म्हटले आहे.

मोरोपंत गोखले

गोखले, मोरेश्वर काशिनाथ : जन्म, १४-१०-१८५९. मृत्यू २७.५.१९४४. हे मूळचे जमखंडीचे. तिथे शाळेचे मुख्याध्यापक होते. भाऊसाहेब महाराजांकडून यांनी नाम घेतले होते. यांच्या मातोश्री पार्वतीबाई गोखले याही महाराजांच्या अनुगृहीत होत्या. या दोघांचीही नावे महाराजांच्या जावक पत्रांतून वरचेवर येतात. पृ. ४२, ४३ किंवा ४५ वर महाराजांनी पार्वतीबाईंना लिहिलेली पत्रे आहेत.

गोखले, रघुनाथ मोरेश्वर : जन्म १४-९-१९०५. मृत्यू २१-४-१९८७. यांचे लहानपण जमखंडीस गेले. पुढे ते वऱ्हाडात यवतमाळ येथे स्थायिक झाले. बालपणीच यांना भाऊसाहेब महाराजांकडून अनुग्रह मिळाला होता. ते फार भाविक होते व महाराजांवर त्यांची जबरदस्त निष्ठा होती. निंबाळला ते पुष्कळदा येत. गुरुदेवांच्या निर्याणानंतरही ते निंबाळला येऊन रहात असत. तेथे आल्यावर इंचगेरी, उमदी व निंबरगी अशी त्रिस्थळी यात्रा ते करीत. ही यात्रा बहुतांशी पायीच होई.



रघुनाथराव गोखले

निंबरगी येथील निंबरगी महाराजांच्या मंदिरावर शिखर बांधण्याची नांदी रघुनाथरावांनीच केली. १९५१च्या सुमारास ते निंबाळला आले असताना त्यांनी गुरुदेवांना एकदम साष्टांग नमस्कार घातला. गुरुदेवांना ते आवडले नाही. 'मला नमस्कार करू नको' असे गुरुदेव रागाने म्हणाले. रघुनाथराव फार भावनाप्रधान होते. व्याकुळतेने आणि अश्रुभरल्या डोळ्यांनी त्यांनी विचारले, 'आता महाराज नाहीत, आम्ही कुणाला नमस्कार करणार?' त्यांची

महाराजांवरील निष्ठा पाहून काही वेळाने गुरुदेव म्हणाले, 'तुझे अंतःकरण शुद्ध आहे. आता इंचगेरीस जाऊन महाराजांचे दर्शन घेऊन ये.' त्याप्रमाणे रघुनाथराव दुसऱ्याच दिवशी इंचगेरीस जाऊन आले.

दत्तोपंत गोडबोले

गोडबोले, दत्तोपंत : यांनी महाराजांकडून अनुग्रह घेतला होता. बेळगावला भिक्षुकी व इतर छोटे मोठे उद्योग करत असत. महाराजांच्या जावक पत्रांतून यांचा उल्लेख येतो. यांच्या घरातील माणसे म्हणजे पत्नी बयाक्का, मुलगा नारायणराव व सून लक्ष्मीबाई ही सर्वच मंडळी महाराजांची नामधारक होती.

गोडबोले, बयाक्का दत्तात्रेय : १०-२-१९०५च्या महाराजांच्या जावक पत्रात असा उल्लेख आहे की महा-राजांनी ह्यांना पांढऱ्या रंगाचा हलवा पाठवला होता. ज्याच्या त्याच्या पारमार्थिक योग्यतेप्रमाणे विशिष्ट रंगाचा हलवा महाराज आपल्या शिष्यांना पाठवत असत. या पत्रात बयाक्कांचा उल्लेख 'नारायणरावांच्या आई' असा आलेला आहे.

बयाक्का गोडबोले

गोडबोले, लक्ष्मीबाई नारायणराव : या सोलापूर येथे असत. त्या लहान मुलांना औषधे देत असत, परंतु औषधाचा कोणत्याही रूपात दिलेला मोबदला स्वीकारत नसत. औषधाच्या बदली काही घेतले की औषधाचा गुण येत नाही असे त्या निस्पृहपणे सांगत. यांच्या घरी रामनवमीचा उत्सव थाटाने होई.

लक्ष्मीबाई गोडबोले

जांभळीकर, श्री. गो. : जन्म ३० मार्च १९०६, मृत्यू ११ जानेवारी १९९५, पौष दशमी, मंगळवार/बुधवार रात्री १२.१० वाजता. १९११ साली इंचगेरीस यांना नाम मिळाले. महाराजांनी त्यांना एक अंगरखा दिला होता. त्यांनी तो जिवापाड जपून ठेवला होता. जांभळीकरांच्या घरी परमार्थाचा वारसा होता. त्यांच्या मातोश्री रुक्मिणीबाई यांनी पुष्कळ पारमार्थिक पदे केली आहेत. शिवलिंगव्वा अक्का व गुरुदेव या दोघांबद्दल जांभळीकरांना नितांत आदर असून

श्री. गो. जांभळीकर

ते त्यांना गुरुतुल्य मानीत. श्रीमन्मातोश्री शिवलिंगव्वा अक्का व गुरुवर्य रामभाऊ अण्णा असे या दोघांचे उल्लेख जांभळीकर करीत असत. शिवलिंगव्वांच्या साहित्याचा त्यांनी फार अभ्यास केला. यासाठी ते निंबाळला येऊन राहिले होते. निंबाळला नव्या घराच्या माडीवर ते वाचन-मनन करीत व रोज काय काम केले, नवीन काय मिळाले, याचा संध्याकाळी गुरुदेवांना अहवाल देत. हे मोठे चित्रकार असून संप्रदायातील संतांची चित्रे यांनी काढली आहेत. गुरुदेवांच्या अमृतमहोत्सवाच्या वेळी जमखंडीच्या पी. बी. हायस्कूलमध्ये, ३ जुलै १९५६ रोजी ज्या तैलचित्राचे अनावरण झाले, ते जांभळीकरांनी तयार केले आहे.

जालीहाळ मास्तर

त्यासाठी निंबाळला येऊन त्यांनी गुरुदेवांचे अनेक फोटो घेतले होते. याबद्दल अमृतमहोत्सव समितीकडून जांभळीकरांना एक पत्र गेले होते. त्यात असे म्हटले आहे की, 'आपण आमचेकरिता निंबाळला जाऊन श्री गुरुदेवांचे निरनिराळ्या पोजचे फोटो घेऊन आम्हांवर अनंत उपकार केले आहेत. आपणावर गुरुकृपा आहेच. इतर कोणासही त्यांनी फोटो काढून घेण्याची परवानगी दिली नसती. केवळ आपण एकनिष्ठ साधक आहात म्हणूनच ही परवानगी मिळू शकली.' तैलचित्र काढलेला गुरुदेवांचा फोटो बहुतेक सर्व साधकांकडे असतो. १९८६ साली जांभळीकर गुरुदेवांच्या जन्मशताब्दीसाठी निंबाळला आले होते. ते जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्चे जुने विद्यार्थी असून त्यांचे व्यक्तित्व चतुरस्र होते.

जालीहाळ मास्तर : यांचे पूर्ण नाव हणमंत रामचंद्र कुलकर्णी. महाराजांच्या अकरा मारुतींपैकी ते एक होते. निंबाळला गुरुदेवांकडे त्यांचे नेहमी जाणे-येणे असे. यांच्या लहानपणची एक घटना 'चिंतनिका' पुस्तकात पृ. १२५-१२६ वर आहे. यांचा मृत्यू सप्टेंबर १९८२ मध्ये झाला.

पांडुरंगराव जोशी

जोशी, पांडुरंगराव : हे महाराजांचे शिष्य होते.

तुळपुळे, गणेश विष्णू : यांनी भाऊसाहेब महाराजांकडून ता. ६-१२-१९११ला नाम घेतले. जन्म २० फेब्रुवारी १८९०, मृत्यू १९८२. गुरुदेवांच्या इंग्रजी ग्रंथांची मराठी भाषांतरे

तुळपुळे काका

करून ह्यांनी गुरुदेवांचे विचार-भांडार सर्वांना खुले केले. सांगलीचे त्यांचे घर भक्तीचे केंद्र होते. अनेक मंडळींना त्यांनी परमार्थमार्गाला लावले. तुळपुळे काका या नावाने त्यांना संप्रदायात ओळखतात. ह्यांचे चरित्र प्रसिद्ध झाले आहे.

दत्तोपंत महाराज : (दत्तोपंत बागायत). हे महाराजांचे विजापूरचे शिष्य. यांची समाधी विजापूर येथे आहे. यांनी भक्तिप्रसाराचे काम खूप केले आहे.

दत्तोपंत महाराज

दामले, गोविंद गणेश : ह्यांनी जमखंडी येथे २८-११-१९१०ला महाराजांकडून नाम घेतले. हे गुरुदेवांच्या वडील बहिणीचे चिरंजीव. जन्म कोल्हापूर येथे २३-७-१८९८ला झाला. हे सात्त्विक वृत्तीचे असून गुरुदेव पुण्यास जात तेव्हा त्यांच्या सहवासात असत. शिक्षणक्षेत्रात यांनी भरीव काम केले आहे. मृत्यू १५-९-१९८२.

गोविंदराव दामले

दामले, नरहर गणेश : हे गुरुदेवांच्या वडील बहिणीचे चिरंजीव. जन्मतारीख ८ फेब्रुवारी १८९३. यांना जमखंडी येथे ३-११-१९१०ला नाम मिळाले. ते पुण्यास फर्ग्युसन कॉलेजात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होते. 'परमार्थमंदिर' या नावाने संप्रदायातील पदांचा संग्रह प्रसिद्ध झाला आहे. त्याला यांनी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली आहे. तसेच गुरुदेवांच्या अमृतमहोत्सवांच्या वेळेला प्रसिद्ध झालेल्या Philosophical and Other Essays, Part I, या ग्रंथालाही विश्लेषणात्मक प्रस्तावना लिहिली आहे. निंबाळ व अलाहाबाद येथे गुरुदेवांकडे नरहरपंत नेहमी येत असत. अलाहाबादहून निंबाळला परत येताना गुरुदेव यांच्याच घरी उतरत. नरहरपंतांच्या घरी रोज बरेच लोक नेमाला जात. त्यांचे घर म्हणजे पुण्यातील नामस्मरणाचे एक महत्त्वाचे केंद्र होते.

नरहरपंत दामले

नारायणराव दामले

यांचा मृत्यू पुणे येथे ३०-११-१९८३ला झाला.

दामले, नारायणराव : हे दत्तोपंत फडके यांचे जावई. यांना सोलापूर येथे बयाबाई सोहनींच्या वाड्यात महाराजांकडून नाम मिळाले. टिटवाळा येथे अंदाजे १९७० मध्ये यांचा मृत्यू झाला.

दामले, सत्यभामाबाई नारायणराव : या दत्तोपंत फडके यांची कन्या. सोलापूरला बयाबाई सोहनींच्या वाड्यात यांना महाराजांकडून अनुग्रह मिळाला. जन्म अंदाजे १९०७. या टिटवाळा येथे मार्च १९७१ मध्ये मृत्यू पावल्या.

सत्यभामाबाई दामले

देसाई, अप्पाराव तुळजो : हे महाराजांचे जमखंडी येथील अनुगृहीत. ते विजापूर येथे महालक्ष्मी ऑईल मिलमध्ये काही वर्षे इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनिअर म्हणून काम करत होते. ते अतिशय निष्ठावंत साधक होते. त्यांचा मृत्यू २३-७-१९५०ला झाला. ते गेल्यावर 'जमखंडीचा एक जुना दुवा तुटला' असे म्हणून गुरुदेवांनी हळहळ व्यक्त केली. यांच्या अपघाती मृत्यूच्या वेळची घटना 'चिंतनिका' या पुस्तकात पृ. १२२ वर आहे.

अप्पाराव देसाई

देसाई, तात्यासाहेब : यांचे पूर्ण नाव सखाराम तुळजो देसाई. जमखंडी येथे ते डॉक्टर होते. जन्म १८८२-८३ या सुमारास झाला. त्यांची निष्ठा तीव्र होती. ते निंबाळला खूप वेळा येत. स्वभावाने ते फार मोकळे होते व सर्वांशी खेळीमेळीने वागत असत. त्यांचा मृत्यू २०-३-१९६४ला झाला.

तात्यासाहेब देसाई

देसाई, तुळजो रामचंद्र : हे जमखंडीस डॉक्टर होते. त्यांनी भाऊसाहेब महाराजांकडून अनुग्रह घेतला होता. यांचे नाव महाराजांच्या जावक पत्रात खूप वेळा आलेले आहे. त्यांचा मृत्यू ८-१-१९३१ला झाला.

नरसिंहेश्वर महाराज : यांचे पूर्ण नाव नरसिंह

तुळजोपंत देसाई

गोविंद-राव कुलकर्णी. हे बसवन बागे-वाडीचे कुलकर्णी. जन्म इ. स. १८८१. निर्याण १-८- १९४७. त्यांची समाधी, यल्लट्टि, तालुका जमखंडी, जिल्हा बागलकोट येथे आहे. श्रावण शु. पौर्णिमेस तिथे पुण्यतिथीचा उत्सव होतो. हे पुष्कळ भक्तिप्रसार करीत असत.

नरसिंहेश्वर महाराज

नागप्पा भीमण्णा नीलवाणी : हे निंबरगी महाराजांचे नातू. १९०१ साली त्यांनी नाम घेतले अशी महाराजांच्या डायरीत नोंद आहे. त्यांना सद्गुरूंचा निकट सहवास लाभला होता. महाराजांबरोबर ते गावोगावी जात. नागप्पा कुशाग्र बुद्धीचे असून संप्रदायाबद्दल त्यांना खूपच माहिती होती. महाराजांनी दासबोध वाचायला सांगितला की श्रोतृवर्ग कोणत्या प्रकारचा आहे हे हेरून श्रोत्यांना रुचेल व पचेल असा समास नेमका काढून ते वाचत. "या आपल्या गुरुबंधूकडून गुरुदेव अनेक घटनांची अचूकता पडताळून घेत. कोणत्याही गोष्टीची नागप्पांकडून मिळालेली माहिती तिखटमीठ न लावलेली असणार अशी गुरुदेवांची खात्री होती. नागप्पांचा आवाज फार सुरेल असून पोथीवाचन, पदे म्हणणे, भजन रंगवणे वगैरेंत ते निष्णात होते. पदे लिहिलेली नागप्पांची एक वही असे. तिच्यात कन्नड, मराठी, हिंदी पदे लिहिलेली असत. अनुभव पदे, नीतीची पदे असे नागप्पांनी पदांचे आणखी वर्गीकरण केले होते. या वहीतील पदे जरूर लागेल तेव्हा गुरुदेव मागवून घेत." (कन्नड परमार्थसोपान, पृ. बारा). कधीकधी काकडारतीच्या सुरुवातीला अनेक

नागप्पा नीलवाणी

भूपाळ्या (उदयरागातील पदे) ते एकटेच स्वतः तबला वाजवून आळवीत असत. नित्यनेमावलीत पंचसमासीमध्ये 'वाद्यगायनी निष्णात। गंधर्वाऐसे'। (४.२९) असे त्यांचे वर्णन केले आहे. गुरुदेव अलाहाबादहून निंबाळला आले की नागप्पा निंबाळला येत व एक-दीड महिना राहत. मग या दोन्ही गुरुबंधूंच्या महाराजांबद्दलच्या गोष्टी रात्र रात्र चालत. संप्रदायातील महत्त्वाचे कागद किंवा वस्तू नागप्पा जिवापाड जपून ठेवत असत. नित्यनेमावलीच्या १९११ किंवा १९१६ सालच्या आवृत्त्या तसेच 'महाराजरवर

नागेश भटजी

वचना'ची १९०८ सालची प्रत त्यांच्या संग्रही होती. ती प्रत ८० वर्षांनंतरही नव्यासारखी कोरी दिसत असे. निंबरगी महाराजांचे कापूर लावण्याचे कमळ, त्यांची चिलीम किंवा चंची या सर्व गोष्टी नागप्पांनी जपल्या होत्या, म्हणून आज त्या साधकांच्या दृष्टीस पडतात. निंबरगी येथील निंबरगी महाराजांची समाधी व देऊळ यांच्या बांधकामाकडे हे लक्ष ठेवीत. यांच्याबद्दल एकगंमतीची गोष्ट सांगतात. १९०८ साली नागप्पांच्या लग्नाच्या वेळेला लग्नाची धार्मिक बाजू सांभाळणारे जंगम इंचगेरीचे असावेत की निंबरगीचे, या बाबतीत थोडा वाद झाला. लग्न इंचगेरीत, मग जंगमही तिथलेच हवेत, असे काहींचे मत होते, तर नवरा मुलगा निंबरगीचा म्हणून जंगमही निंबरगीचे हवेत असे दुसरे मत निघाले. कोरी खर्च (वधूवरांच्या कप-ड्यांचा खर्च) कुणी करायचा हेही मत-भेदाला आणखी एक कारण सापडले. थोडक्यात, लग्नांमधून होत असतात तसे वाद, रुसवे-फुगवे इथेही झाले. नंतर सर्व खेळीमेळीत पार पडले.

गुरुपादप्पा नीलवाणी

नागप्पांचा मृत्यू श्रावण वद्य २, बुधवार, ता. २६-८-१९५३ या दिवशी झाला.

सुब्बराय नीलवाणी

नागेश भटजी निंबरगी : ह्यांचे गाव जमखंडी. यांच्या घरातील पुष्कळ लोकांना महाराजांकडून नाम मिळाले होते. सप्ताहासाठी ते गावोगाव जात असत. त्यांचा आवाज गोड असून ते पदे फार तल्लीनतेने म्हणत.

नीलवाणी, गुरुपादप्पा भीमण्णा : हे निंबरगी महाराजांचे नातू. मृत्यू १९४२.

नीलवाणी, सुब्बराय भीमण्णा : निंबरगी महाराजांचे नातू. मृत्यू १९३८. निंबरगी महाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव निर्विघ्नपणे व्हावा अशी यांची फार इच्छा असे. त्यासाठी ते खटपट करीत. १९१० मध्ये ह्यांच्याच हातून निंबरगी महाराजांच्या अस्थी ओढ्याच्या पश्चिम तीरावरून काढून अलीकडच्या तीरावर आणल्या गेल्या होत्या.

फडके दत्तात्रेय रामचंद्र : हे मूळचे जमखंडीचे. नंतर सोलापूर येथे स्थायिक

झाले. जन्मसाल अंदाजे १८७६. मृत्यू १-८-१९५८. सोलापूरमधील चौपाड भागातल्या केळकर वाड्यात हे औषधे देत असत. भांडी गल्लीतल्या शिंप्यांच्या विठोबाच्या देवळात हे नेहमी जात. तिथे भजन-ध्यान वगैरेसाठी संप्रदायातील मंडळी जमत असत. महाराजांच्या जावक पत्रांमधून दत्तोपंतांचा उल्लेख वारंवार येतो. हे निंबाळला गुरुदेवांना भेटण्यास येत असत.

दत्तोपंत फडके

बसप्पा मलकप्पा कटगी

: हे जमखंडी येथील रहिवासी. महाराजांचे एक अत्यंत भाविक शिष्य. महाराज एकदोनदा यांच्याकडे येऊन गेल्यावर यांची व्यापारात फार भरभराट झाली. आधीच सद्‌गुरूंवर दृढ श्रद्धा, त्यातून आता ती आणखीनच बळावली. महाराज जमखंडीस जात असत तेव्हा आपल्या घरी त्यांनी भोजन करावे असे बसप्पांच्या मनाने घेतले. पण आपण लिंगायत, महाराज ब्राह्मण, तेव्हा हे कसे घडावे? मग त्यांनी एक उपाय शोधला. महाराजांच्या भोजनाची व्यवस्था होती तिथे साजूक तुपासह पूर्ण शिधा त्यांनी नेऊन दिला. महाराजांच्या पोटात त्या शिध्याचा स्वयंपाक जाणार म्हणून ते आनंदात होते. तरीही तो शिधा निश्चित वापरला गेला आहे ना याची खात्री करून घेण्यासाठी त्यांनी नंतर चौकशी केली. स्वयंपाक करणाऱ्यांकडून उत्तर आले, 'महाराज कुणाचेही काही घेत नाहीत. घोड्याची चंदीसुद्धा बरोबर आणतात. तेव्हा तुमचा शिधा त्यांच्या पोटात जाईल या भ्रमात राहू नका.' दुःखित झालेल्या बसप्पांनी मनाशी ठरवले की महाराज आपल्या घरचे काही खात नाहीत तोवर जेवायचे नाही. दुपारच्या पोथीच्या वेळेला ते दूर कोपऱ्यात बसले. जेवण झाले आहे याची खूण म्हणून लिंगायत समाजाच्या रीतीप्रमाणे त्यांनी कपाळावर विभूतीचे पट्टे ओढले. महाराज सर्व जाणूनही गप्प राहिले. दुसऱ्या दिवशी तसेच. महाराजांनी विचारले, 'काय बसप्पा, आज तरी जेवला आहेस का?' बसप्पांनी कपाळावरील विभूतीची ग्वाही दिली. महाराज गप्प राहिले. तिसऱ्या दिवशी पोटातील भुकेचा डोंब बाजूला ठेवून विभूती लावून बसप्पांची स्वारी पोथीला हजर झाली. महाराजांनी विचारले, 'बसप्पा, जेवला आहेस का?' बसप्पाचे बोट कपाळावरील विभूतीकडे वळले. महाराजांना राहवेना. 'बसप्पा, तू तीन दिवस उपाशी आहेस हे मला कळले नाही असे का तुला वाटते? कशासाठी हा हट्ट?'

बसप्पा कटगी

बसप्पा कळवळून म्हणाले, 'महाराज, तुम्ही मला सोन्याचे दिवस दाखवलेत आणि माझ्या घरचा घासही घेत नाही, मग मी कशाला जेवावे?' त्यांच्या भक्तीने द्रवलेले महाराज म्हणाले, 'तुझ्या निष्ठेला तोड नाही. आज मी तुझ्या घरी जेवायला येणार आहे.' महाराजांचे जेवण झाले. बसप्पांच्या उपासाचे पारणे झाले. भक्ताचा विजय झाला. त्यांच्या शुद्ध भक्तीने महाराजांना आपला नियम सैल करावा लागला. भीष्मांनी नाही का श्रीकृष्णांना प्रतिज्ञा मोडायला लावली?

नंतर महाराज बसप्पांच्या घरी उतरत असत. गुरुदेवांना तिथेच नाम मिळाले. आणखीही कित्येकांना तिथे नाम मिळाल्याचे उल्लेख मिळतात. आजही जमखंडीस बसप्पांचे वंशज त्यांच्या घरातली नाम देण्याची खोली दाखवतात. १९५६ साली गुरुदेव जमखंडीस गेले होते तेव्हा मुद्दाम बसप्पांच्या घरी जाऊन आले होते. तिथे ते अत्यंत आनंदात होते.

बाबण्णा जालीहाळ : यांचे पूर्ण नाव रामचंद्र कृष्ण कुलकर्णी. बाबण्णा कीर्तन करत असत. 'हरिदासर संग दोरकितु एनगीग' हे त्यांचे आवडते पद होते. महाराज त्यांना हरिदास असे म्हणत. एकदा महाराज त्यांच्या गावाला गेले होते. तेव्हा बाबण्णा ओढ्यावर पाणी आणायला गेले. ओढ्याकाठी लहानसा खड्डा करून त्यातले गढूळ पाणी पुन्हा पुन्हा काढून टाकावे तसतसे पाणी स्वच्छ येऊ लागते. मग ते पिण्यासाठी वापरतात. तसे वारंवार करून, पुष्कळ वेळ घालवून बाबण्णांनी पाणी भरले. गावचा कुलकर्णी पाणी भरतो आहे म्हणून पाण्याला आलेल्या बायका थांबून राहिल्या. बाबण्णांनी पाणी घरी आणले व 'तुमच्यासाठी अगदी स्वच्छ घागरभर पाणी आणले आहे' असे त्यांनी महाराजांना सांगितले. महाराज एकदम म्हणाले, 'बाबण्णा, घागरभर पाणी नाही, घागरभर तळतळाट आणला आहेस.' घरची कामे टाकून, तान्ह्या-पारठ्या मुलांना घरी ठेवून पाण्यासाठी खोळंबलेल्या बायकांचे चित्र त्यांच्या डोळ्यांपुढे आले असावे. स्वतःसाठी दुसऱ्यांना त्रास झालेला महाराजांना कसा सहन होईल?


बाबण्णा जालीहाळ

भगवंत हणमंत कुलकर्णी : यांनी महाराजांकडून नाम घेतल्याची तारीख २०-३-१९०५. Pathway to God in Kannada Literature या पुस्तकात पृ. ११३ वर गुरुदेवांनी यांच्यांबद्दल बरीच माहिती दिली आहे.

भगवंतप्पा कुलकर्णी

भाऊराव भीमण्णा मंगळवेढे : हे निंबरगी महाराजांचे नातू. हे मंगळवेढे असे आडनाव लावत. त्यांनी भाऊसाहेब महाराजांकडून ता. २९-८-१९०४ला नाम घेतले. मृत्यू शुक्रवार, २८-५-१९७६. भाऊराव खड्या आवाजात भजन म्हणत. ते संध्याकाळी एकटेच निंबरगी महाराजांच्या समाधीच्या समोर भजन करीत तेव्हा देवळात ५-१० माणसे भजन करत असावीत असे दुरून ऐकणाऱ्याला वाटे. समाधीची पूजा व त्रिकाळ भजन ते न चुकता देवळात येऊन करत. त्यांचे सौजन्य व आतिथ्य वाखाणण्याजोगे होते.

भाऊराव मंगळवेढे

भुजंग, पंढरीनाथ दत्तात्रेय : हे सोलापूरचे रहिवासी. जन्म अदमासे १८८२. भांडी गल्लीतील शिंप्यांच्या विठ्ठल-मंदिरात संप्रदायाच्या मंडळींचे भजन चाले, त्यात ह्यांचा मोठा वाटा होता. निंबाळला हे गुरुदेवांकडे येत असत. त्यांच्या भक्तीचा वारसा घराण्यात आजतागायत चालू असलेला दिसून येतो. ते फार करारी होते. त्यांचे जीवन अतिशय नियमित होते. कोणतेही देव-कार्य त्यांनी कधीही चुकवले नाही. त्यांचा मृत्यू १२ जानेवारी १९६६ला सोलापूर येथे झाला.

पंढरीनाथपंत भुजंग

राजाराम शिंपी (होमकर) : हे मूळचे जमखंडीचे राहणारे. त्यांना महाराजांकडून नाम मिळाले होते. यांचा नेम फार कडक असे. आजारपणात त्यांना दवाखान्यात ठेवले होते. तिथेही ते ध्यानमग्न असलेले दिसत असत. यांच्याबद्दलची एक गोष्ट 'चिंतनिका' पुस्तकात पृ. १४४-१४६ वर दिलेली आहे.

राजारामपंत शिंपी

राधाबाई लिमये : यांचा जन्म बडोदा येथे १८५७ मध्ये झाला. पापडी येथे २७-२-१९३९ला त्यांनी देह ठेवला.

राधाबाई लिमये

त्यांना आजी या नावाने ओळखतात. यांच्याबद्दल एक पुस्तिका प्रसिद्ध झाली आहे. तिचे नाव 'राधाबाई लिमये यांचे अल्पचरित्र व शिकवण', लेखक ग. वि. तुळपुळे.

रानडे, गणपती हरिभाऊ : हे गुरुदेवांचे पुतणे होते. त्यांचा जन्म सांगली येथे १८९८ मध्ये झाला. त्यांनी महाराजांकडून जमखंडीस २८-११-१९१०ला नाम घेतले. त्यांचे गुरुदेवांवर फार प्रेम होते. गुरुदेव फर्ग्युसन कॉलेजात शिकवत होते तेव्हा गणपतराव त्यांचे विद्यार्थी होते. त्यांचा शास्त्रीय संगीताचा गाढा अभ्यास होता. संगीत या विषयावर त्यांनी इंग्रजीत व मराठीत ग्रंथ लिहिले आहेत. १९६१ साली खडकवासला धरण फुटून पुण्यात महापूर आला तेव्हा त्यांनी आपले संगीतावरील अमोल ग्रंथ डोक्यावर घेऊन पुरातून पोहत जाऊन ग्रंथ वाचवले. १९६५ साली पुणे येथे त्यांचे निधन झाले.

गणपतराव रानडे

रामभाऊ फडणीस, तिकोटेकर : ह्यांना रामभाऊ मुत्या असे म्हणत असत. यांच्या वडिलांचे नाव कृष्णाजीपंत व आईचे नाव राधाबाई. ते ब्रह्मचारी असून महाराजांकडे रहात व त्यांना स्वयंपाक करून घालीत. महाराजांबरोबर ते फिरतीला जात. त्यांची गुरुसेवा वाखाणण्याजोगी होती. ते महाराजांच्या अकरा मारुतींपैकी एक होते. निंबरगी संप्रदायाच्या चित्रमय इतिहासात पृ. ६९ वर म्हटले आहे की महाराज रामभाऊंना पुत्राप्रमाणे मानत असत. महाराजांच्या निर्याणानंतर ते निंबाळला नेहमी येत. गुरुदेव अलाहाबादहून निंबाळला आले की ते १-२ महिने निंबाळला येऊन रहात. सोलापूर येथे भागवत थिएटर्ससमोरील आपटे बिल्डिंगमध्ये गोविंदराव गोडबोले यांच्या घरी रामनवमीचा उत्सव होत असे. रात्रंदिवस वीणा असे. या उत्सवाच्या आधी ८-१० दिवस रामभाऊ गोडबोल्यांकडे येऊन रहात. उत्सव संपल्यावरही पुढे ८-१० दिवस रहात. नंतर इतर साधक त्यांना आपल्या घरी घेऊन जात. ते प्रवचन करीत असत. आषाढ वद्य चतुर्थी, विकृतिनाम संवत्सर. शके १८७२ रोजी सोलापूर येथे भांडी गल्लीतील

रामभाऊ फडणीस

शिष्यांच्या विठ्ठल मंदिरात त्यांनी देह ठेवला (इ. स. १९५०). यांची आणखी माहिती 'चिंतनिका' पुस्तकात पृ. १०३-१०४ वर आहे.

रामराव होर्ती

रामराव होर्ती : हे महाराजांचे शिष्य. निर्याण आषाढ वद्य ५, शके १८५९ (इ. स. १९३७). विजापूर येथे यांची समाधी आहे. यांच्याबद्दलची एक गोष्ट Pathway to God in Kannada Literature मध्ये गुरुदेवांनी नोंदली आहे (पृ. ८७ पासून पुढे).

लक्ष्मणभटजी निंबरगी : हे मूळचे जमखंडीचे असून महाराजांशी फार सलगीने वागत असत. ते अतिशय विद्वान व सच्छील होते. दासबोधाचा संप्रदायात चालत आलेला अर्थ हे सांगत असत. सप्ताहासाठी ते गावोगावी जात. त्यांचा आवाज उत्तम असून ते पदे फार सुरेल म्हणत. निंबाळला ते अनेकदा येत. गुरुदेव व लक्ष्मणभटजी यांचे एकमेकांवर फार प्रेम होते.


लक्ष्मणभटजी

व्यंकटराव महाराज अंजुटगी : यांचे पूर्ण नाव व्यंकटेश हणमंत कुलकर्णी. यांची जन्मतारीख ५-६-१८८७ असून त्यांचा मृत्यू अश्विन वद्य १२ (गुरुद्वादशी) या दिवशी झाला. मृत्यूची तारीख ७-११-१९५० ही आहे. महाराजांकडून १६-३-१९११ला नाम घेतले. यांना वैद्यकीचे ज्ञान असून ते औषधे देत असत. यांची समाधी विजापूर येथे आहे. यांनी भक्तिप्रसाराचे कार्य सतत केले.

व्यंकटराव महाराज

शिवप्पा मुरगोड : हे जमखंडीचे नागरिक. यांचा तुपाचा मोठा व्यापार होता. यांचा उल्लेख महाराजांच्या जावक पत्रांतून बऱ्याच वेळा येतो. ते निंबाळला येत असत. गुरुदेवांना त्यांच्याबद्दल फार आदर होता. एकदा शिवप्पांनी तुपाचे डबे विक्रीसाठी मुंबईस पाठवले. ज्या

शिवप्पा मुरगोड

दिवशी डबे पाठवले त्या दिवशीचा तुपाचा भाव लावला होता. मुंबईस माल पोचेपर्यंत तुपाचा भाव अनपेक्षितपणे एकदम वाढला. मुंबईच्या दलालाने शिवप्पांना हे कळवले व वाढीव दराने हिशोब करून पाठवण्यास सांगितले. शिवप्पांनी त्याला साफ नकार दिला. 'मी एकदा जो भाव सांगितला तो सांगितला. तो कमी असला तरी पर्वा नाही. तोंडातून गेलेला शब्द खोटा करून मला नफा मिळवायचा नाही' असा स्पष्ट जबाब त्यांनी दलालाला दिला.

सिद्धरामेश्वर महाराज : हे सोलापूर जवळच्या पाथरी या गावचे असून त्यांचे आडनाव कोले असे होते. त्यांनी खूप भक्तिप्रसार केला. यांचे निर्याण अश्विन वद्य ११, शके १८५८ रोजी झाले. बसवन बागेवाडी (जिल्हा विजापूर) येथे त्यांची समाधी आहे. अश्विन वद्य ७ पासून वद्य ११ पर्यंत त्यांच्या पुण्यतिथीचा उत्सव बागेवाडीस होतो.

सिद्धरामेश्वर महाराज

सिद्धलिंगय्या महाराज : यांचे पूर्ण नाव सिद्धलिंगय्या चन्नबसय्या हिरेमठ असून ते कन्नूर येथे राहत. जन्म १८६१ सालचा आहे. कुणापुढे हात पसरू नये ही निंबरगी महाराजांची शिकवण आचरणात आणण्यास महाराजांनी त्यांना कसे सांगितले ती हकीकत Pathway to God in Hindi Literature या पुस्तकात पृ. ३२६-३२७ या पानांवर आहे. यांना कन्नूर स्वामी असेही म्हणत. यांचे निर्याण मार्गशीर्ष वद्य ३०, शके १८५८, ता. १२-१-१९३७ या दिवशी झाले. कन्नूर येथे त्यांची समाधी आहे. तिथे मार्गशीर्ष वद्य ११ ते वद्य ३० पर्यंत ५ दिवस पुण्यतिथीचा उत्सव होतो.

सिद्धलिंगय्या स्वामी

(आ) महाराजांचे शिष्य (छायाचित्रे अनुपलब्ध)

अण्णप्पा कुलकर्णी : ह्यांचे पूर्ण नाव जिवाजी भीमाजी कुलकर्णी. ते इंचगेरीचे रहाणारे होते. इंचगेरीच्या मठासाठी यांनी आपली जागा दिली. त्या जागेवरील आपला संपूर्ण हक्क सोडून दिला. याबद्दलचा करारनामा महाराजांच्या जावक पत्रांच्या पुस्तकात १२७ ते १२९ या पानांवर आहे. अण्णप्पांची आई जिऊबाई म्हणजे अंबुराव महाराजांची मोठी बहीण. जिऊबाईंनीच अंबुरावांना भीमरायाच्या उत्सवास निंबरगीला पाठवले होते. त्याच वेळेस अंबुरावांना निंबरगी येथे नाम मिळाले.

अय्यप्पा यल्लप्पा मेत्री : हे जमखंडी या गावचे. हे गिरिमल्लप्पा महाराजांचे बंधू. त्यांची निष्ठा वाखाणण्याजोगी होती. त्यांनी २१-११-१९०७ला नाम घेतले. इंचगेरीस निंबरगी महाराज व भाऊसाहेब महाराज यांच्या मंदिरांना जोडणारा एक मोठा सभामंटप आहे. त्या सभामंटपात अय्यप्पांची समाधी आहे.

अहल्यक्का : श्रीमती अहल्याबाई हुक्केरी. आपले बंधू डॉ. श्रीपाद गोविंद देसाई, रामदेव गल्ली, जमखंडी येथे त्या राहत असत. मृत्यू ३०-६-१९६० रोजी झाला. त्या एकदा गुरुदेवांच्या दर्शनासाठी आपले चुलत भाऊ अप्पाराव यांच्या सोबत निंबाळला गेल्या होत्या. तिथे साधक मंडळी बरीच असल्यामुळे गुरुदेवांची समक्ष भेट कशी होईल याची त्यांना काळजी लागली होती. आरतीच्या वेळी अहल्यक्कांनी ताट भरून फुलवाती लावण्यास दिल्या होत्या. गुरुदेवांनी ही ताट भरून फुलवाती लावण्याची पद्धत भाऊसाहेब महाराज यांच्या वेळची होती असे सांगून आरतीनंतर, 'या फुलवाती कुणी लावल्या?' अशी चौकशी केली. नंतर अहल्यक्कांस बोलावून त्यांची सविस्तर विचारपूस केली. साधकास तळमळ असल्यास देव अशी भेट घडवून आणतो.

आपटे, दत्तोपंत : यांनी महाराजांकडून ९-१२-१९०९ रोजी जमखंडीस नाम घेतले अशी महाराजांच्या डायरीत नोंद आहे. हे गोपाळ धोंडो आपटे यांचे चिरंजीव. आपले चुलत आजोबा दादासाहेब आपटे यांना दत्तोपंत दत्तक गेले होते. महाराजांच्या पत्रांतून यांचा उल्लेख येतो.

आपटे, दादासाहेब : हे धोंडोपंत आपटे यांचे बंधू. सुरुवातीस त्यांचा नामावर विश्वास नव्हता. एकदा महाराज म्हणाले, 'अरे तुझा विश्वास स्वप्नावर आहे ना?' यानंतर एक दिवस दादासाहेबांना स्वप्न पडले. त्यांनी स्वप्नात एका खोलीचे वासे मोजले. दुसऱ्या दिवशी प्रत्यक्ष वासे मोजले तेव्हा स्वप्नात जितकी संख्या आली होती तितकेच वासे भरले. स्वप्नातला अनुभव जर प्रत्यक्षात खरा ठरतो तर नामस्मरणाच्या

योगाने येणारा पारमार्थिक अनुभव कितीतरी पटींनी खरा असला पाहिजे, असा महाराजांच्या प्रश्नाचा रोख असावा असे त्यांना वाटले. मग त्यांनी महाराजांकडून नाम घेतले. यांनी आपल्या पुतण्याचा (म्हणजे गोपाळ धोंडो आपटे यांचा) मुलगा दत्तक घेतला होता. तेच दत्तोपंत आपटे.

इनामदार, नारायण नीलकंठ (निलजीकर) : जन्म इ. स. १८८८, वामनद्वादशी. मृत्यू सर्वपित्री अमावस्या, इ. स. १९७१. यांची आणखी काही माहिती मिळाली नाही.

औरसंग, रामचंद्र बनाजी : हे जमखंडी येथे रहात असत. जन्म १८९४, मृत्यू १९६६ (माघ वद्य अष्टमी). एकदा महाराज जमखंडीस गेले होते. त्या वेळी रस्तादुरुस्तीच्या कामासाठी खोदकाम केलेले होते. माती, दगड वगैरे सगळीकडे विखुरलेले होते. लहानगा रामचंद्र महाराजांचा हात धरून भजनाला निघाला होता. तो पायवाटेने चालला होता आणि महाराज खोदलेल्या दगडांवरून, खाचखळग्यांतून चालले होते. हे दृश्य जमखंडीतल्या एका ज्येष्ठ साधकाला विचित्र वाटले म्हणून त्यांनी रामचंद्राला खुणेने सांगितले की, 'तू खडकावरून चाल व महाराजांना पायवाटेने चालू दे.' दोन-तीन वेळा हे सांगूनही रामचंद्राच्या ते लक्षात आले नाही, पण महाराजांच्या मात्र लक्षात आले. ते ताबडतोब म्हणाले, 'काय रे, त्या कोवळ्या मुलाला दगडातून चालू देऊन मी पायवाटेने जाऊ काय? अरे मी काय पिकलं पान आहे. या लहान मुलाचं सगळं व्हायचं आहे. चल रे रामू, तू तसाच चल.' एवढे बोलून महाराजांनी रामूला हात धरून सावकाश नेले. नंतर प्रसादाच्या वेळेला आपल्या पानातले कडबू व आणखी प्रसाद रामचंद्राच्या पानात घातला. त्याने अत्यंत आनंदाने तो ग्रहण केला. महाराजांच्या कृपेने रामचंद्ररावांचा संसार सुखाचा झाला. कॅन्सरसारखा दुर्धर रोग होऊनही ते शांत होते. अंतकाली महाराजांचे नाव घेऊन त्यांनी प्राण सोडला.

दुसऱ्या एका वेळी रामचंद्ररावांच्या घरी महाराज व त्यांचे बरेच शिष्य यांचे भजन चालले होते. रामचंद्ररावांची आई आपल्या एक-दीड वर्षाच्या आजारी बाळाला मांडीवर घेऊन माजघरात बसली होती. भजन सुरू होऊन थोडा वेळ झाला असेल. सर्वजण भजनात दंग होते. त्या वेळी ते मूल आईच्या मांडीवरच गेले. ते आईला समजले पण बाई इतकी धीराची की काही न बोलता शांत बसून राहिली. भजन संपले आणि महाराज म्हणाले, 'अरे बाबांनो उठा. त्या बाईच्या सहनशीलतेची किती म्हणून परीक्षा घ्यायची? देवाच्या कामात आडवे येऊ नये म्हणून ती केव्हाची गप्प बसली आहे. आता पुढच्या कामाला लागा.'

जाता जाता आणखी एक गोष्ट पाहू. महाराजांच्या जावक पत्रांच्या पुस्तकात गुरुराव औरसंग यांचा एकदोन वेळा उल्लेख असून पृ. ३१ वर त्यांना 'चिम्मडकडील काका' म्हटले आहे. त्यांचा महाराजांशी बराच संबंध होता. ते रघुनाथप्रिय महाराजांचे अनुगृहीत. हे रामचंद्ररावांचे चुलत आजोबा. रघुनाथप्रिय महाराज प्रथम चिम्मडला आले तेव्हा भिक्षा मागण्यासाठी औरसंग यांच्या घरी गेले. भिक्षादानाचे काम संपल्यावर ते गुरप्पाकाकांना म्हणाले, 'मला हे घर सोडून जावे असे वाटत नाही.' गुरप्पांनी लगेचच सांगितले की 'तुम्ही इथे खुशाल रहा.' त्याप्रमाणे रघुनाथप्रियांचे वास्तव्य शेवटपर्यंत गुरप्पा यांच्या घरी होते. त्यांनी गुरप्पांच्या घरातच देह ठेवला.

एकदा भाऊसाहेब महाराज चिम्मड येथे होते. तेव्हा गुरप्पा इंचगेरीस गेले होते. आपण देह ठेवावा अशी गुरप्पांना आर्त इच्छा झाली व त्याला महाराजांची अनुज्ञा मिळावी असे वाटले. सर्व जबाबदाऱ्यांतून मुक्तता झाली असल्याने देह ठेवण्यास हरकत नाही अशी महाराजांची संमती असल्याची त्यांच्या अन्तर्मनाला खूण पटली. त्यानुसार गुरप्पांनी देह ठेवला. ही बातमी महाराजांनी बाळप्पा व बनप्पा या गुरप्पांच्या दोन्ही पुतण्यांना जमखंडीस कळवली. काकांचे क्रियाकर्म जमखंडीला करण्याचे ठरल्यावर बाळप्पा अस्थी आणण्यासाठी इंचगेरीला गेले. महाराजही इंचगेरीस आले होते. त्या वेळी 'क्रियाकर्म इथेच करावे' असा सल्ला महाराजांनी दिला. परंतु एक बंधू जमखंडीस असल्यामुळे त्यांना सोडून तो विधी इंचगेरीस करणे बाळप्पांना प्रशस्त वाटेना. म्हणून ते अस्थी घेऊन निघाले. मात्र योग्य वेळात ते जमखंडीस पोचू शकले नाहीत व तिकोटा गावीच त्यांना एका ब्राह्मणाकडून धार्मिक विधी करून घ्यावे लागले. जमखंडीस असलेले बंधू अखेरच्या संस्कारांना हजर राहू शकलेच नाहीत. क्रियाकर्म इंचगेरीस करावे असे महाराजांचे सांगणे असूनही बंधू हजर असावे या इच्छेने बाळप्पा अस्थी घेऊन जमखंडीस निघाले होते. पण ती गोष्ट होणारच नव्हती. त्यामुळे बाळप्पांचे इंचगेरीहून निघणे निष्फळ ठरले. नंतर त्यांनी महाराजांची क्षमा मागितली.

या वेळची आणखी एक घटना महत्त्वाची आहे. काकांच्या निधनाची बातमी कळल्यावर, त्यांच्या अस्थी इंचगेरीहून आणण्यासाठी बाळप्पा जमखंडीहून निघाले. वाटेत त्यांच्या मनात विचार आला की मी खूप दमलो आहे, पायही दुखायला लागले आहेत. इंचगेरीस पोचल्यावर मला पाय धुवायला कढत पाणी मिळावे व गरम भात-पिठले जेवायला मिळावे. इकडे त्यांच्या मनात हा विचार येत होता आणि तिकडे

इंचगेरीत महाराज आपल्या लोकांना सांगत होते, 'बाळप्पा थोड्या वेळात इथे पोचेल. त्याला पाय धुवायला कढत पाणी द्या व जेवायला गरम भात-पिठले वाढा!'

(गुरप्पांच्या एका वंशजाकडून वरील माहिती मिळाली. पण दुसऱ्या एका वंशजाचे म्हणणे असे आहे की बनाजी व बाळप्पा यांचे ते काका नसून वडीलच होते. तीन पिढ्यांची पूर्ण हकीकत माहीत असतेच असे नाही. म्हणून हे दुसरेही मत नोंदले आहे. हकीकतीत मतभेद नाही).

कलमडी, नरहरराव : भाऊसाहेब महाराजांकडून ९-६-१९०४ला त्यांनी नाम घेतले. ते विजापूरला वकिली करत. त्यांचा व महाराजांचा बराच पत्रव्यवहार असावा. महाराजांच्या जावक पत्रांच्या पुस्तकातील ज्ञानमार्गाची पत्रे म्हणून जो विभाग आहे त्यातील काही पत्रे नरहररावांना लिहिलेली आहेत. ते महाराजांना तात्त्विक विषयांवरील प्रश्न विचारीत, असे महाराजांनी त्यांना लिहिलेल्या उत्तरांवरून दिसते. 'वंदू श्रीगुरुला' या महाराजांच्या प्रमुख शिष्यांचे वर्णन करणाऱ्या आपल्या पदात सोमनाथपंत पंचनदीकर नरहररावांबद्दल म्हणतात :

नरहरराव जिज्ञासू असुनि इच्छिती ज्ञानाला।
खरोखर इच्छिती ज्ञानाला।।

नरहरराव ज्ञानपिपासू तर होतेच, शिवाय त्यांची भक्तीही तीव्र होती.

कानिटकर, हरिअण्णा : हे जमखंडीला देवी डॉक्टर होते. ते महाराजांचे अनुगृहीत होते. महाराज जेव्हा जमखंडीस येत तेव्हा हरिअण्णांच्या घरी पोथी, भजन वगैरे होत असे. अशाच एका प्रसंगी गुरुदेव तिथे होते. 'नामस्मरण केले असता परीक्षाही उतरते' हे महाराजांच्या तोंडून गुरुदेवांनी हरिअण्णांच्या घरी ऐकले. एका अर्थी हरिअण्णांचा गुरुदेवांवर उपकार झाला. पुढे योगायोगाने गुरुदेवांना नकळतच या ऋणांतून मुक्त होण्याची संधी कशी मिळाली यासंबंधीची तपशीलवार हकीकत 'चिंतनिका' पुस्तकात पृ. २०७-२०९ इथे आहे.

गंगाबाई तिकोटे : गंगाबाई तदलबागीकर (राहणार तिकोटे, जि. विजापूर) म्हणजे निंबरगी महाराजांचे शिष्य भाऊराव सावळसंग यांच्या कन्या. नीतीने व गुरुभक्तीने भरलेली अनेक पदे त्यांनी मराठी व कन्नड दोन्ही भाषांतून लिहिली आहेत. ती अजून अप्रकाशित आहेत. सोमनाथपंत पंचनदीकर यांनी आपल्या 'वंदू श्रीगुरुला' या पदात गंगाबाईंचे काव्य प्रासादिक आहे असे म्हटले आहे. त्या इंचगेरीस सप्ताहास जात. महाराजांच्या पुष्कळ पत्रांतून यांचे नाव येते.

नित्यनेमावलीतील पंचसमासीमध्ये गंगाबाईविषयी खालील ओव्या आहेत :

त्याच ग्रामी आणखी एक। असती अतिभाविक।
कवित्वी करिती अनेक। गंगाबाई।। ४.२७।।
याही भक्तीच्या भुकेल्या। साधनी सदोदित रंगल्या।
आत्मज्ञानी निष्णात झाल्या। विश्वासबळे।। ४.२८।।

गणपतराव पवार : हे तिकोट्याचे असून त्यांनी महाराजांच्याकडून लहानपणीच नाम घेतले होते. त्यांच्याकडे कवित्वशक्ती होती. नित्यनेमावलीत पहिल्या आवृत्तीपासून असणारी पंचसमासी ह्यांनीच रचली आहे. याबद्दल महाराजांच्या ४-३-१९०९ रोजी लिहिलेल्या पत्रात उल्लेख आहे.

गणेशशास्त्री चौथाई : हे भाऊसाहेब महाराजांचे जमखंडीचे शिष्य. १९०१ साली मार्गशीर्ष सप्ताह निंबरगी येथे करणे कठीण झाले होते. कारण तिथल्या काही लोकांची सप्ताहास हरकत येत होती. तेव्हा सप्ताह दुसऱ्या गावाला करावा असा विचार सुरू होता. यावेळी 'निंबरगीचा भीमाशंकर इंचगेरीस गेला आहे' असा गणेशशास्त्रींना दृष्टांत झाला. तदनुसार हा सप्ताह त्या वर्षी इंचगेरीस करण्यात आला.

गुंडोपंत गदगकर : यांचे पूर्ण नाव माधव हणमंत गदगकर. ह्यांनी महाराजांकडून १३-४-१९११ला नाम घेतले. ते अतिशय निष्ठावंत होते. सांगलीस ते राजेसाहेबांचे खासगी कारभारी होते. राजेसाहेबांच्या आर्थिक पुढाकाराने गुरुदेवांनी जे अध्यात्मविद्यामंदिर सुरू केले त्यात गदगकरांचा फार मोठा वाटा होता. ते निंबाळला वरचेवर येत. गुरुदेवांवर त्यांचे अतिशय प्रेम होते. गुरुदेव आजारी असताना गुंडोपंतांनी त्यांना २२-८-१९२१ला पत्र पाठवले होते. 'तुम्ही शतायुषी होऊन परमार्थाची सेवा करावी, त्यासाठी माझ्या आयुष्यातली काही वर्षे मी तुम्हांस देतो' अशी या पत्रात गुंडोपंतांनी तयारी दर्शवली होती.

गुरुस्वामी जंगम : (राचय्या स्वामी किंवा राचण्णा वीरप्पा करजगी). हे जमखंडी येथील राहणारे. ते आजारी असताना महाराजांनी सांगितल्यावरून त्यांनी शिवलिंगव्वक्कांकडून औषधोपचार घेतला व ते बरे झाले. त्यानंतर त्यांनी शिवलिंगव्वक्कांना ६-१०-१९०२ रोजी जमखंडीहून पत्र लिहिले. त्यात ते म्हणतात, 'प्रकृति उत्तम असून कोणत्याही गोष्टीची न्यूनता नाही.'

गोखले, बाबूराव : यांचे पूर्ण नाव सदाशिव धोंडो गोखले. बरीच वर्षे ते इंचगेरीस बाबांच्या समाधीच्या सभामंडपात रहात व समाधीची पूजा-अर्चा करीत. इंचगेरीस

येणाऱ्या-जाणाऱ्या साधकांची सोय ते करत असत. यांनी भाऊसाहेब महाराजांच्या पादुका करून आणल्या होत्या. त्यांची स्थापना उमदी येथे अश्विन वद्य ५, शके १८७९ (सन १९५७) रोजी करण्यात आली. सदाशिवरावांनी या कामी पुढाकार घेतला होता. त्यांचा मृत्यू शके १८९८, इ. स. १९७६ मध्ये झाला.

गोडबोले, नारायण दत्तात्रेय : हे वेगवेगळ्या गावी रहात असल्याने सोलापूर, विजापूर, बेळगाव वगैरे ठिकाणच्या शिष्यांना गेलेल्या महाराजांच्या जावक पत्रांतून यांचा उल्लेख आहे. शिष्यांच्या पारमार्थिक योग्यतेप्रमाणे महाराज त्यांना मकर-संक्रांतीचा हलवा पाठवत. नारायणरावांना तांबड्या रंगाचा हलवा पाठवला होता असे १०-२-१९०५च्या महाराजांच्या पत्रात आले आहे.

गोपाळण्णा : हे स्वभावाने भोळे होते. ते महाराजांना स्वयंपाक करून घालीत. पुढे रामभाऊ फडणीस आल्यावर स्वयंपाकाचे काम त्यांच्याकडे गेले. गोपाळण्णांना ध्यान करत असताना निंबाळला तंबू, बंगले, राजेरजवाडे वगैरे आहेत असे दृश्य दिसले होते. वास्तविक त्यावेळी निंबाळ येथे आजच्यासारखे काहीही नव्हते. नुसती जागा मात्र घेतली होती. यांची आणखी माहिती 'चिंतनिका' या पुस्तकात पृ. ३४-३५ वर आहे.

चिक्कोण, शिवलिंगप्पा : हे जमखंडीस राहणारे. यांनी केलेले महत्त्वाचे काम म्हणजे नित्यनेमावलीची तिसरी आवृत्ती काढणे. ही त्यांनी १९२४ मध्ये काढली. महाराजांच्या जावक पत्रात ह्यांना लिहिलेले एक पत्र पृ. २३८-२३९ वर आहे. कापूर लावल्यानंतर एक शब्दही बोलू नये हा फार महत्त्वाचा विचार या पत्रात आहे. कापराची ज्योत शांत होईपर्यंत वातावरण निःशब्द पाहिजे हे लक्षात घेतले पाहिजे. ज्योत असेपर्यंत खुट्सुद्धा होऊ नये यावर गुरुदेवांचा फार कटाक्ष होता. ज्योतीवर दृष्टी ठेवून नेम करणे अत्यंत अगत्याचे असल्यामुळे या वेळात श्लोक वगैरे म्हणणे बरोबर नाही हे स्पष्ट आहे.

तुकाराम सुतार : हे विजापूरचे. इंचगेरी येथील निंबरगी महाराजांच्या देवळाच्या कामावर यांची देखरेख असे. या कामाचे श्रेय महाराजांनी त्यांना दिले आहे. 'तुकाराम याची प्रशंसा जमखंडी मंडळींनी फार केली. हुशार, शहाणा असे भूषण दिले' असे एका पत्रात आहे (जावक पत्रे, पृ. १७४-१७५). हे व ह्यांचे वडील नरसप्पा कष्ट सोसून, एकनिष्ठेने व निःस्वार्थीपणे परमार्थाचे काम करीत.

दामले, दिगंबर गणेश : हे पुण्याचे. दिगंबरपंत हे गुरुदेवांच्या मोठ्या बहिणीचे चिरंजीव. त्यांनी ३-११-१९१०ला महाराजांकडून नाम घेतले.

देशपांडे, सौ. काशीबाई : भाऊसाहेब महाराजांच्या पत्नी. काशीबाईंनी ४-७-१८८७ रोज़ी देह ठेवला. निंबरगी महाराजांनी देह ठेवल्यानंतर दोन वर्षांनी त्या वारल्या. या वेळी महाराजांनी आपल्या देण्याघेण्याची यादी केली. बाबासाहेब संगोराम यांच्या टिपणात असे आहे की ही यादी का केली असावी असा प्रश्न एकदा सिटिंगमध्ये गुरुदेवांसमोर निघाला. एक तर्क असा होता की सौ. काशीबाईंचे माहेर निवरगी (इंडी तालुक्यात चडचणजवळ हे गाव आहे) येथील पंडित घराण्यातील होते. त्या माहेरच्या सधन होत्या. त्यांचा वाडा निवरगी येथे आहे. लग्नाच्या वेळेला काशीबाईंबरोबर स्त्रीधन म्हणून सोनेनाणे अशी चीजवस्त आली असण्याचा संभव आहे. त्या वारल्यानंतर स्त्रीधनाची व्यवस्था करण्याचा प्रश्न आला असावा. महाराजांची मुलगी गोदूबाई (जन्म १८८४) लहान होती. महाराजांना तीन मुलगे होते. पुढेमागे या स्त्रीधनाबद्दल प्रश्न उपस्थित होऊ नये यासाठी यादी केली असावी. यादी झाल्यावर महाराज निवरगी पंडितांच्या ऋणातून मुक्त झाले, असे होते. म्हणून देण्याघेण्याची यादी केली असावी.

देशपांडे, कृष्णाजीपंत व्यंकटेश : जन्म आषाढ शु. १२, फसली १२८३, सन १८७३. मृत्यू भाद्रपद शु. २, शके १८४१, बुधवार, ता. २७-८-१९१९. हे महाराजांचे थोरले चिरंजीव. यांना जत संस्थानात नोकरी होती. महाराजांनी शिष्यांना लिहिलेल्या पत्रांपैकी अनेक पत्रे कृष्णाजीपंतांच्या हातची आहेत.

देशपांडे, भीमराव व्यंकटेश : हे महाराजांचे तिसरे चिरंजीव. जन्म वैशाख शु. ७, फसली १२८७, सन १८७७. महाराजांचे वडील बंधू मार्तंडराव ऊर्फ नानासाहेब यांना भीमराव दत्तक गेले होते. महाराजांनी लोकांना लिहिलेल्या पत्रांपैकी बरीच यांच्या हातची आहेत.

देशपांडे, रामराव व्यंकटेश : हे महाराजांचे दुसरे चिरंजीव. जन्म भाद्रपद शु. १२, फसली १२८५, सन १८७५, मृत्यू ता. २-७-१९०१. रामराव गुणी व सुस्वभावी होते, परंतु थोडे लहरी. महाराज म्हणत हा "मनसुकराय" आहे. रामराव संतसेवा करीत. सप्ताहास येणाऱ्या साधकांची धोतरे धूत असत. 'तुला नेम होत नाही तर संतसेवा तरी करीत जा' म्हणून महाराजांनी त्यांना सांगितले होते. त्याप्रमाणे ते करीत असत. रामरावांना 'गायनीकळा' अवगत होती. बारा अभंगांच्या धाटी यांनीच बसविल्या. पोथीवाचन करणे, भजन म्हणणे, मृदंग किंवा तबला वाजविणे, यांत ते तरबेज होते. महाराजांनी एकदा बरीच संतसभा जमलेली पाहून चांगली पदे म्हणण्याबद्दल व भजन चांगले करण्याबद्दल त्यांना सांगितले. त्याचप्रमाणे तबला वाजविण्यात निपुण असल्याने

तबला वाजविण्यास सांगितले. परंतु त्यांनी ते ऐकले नाही व भजनाला उभे राहिले नाहीत. इतक्या लोकांच्या भक्तीला हा मदत करीत नाही म्हणून महाराजांच्या मनाला वाईट वाटले.

एकदा महाराज शनिवारची निंबरगीची वारी संपवून परत येत होते. रामराय बरोबर होते. ते महाराजांच्या पुढे चालले होते. महाराज त्यांना म्हणाले, 'रामराया, तुझ्यापुढे मी जाणे वाजवी, पण काय करावे, तूच माझ्यापुढे जात आहेस.' पुढे सोमवारी महामारीने ते एकदम वारले. रामरायास नेण्याच्या वेळेला महाराजांची पोथी चालूच होती. ते मनामध्ये यत्किंचितही डगमगले नाहीत.

नंतर एकदा उमदीहून इंचगेरीस येतेवेळी जिगजेवणीच्या कृष्णप्पाने महाराजांना प्रश्न विचारला, 'महाराज, मागे आम्ही साधुसंतांचे चमत्कार ऐकिले आहेत. तुकारामांनी प्रेत उठविले असे ऐकले आहे. आपण आपल्या मुलास उठवू नये काय?' महाराजांनी उत्तर दिले, 'कृष्णप्पा, १२ वर्षे पुण्याचा मी क्षय करावा अशी तुझी इच्छा आहे काय? मागील संतांनी मृत लोक उठविले ते दूरचे होते की नातेवाईक होते? मायेत सापडून जीवभावाने मी ही गोष्ट केली असती तर ती केव्हाही साध्य न होती.'

रामरावांचा मुलगा आनंद. याचा जन्म भाद्रपद वद्य ३, फसली १३०९ (२२-९-१८९९). हा फार हुशार होता. अगदी लहान वयातही हा उत्तम भजने म्हणत होता असे अंबुराव महाराज सांगत. ५-६ वर्षांचा असताना हा मृत्यू पावला. याच्या मृत्यूच्या वेळची घटना Pathway to God in the Vedas या पुस्तकात पृ. २७१ वर दिलेली आहे.

नंदेप्पा मल्लप्पा न्यामगौडा : हे महाराजांचे जमखंडी येथील एक प्रमुख नामधारक. ते महाराजांच्या अत्यंत विश्वासातले होते. १९०३ साली इंचगेरीच्या मठाची स्थापना झाल्यापासून मठाची व्यवस्था उत्तम लागण्यासाठी अंबुरावांच्या बरोबरीने त्यांनी कष्ट केले. ते खूप खटपटी होते. त्यांची नेमनिष्ठा नावाजण्यासारखी होती. महाराजांच्या जावक पत्रांतून नंदेप्पांचा जातायेता उल्लेख येतो. Pathway to God in Kannada Literature या पुस्तकात पृ. ७५ वर 'गुरुरायनंथ करुणाळु' या पदाची चर्चा गुरुदेवांनी केली आहे. तिथे त्यांनी म्हटले आहे की, 'मला माझ्या सद्गुरूंचे दोन शिष्य माहीत आहेत. त्यांपैकी एक साधनात कुणालाही हार जाणारे नव्हते तर दुसरे सेवेला निरंतर तत्पर असत.' दोघेही उत्तम साधन करणारे व सेवेत रत असणारे असूनही हा सूक्ष्म फरक करता येण्याजोगा होता. महाराजांचे हे दोन शिष्य म्हणजे अंबुराव व

नंदेप्पा असावेत असा काही ज्येष्ठ साधकांचा तर्क आहे. अंबुराव साधनात किंचित् सरस तर नंदेप्पा सेवेत तसूभर अधिक. सोमनाथपंत पंचनदीकर यांनी 'वंदू श्रीगुरुला' या आपल्या पदात नंदेप्पा अहर्निश सेवेला तत्पर असत असे म्हटले आहे. असो. वर उल्लेख केलेल्या 'गुरुरायनंथ करुणाळु' या पदाच्या चर्चेत गुरुदेवांनी पुढे जे गौरवास्पद उद्गार काढले आहेत ते महत्त्वाचे आहेत. या दोघांजवळ महाराज आपले मन मोकळे करीत. त्या दोघांना महाराजांचे अनुभव खुद्द त्यांच्या तोंडून ऐकायला मिळत, एवढेच नव्हे त्यांना स्वतःलाही तसे काही अनुभव येत.

इंचगेरीच्या कोठीची व्यवस्था सुरुवातीस नंदेप्पांकडे असावी. इंचगेरी मठाचा १९११ सालचा एक नकाशा मिळाला आहे. त्यात नंदेप्पांच्या कोठीची जागा दाखवली आहे. नंदेप्पा प्रत्येक सप्ताहाला येऊन मठ शोभिवंत करत असत, असा नित्यनेमावलीतील पंचसमासीत ४.१७ या ओवीत उल्लेख आहे.

नरसप्पा सुतार : हे विजापूरचे. यांच्या घरी महाराज उतरत व सप्ताहही करीत. नरसप्पा व त्यांचा मुलगा तुकाराम हे परमार्थासाठी शारीरिक व आर्थिक मदत करण्यात नेहमी पुढे असत. १८९२-९३ च्या महाराजांच्या डायरीनुसार २६-१२-१८९२ ते २-१-१८९३ या काळात महाराजांचा मुक्काम विजापूरला होता. पैकी २६ तारखेस त्यांचा मुक्काम सिकारखाना येथे व्यंकटरमणाच्या देवळात होता. ३०-१२-१८९२ला महाराज कासप्पा गुरव यांच्या घरी असून बाकीचे दिवस नरसप्पा सुतार यांच्याकडे होते. तिथे सप्ताह झाला असावा, कारण या दिवसांत वेगवेगळ्या भक्तांचा नैवेद्य झाल्याचा महाराजांच्या डायरीत उल्लेख आहे. २७ तारखेचा नैवेद्य चूडप्पा भीमण्णा, २८चा बाळप्पा मळेकरी (निंबरगी महाराजांचे शिष्य), २९चा गुरनिंगप्पा जाडर (निंबरगी महाराजांचे शिष्य) व ३१ला माणिकप्पा यांचा होता. बाकीच्या दिवशी नरसप्पांचा नैवेद्य असावा. महाराजांच्या कागदपत्रांत आणखी दोन जागी नरसप्पा सुतारांचे नाव आहे. 'समर्थ श्रीगुरु सद्गुरुमहाराजांच्या उत्सवास येणाऱ्या मंडळींची' २२ डिसेंबर १८९७ रोजी महाराजांनी केलेली यादी उपलब्ध आहे. 'समर्थ सद्गुरु' हा उल्लेख सरळसरळ निंबरगी महाराजांचा आहे. या यादीत 'पूर्वीचे' अशा मथळ्याखाली नरसप्पा सुतार, विजापूर असे नाव आहे. यावरून नरसप्पा हे निंबरगी महाराजांचे शिष्य होते की काय अशी कल्पना बळावते. परंतु बोधसुधेत जिथे निंबरगी महाराजांच्या शिष्यांची माहिती आहे त्या ठिकाणी नरसप्पांचे नाव नाही. मग ते भाऊसाहेब महाराजांचे शिष्य असावे असा विचार येतो. खात्रीचा पुरावा कोणत्याच पक्षाबाबत देता येत नसला तरीही महाराजांच्या पत्रांतून त्यांचे जे उल्लेख आले आहेत त्यांवरून ते महाराजांचे शिष्य

असावेत असा होरा वहातो. २६-९-१९००ला महाराजांनी लिहिलेल्या पत्रात आपण विजापूरला नरसप्पा सुतार यांच्या घरी जाणार असल्याचा मजकूर आहे. नरसप्पांच्या पत्त्यावर (नरसप्पा सुतार, उपली बुरुजाजवळ) महाराजांनी पत्रोत्तर मागवले आहे. म्हणजे याही वेळी महाराजांचा मुक्काम तिथे होता. दुसऱ्या एका टिपणात निंबरगी महाराजांची समाधी बुजवल्याबद्दल कायदेशीर इलाज नरसप्पाने केला असे आहे. ते नरसप्पा सुतार असण्याचा संभव आहे.

पंचनदीकर, सोमनाथपंत : यांचे पूर्ण नाव सोमनाथ महादेव ऊर्फ बाबूराव जोशी. यांनी महाराजांकडून २०-१-१९०८ला नाम घेतले. ते फार निष्ठावंत होते. त्यांनी महाराजांच्या प्रमुख शिष्यांवर एक पद रचले आहे. ती एक भक्तमाला असून तिथे प्रत्येकाचे वैशिष्ट्य सांगितले आहे. १९११ सालची नित्यनेमावलीची पहिली आवृत्ती प्रसिद्ध होण्यापूर्वी भजनांचे हस्तलिखित व पंचसमासी ही सोमनाथपंतांकडे शुद्ध करण्यास पाठवली होती, यावरून त्यांची योग्यता लक्षात येते. त्यांनी हे काम केले ही गोष्ट 'जय जय जय भाऊराव राजसद्‌गुरु' या त्यांच्याच पदावरून कळते. हे पद नित्यनेमावलीतील पाचव्या समासाच्या शेवटी आहे. यांनी काही अष्टके व पदे केली होती असा उल्लेख महाराजांच्या जावक पत्रांत पृ. १६३ वर आहे.

पुंडप्पा केंचप्पा हट्टी : भाऊसाहेब महाराजांबरोबर हे सतत असून त्यांची सेवा करीत. महाराज नेमाला बसले की बाहेर राखण करण्याचे काम पुंडप्पांचे असे. एकदा राखण करताना नेम कर म्हणून महाराजांनी सांगितले असता पुंडप्पांना झोप लागली. त्याबद्दल महाराजांनी विचारल्यावर पुंडप्पांनी सांगून टाकले, 'महाराज नेम-बिम तुमचा तुम्ही पाहून घ्या. माझे काम तुमची राखण करण्याचे आहे, नेम करण्याचे नाही.' ही गोष्ट प्रसिद्ध आहे. महाराजांचे त्यावरील बोलणेही महत्त्वाचे आहे. 'तू कशाला करशील नेम, मी तुझ्यासाठी करतो आहे ना.' सद्‌गुरू शिष्यांसाठी अगणित गोष्टी करतात पण महाराज शिष्यांचा नेमही करीत !

बयाबाई सोहनी : या सोलापूरच्या रहाणाऱ्या. त्यांनी महाराजांकडून २३-३-१९०७ला नाम घेतले. नित्यनेमावलीतील पंचसमासीमध्ये यांच्याबद्दल म्हटले आहे :

सोलापुरी बयाबाई। भक्ति थाटें चालविती पाही।
उदार भाविक आणि उपकाराविषयीं। सर्वांत श्रेष्ठ।।४.४०।।
सोलापुरी भक्ति वाढविती। तेणे समर्थांची वाढे ख्याती।
नाना लोकास साधनस्थिती। सहजचि प्राप्त होतसे।।४.४१।।

महाराज सोलापूरला ह्यांच्या घरी उतरत असत. बयाबाई अत्यंत कर्तृत्ववान होत्या. असे सांगतात की एकदा एका महादेवाच्या देवळात जाण्यास त्यांना कोणी तरी मनाई केली. तेव्हा त्यांनी जुन्या फौजदार चावडीजवळ स्वखर्चाने एक महादेवाचे देऊळ बांधले. त्याला सोहनी महादेव-मंदिर म्हणतात. या देवळात नंदीजवळच्या एका फरशीवर बयाबाई असे नाव आहे.



महादेव-मंदिरातील बयाबाईंच्या नावाची फरशी

त्या फार उदार होत्या. आपल्या संपत्तीचा विनियोग त्यांनी परमार्थासाठी केला. स्वतः अतिशय श्रीमंत असूनही श्रीमंतीचा अभिमान त्यांना शिवला नाही. एकदा महाराज सोलापूरला आले असताना रात्रीचे भजन रंगलेले होते. मध्येच एका मुलाला उलटी होऊ लागली. बयाबाई मुकाट्याने पुढे झाल्या व त्यांनी चटकन आपल्या हातात उलटी धरली. घाण जमिनीवर पडू दिली नाही. भजन थाटात चालूच होते, त्यात काहीही व्यत्यय आला नाही.

बसप्पा कल्लप्पा पाटील : हे मूळचे मुधोळचे. ते कोळगिरीस रहात असत, त्यामुळे बसप्पा कोळगिरी याच नावाने ते ज्ञात आहेत. महाराजांकडून त्यांनी नाम

घेतल्याची तारीख १५-५-१९०७. महाराजांच्या जावक पत्रात यांचा बऱ्याच वेळा उल्लेख येतो. महाराजांची काही पत्रे ह्यांच्या हातची आहेत.

मलकप्पा नासी (मलकप्पा मास्तर) : हे जमखंडीचे रहाणारे होते. मलकप्पा हे सावकार आनीखिंडींचे मुनीम होते. एकदा त्यांच्यावर सोने चोरल्याचा आरोप आला होता. त्यातून ते सुटले. या घटनेला उद्देशून महाराज म्हणाले, 'आमचा देव श्रीमंत आहे, समर्थ आहे, मलकप्पा मास्तर'. महाराजांचा व मलकप्पांचा पत्रव्यवहार होता.

बाळप्पा गुड्डोडगी : हे महाराजांचे शिष्य अथणी येथे रहात. महाराज त्यांच्या घरी जात असत. महाराजांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली जागा म्हणून गुरुदेवही अथणीला गेल्यावेळी एकदा बाळप्पा रहात असत त्या घरी गेले होते. तिथल्या धुराच्या चुलीवरील चहाही त्यांनी घेतला वगैरे माहिती 'चिंतनिका' पुस्तकात पृ. १६७ वर आहे.

बाळप्पा पिटेल : हे मूळचे संक या गावचे होते. ते होनवाड या गावी रहात असत. ते फिड्ल अत्यंत सुस्वर वाजवत. त्यावरून त्यांचे नाव फिड्ल बाळप्पा किंवा पिटेल बाळप्पा असे पडले. भीमदास या कवीचे 'एन सवि एन सवि हरिनाम' हे पद बाळप्पांचे अतिशय आवडते होते. ते पद बाळप्पा फिड्लवर इतके कौशल्याने व तल्लीनतेने आळवत असत की त्या वाद्यातून पदाचे शब्द बाहेर पडत आहेत असा भास होई. काळाच्या ओघात फिड्ल अगदी मोडकळीला आल्यावर बाळप्पांनी ते भाऊसाहेब महाराजांच्या समाधीसमोर पुरून टाकले, ही हकीकत Pathway to God in Kannada Literature या पुस्तकात पृ. १९४ वर आली आहे.

मल्हारपंत जोशी : हे महाराजांचे परमभक्त होते. यांची माहिती 'चिंतनिका' पुस्तकात पृ. १९ व पृ. ३८ वर आहे. 'माझ्या सद्‌गुरुचा अगाध महिमा' हा १९११ सालच्या नित्यनेमावलीत घेतलेला श्लोक यांनी केलेला आहे.

रुद्रप्पा हिप्परगी : 'मंगलं महालिंग उमदीशा' ही महाराजांची आरती त्यांनी रचली आहे. ही आरती गुरुदेवांना फार आवडे. रुद्रप्पा कन्नडमधील शीघ्रकवी होते. त्यांची अनेक कवने अप्रकाशित राहिली आहेत. निंबाळला गुरुदेवांकडे ते नेहमी येत. त्यांनी गुरुदेवांवर एक पोवाडा रचला होता व निंबाळ येथील अणण्पा बडिगेर हे तो पोवाडा म्हणत असत. त्याची सुरुवात 'रामचंद्र महाराज रानडे ब्रह्मविद्यवंता' अशी होती. गुरुदेवांनी हा पोवाडा कुठेही प्रसिद्ध करू दिला नाही.

लक्ष्मणराव लिमये : हे भाऊसाहेब महाराजांचे नामधारक. 'पूर्णप्रतापा भक्तवत्सला'

आणि 'ज्याही देउनि बीजमंत्र मजला' या लक्ष्मणरावांच्या दोन रचना १९११ सालच्या नित्यनेमावलीत घेतल्या आहेत. यावरून त्यांची महती लक्षात येते.

लिंगप्पा बसप्पा सावळगी : हे अतिशय निष्ठावंत असून कडक साधन करणारे अशी त्यांची ख्याती होती. जमखंडीहून पुण्यास येताना कुडची स्टेशनवर संध्याकाळी ते आगगाडीत चढत. सामान ठेवण्याच्या जागी कुडचीला जे ते नेमाला बसत ते पुणे स्टेशन आल्यावरच उठत, असे गुरुदेव सांगत होते. ३०-३-१९१५ रोजी रात्री ९ वाजता जमखंडी येथे यांचे निर्याण झाले. 'चिंतनिका' पुस्तकात पृ. १७-१८, ३८-३९ वर यांची अधिक माहिती आहे. त्याच पुस्तकात पृ. १८४-१८५ वर लिंगप्पांनी आपल्या एका अपूर्व पारमार्थिक अनुभवाचे वर्णन केलेले पत्र आहे. गुरुदेव डेक्कन कॉलेजात असताना, ते, लिंगप्पा आणि मल्हारपंत जोशी या त्रयींचा भावयुक्त नेम चालत असे. गुरुदेव १९०९ मध्ये अतिशय आजारी असताना लिंगप्पा त्यांना गीता वाचून दाखवीत.

वासप्पा टरकी : हे जमखंडीचे राहणारे. ह्यांचा मुलगा प्लेगने १९०३ साली वारला. त्यामुळे त्यानंतर महाराज जमखंडीस आले असतानाही वासप्पा त्यांच्या भेटीस गेले नाहीत. मुलाला महाराजांनी जीवदान द्यावे अशी त्यांची इच्छा असावी. ही गोष्ट महाराजांच्या कानावर गेली. पुढे महाराज जमखंडीजवळच्या हुन्नूर या गावाला जाताना म्हणाले, 'मला माझ्या रामरायाला उठवता आले नसते का?'

विष्णू रामचंद्र फडके : हे मूळचे जमखंडीचे. नंतर सोलापूर येथे स्थायिक झाले. संप्रदायाच्या दृष्टीने यांनी फार मोठे काम केले आहे. ते म्हणजे नित्यनेमावलीची पहिली व दुसरी आवृत्ती प्रसिद्ध करणे. सोमनाथपंत पंचनदीकर यांनी त्यांच्याबद्दल म्हटले आहे की या प्रकाशनाने त्यांनी आपल्या सद्‌गुरूंची भक्ती वाढवली. महाराजांच्या जावक पत्रांतून विष्णुपंतांची चौकशी नेहमी केली जात असे.

शंकरप्पा ककमरी : हे महाराजांचे एक विशेष निष्ठावंत शिष्य होते. हे गवताच्या गंजीजवळ एकदा नेमाला बसले असताना त्यांना साप चावला. पण माझ्या सद्‌गुरूंच्या कृपेने मला काही होणार नाही या श्रद्धेने त्यांनी नेम चालूच ठेवला, नेमातून उठले नाहीत आणि खरोखरच त्यांना काही झाले नाही. यांची अधिक माहिती 'चिंतनिका' पुस्तकात पृ. १०३ वर आहे.

शेट्टप्पा कोळी : चडचण येथील रहिवासी. मृत्यू चैत्र व. ११ शके १८५५, सोमवार, ता. २९-४-१९३५. हे निंबाळला नेहमी येत. 'देह हा एक घोडा आहे. खायला घालाल तितके खातो, राबवाल तितके राबतो' हे वाक्य शेट्टप्पा नेहमी उच्चारीत, असे गुरुदेव

म्हणत. यांच्याबद्दल आणखी माहिती 'दासबोधसुधा' या ग्रंथात पृ. ३९४-३९५ वर आहे.

संगम, कृष्णाजी गुरुनाथ : ह्यांनी महाराजांकडून ७-४-१९०९ला इंचगेरी येथे नाम घेतले होते. हे शिक्षणखात्यात इन्स्पेक्टर होते.

संगम, जिवबाळ कृष्णाजी : यांनी भाऊसाहेब महाराजांकडून ७-४-१९०९ रोजी इंचगेरी येथे नाम घेतले. महाराजांच्या अकरा मारुतींपैकी हे एक असून दंडावर बांधण्याचे त्यांचे कडे सोन्याचे होते. संसारातल्या अडचणीमुळे ते कडे विकण्याचा विचार त्यांच्या मनात आला. गुरुदेवांना हे सांगायला ते निंबाळला आले. योगायोगाने बाबासाहेब संगोराम तिथे होते. गुरुदेवांनी कड्याची गोष्ट त्यांच्यापुढे काढली असता त्यांनी, 'मीच ते घेतो' असे आनंदाने सांगितले. जिवबाळप्पा व बाबासाहेब विजापूरला गेले व त्यांनी कड्याची किंमत केली. त्या किंमतीपेक्षा थोडे जास्तच पैसे देऊन बाबासाहेबांनी ते कडे घेतले. मग बागेवाडी या नोकरीच्या गावाला जाण्यासाठी जिवबाळप्पा विजापूरहून रेल्वेने निघाले. वाटेत तेलगी (आताचे बसवन बागेवाडी) स्टेशनवर चहा पिण्यास उतरले असताना ते पैसे चोरीला गेले. जिवबाळप्पा अतिशय दुःखित झाले. ९०७३५०

लहानपणी जिवबाळप्पा फार आजारी होते. कोणत्याच औषधाने त्यांना गुण येईना. त्यांचे वडील कृष्णराव अतिशय काळजीत होते. तेव्हा मुलाला घेऊन ते इंचगेरीस महाराजांकडे आले. महाराजांनी 'काळजी करू नको' असे सांगितले. दोघा पिता-पुत्रांनी एकाच दिवशी नाम घेतले. जिवबाळप्पा लहानच होते. नंतर त्यांची प्रकृती सुधारली. पुढे हे पुष्कळवेळा महाराजांबरोबर असत. महाराजांच्या जावक पत्रांपैकी काही पत्रे यांच्या हातची आहेत. जिवबाळप्पा फार सात्त्विक स्वभावाचे होते.

□

संदर्भग्रंथ

१. **श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर यांची जावक पत्रे व टिपणे** : प्रकाशक, गुरुदेव रानडे आश्रम, निंबाळ आर. एस., जि. विजापूर, पिन ५८६ २११; इ. स. १९५९

२. **बोधसुधा** : अनुवादक, म. श्री. देशपांडे; प्रकाशक, श्री गुरुदेव रानडे समाधी ट्रस्ट, निंबाळ आर. एस., जि. विजापूर पिन ५८६२११; तिसरी आवृत्ती इ. स. १९८८

३. **नित्यनेमावली** : प्रकाशक, श्री गुरुदेव रानडे समाधी ट्रस्ट, निंबाळ आर. एस. जि. विजापूर, पिन ५८६ २११; अकरावी आवृत्ती, इ. स. १९८८

४. **Pathway to God in Kannada Literature** : R. D. Ranade; Publishers, Bharatiya Vidya Bhavan, Kulapati Munshi Marg, Mumbai 400007; 3rd Edition, 1989

५. **Pathway to God in Hindi Literature** : R. D. Ranade; Publishers, Shri Gurudev Ranade Samadhi Trust, Nimbal R. S., Dist Bijapur, Pin 586 211; 3rd Edition, 1997

६. **कन्नड परमार्थसोपान** : अनुवादिका, सौ. पद्मा कुलकर्णी; प्रकाशक, भारतीय विद्या भवन, कुलपती मुन्शी मार्ग, मुंबई ४०० ००७; इ. स. १९९२

७. **चिंतनिका** : म. शं. पत्तिहाळ व सौ. प्रमिला पत्तिहाळ; प्रकाशिका, लीलाताई शिरवळकर, तेजस ३ ठुबे पार्क, शिवाजीनगर, पुणे पिन ४११ ००५; इ. स. १९९८

८. **जीवनगंगा** : म. श्री. देशपांडे; प्रकाशक, श्यामकांत बनहट्टी, सुविचार प्रकाशन मंडळ, ४६१/४, सदाशिव, पुणे पिन ४११ ००२; इ. स. १९६६

९. **दासबोधसुधा** : प्र. ह. कुलकर्णी, प्रकाशिका, ललिता प्रल्हाद कुलकर्णी, १७१- ए (नवीन ४७), ब्लॉक २, राजाजी नगर, बंगलोर पिन ५६० ०१०

१०. **Pathway to God in the Vedas** : K. D. Sangoram; Ed. B. R. Kulkarni, Publisher, Prof B. R. Kulkarni, A-4-2 Postal Colony, Hotgi Road, Solapur #Ã Pin 413 003; 1995